
# प्रभाकर फडणीस

# महाभारत

## काही नवीन विचार



# महाभारत

## काही नवीन विचार


## प्रभाकर फडणीस



ई साहित्य प्रतिष्ठान

महाभारत : काही नवीन विचार

लेखक : प्रभाकर फडणीस

Email: prabhakar365@gmail. com

pkphadnis@yahoo. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन :११ ऑक्टोबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी - घेणे आवश्यकआहे.

या पुस्तकातील बहुतांश चित्रे ही

दिग्गज चित्रकार

श्री दिनानाथ दलाल

आणि

राजा रवि वर्मा

यांची असून ती उपलब्ध करून दिल्याबद्दल

विविध वेबसाईट्सचे आम्ही आभारी आहोत

अनुक्रमणिका


१. पांडवांचा अज्ञातवास पुरा झालाच नाही.

२. पांडव विवाह

३. जरासंधवध

४. शिशुपालवध

५. शकुंतला व देवयानी

६. नलदमयंती कथा

७. कृष्णशिष्टाई

८. कृष्ण-कर्ण संवाद

९. अभिमन्यूचा वध

१०. जयद्रथवध

११. भीष्मचित्रण

१२. महाभारतातील कर्णकथा.

१३. द्रोण आणि पांडव – बदलते संबंध

१४. महाभारताबाबत काही गैरसमजुती.

१५. स्फुट प्रकरणे.

# प्रस्तावना

महाभारतातील विविध विषयांवरील माझे काही लेख पुस्तकरूपाने वाचकांसमोर ठेवताना मला आनंद होत आहे. यातील बहुतेक सर्व लेख माझ्या www. mymahabharat. blogspot. com या ब्लॉगवर गेल्या काही वर्षांत प्रसिद्ध झालेले आहेत. ब्लॉगवरचे लेखन तुकड्या-तुकड्यानी केले जाते व कोणा वाचकाला ते आवडले तरच तो सर्व भाग वाचणार त्यामुळे पूर्ण विषय सर्वानीच वाचलेला असेल वा नसेल. ब्लॉग सुरू केला तेव्हा 'मराठीमध्ये ब्लॉग' याचे एक नावीन्य होते. संगणक वापरणारातूनच वाचक भेटणार! माझ्या ब्लॉगला माझ्या अपेक्षेपेक्षा तरुण वाचकातून भरपूर प्रतिसाद मिळाला.

पांडवांचा अज्ञातवास या विषयावरील लेख हा प्रथम तयार झाला तेव्हा तो व्याख्यान देण्यासाठी लिहिला होता. ब्लॉग पुष्कळ नंतर सुरू केला.

महाभारताचे विदर्भ-मराठवाडा कंपनीने नवीन भाषांतर करून घेऊन ते अनेक खंडांत छापलें. भाषांतरकार सर्व तज्ञ व विद्वान होते. आमच्याकडे हे सर्व खंड सुरवातीलाच आगाऊ नोंदणी करून विकत घेतले गेले व जसे प्रकाशित होत गेले तसे घरपोच मिळाले. मी निवृत्त झालो होतो त्यामुळे वेळ होता. महाभारतकथा माझ्या पिढीच्या लोकाना परिचित होती. ललित साहित्याबरोबरच 'युगांत', 'हा जय नावाचा इतिहास आहे' अशीं वेगळे विचार मांडणारी पुस्तकेही वाचनात आलीं होतीं. जसे मी महाभारत वाचत गेलो तसे अनेक नवे विचार समोर येत गेले. मग पांडवाच्या अज्ञातवासाबद्दल अनेक शंका उभ्या राहिल्या व हा विषय व्याख्यानरूपाने मांडावा असे वाटले. वास्तविक मी शिक्षक, प्रोफेसर वा व्याख्याता कधीच नव्हतो. विलेपार्ले येथील 'सोबती' या ज्येष्ठ नागरिक संघटनेचा नव्याने सभासद झालो होतो. येथेच सुरवात करावी असे वाटून उपाध्यक्ष प्रा. चिं. त्र्यं. येवलेकराना लेख दाखवला व व्याख्यान द्यायची इच्छा व्यक्त केली. त्यानी उत्तेजन दिले, संस्थेत व्याख्यान ठरवले व चार मित्राना आवर्जून बोलावले! अनुभव नसताना व पाय लटपटत असताना रेटून नेले आणि आश्चर्य म्हणजे व्याख्यान अनेकाना आवडले! मग मी सुटलोच! या पुस्तकातील बहुतेक विषयांवर व इतरही अनेक विषयांवर मग मी 'सोबती' मध्ये व इतरत्रही (अमेरिकेतही) व्याख्याने दिली. निवृत्तीच्या काळात काहीतरी नवीन केल्याचा आनंद मिळवला.

महाभारत इतिहास कीं काव्य वगैरे गोष्टींत मी गुंतून पडलो नाही. ही माणसांची कथा आहे, देव वा असुरांच्या अवतारांची नव्हे ही भूमिका पत्करली. माणसाचा जन्म माणसापासूनच होऊ शकतो हे मनाशी धरून कथेमागची कथा शोधत गेलो. अनेक व्यक्तिमत्त्वांवर नवा प्रकाश पडत गेला. लिहिणे व व्याख्याने चालू असतानाच ब्लॉगही सुरू केला. त्यावेळी मराठीतून संगणकावर लिहिण्याची सोय नुकतीच मिळू लागली होती. ब्लॉगला वाचक, विशेषतः तरुण वाचक मिळत गेले. काहीना माझीं मते पटत नव्हतीं पण त्याबद्दल माझी काहीच तक्रार नव्हती. मी श्रद्धावान भूमिकेतून लिहीत नव्हतो हे त्याचे कारण असे. अर्थातच इतरांच्या श्रद्धांना दुखवणे हा माझा हेतु कधीच नव्हता.

या लेखनामध्ये मी असे गृहीत धरले आहे कीं वाचकाना सर्व महाभारतकथा, निदान ढोबळमानाने, परिचित आहे. त्यामुळे कथानकाचा त्या-त्या लेखाशी संबंधित भाग मी विस्ताराने वर्णिलेला नाही. जेथे मला नवीन काही सांगण्यासारखे जाणवले त्याचाच उहापोह केलेला आहे. संदर्भ देऊन जागा अडविण्यात म्हणूनच अर्थ नव्हता. मात्र जेथे मी माझे विचार वा तर्क मांडले आहेत तेव्हा तसे उघडच म्हटले आहे व जेथे माझ्या तर्काना मूल ग्रंथात आधार नाही तेथे ते मान्यच केलेले आहे!

'ब्लॉग माझा' या स्पर्धेत माझ्या ब्लॉगला पहिले बक्षीसही मिळाले व बक्षीस समारंभ 'स्टार माझा' वर दाखवला गेला त्यामुळे मी टी व्ही स्टारही झालो!

एकूण महाभारताच्या वाचनाने व लेखनाने मला अनपेक्षितपणे अनेक आनंदाचे दिवस दाखवले. श्री. सामंत यानी माझे हे लेखन ईसाहित्य प्रकाशन म्हणून तुमच्यासमोर ठेवण्याची इच्छा मला कळवली तो हल्लीच लाभलेला असाच मोठ्या आनंदाचा दिवस. ब्लॉगवरून व संगणकावरून सर्व नवेजुने लेखन एकत्र करून व नीट संकलन करून त्यांचेकडे पाठवले व ते आता वाचकांसमोर येत आहे. ब्लॉग वाचलेल्यांच्या पुढची पिढी आता हे पुस्तक वाचील व त्यानाही ते आवडेल अशी आशा आहे.

प्रभाकर फडणीस

# अर्पणपत्रिका

महाभारताबद्दलच्या माझ्या विचारांची बहुतेक
वेळा प्रथम श्रोती व टीकाकारही, पत्नी सौ उषा व
माझ्या व्याख्यान या नवीन उपक्रमाला उत्तेजन
देणारे ज्येष्ठ मित्र प्रा. चिं. त्र्यं. येवलेकर यांना
प्रेमादरपुर्वक अर्पण.

# पांडवांचा अज्ञातवास पुरा झालाच नाही

महाभारतात अनेक कोडी आहेत त्यात मला जाणवणारे एक कोडे म्हणजे पाडवांचा अज्ञातवास पुरा झाला कीं नाही? महाभारतकारांनी स्वत:चे स्पष्ट मत दिलेले नाही. दुर्योधनाने पांडवांचा दावा मुळीच मान्य केला नाही हे स्पष्टपणे नमूद केले आहे. महाभारतातील इतर अनेक प्रश्न या गोष्टीशी निगडित आहेत. त्यातील काही असे :-

१. कौरव आपल्या पक्षाला अनेक विख्यात राजे व अकरा अक्षौहिणी सैन्य जमवू शकले. त्यांचा पक्ष अन्यायाचा असेल तर हे कसे झाले?

२. भीष्म, द्रोण व कृप यांनी युद्धात कौरवांची बाजू घेण्याचे खरेंतर काही कारण नाही. अर्थस्य पुरुषो दास: हे दिलेले कारण पोरकट वाटते. कौरवांचा पराभव होऊन पांडव हस्तिनापुरचे राजे झाले असते तर त्यांनी या तिघानाही सन्मानानेच वागवले असते. प्रत्यक्षात कृप पुढे  पांडवांपाशी राहिलाच होता. मग या तिघानी युद्ध एवढे हिरिरिने कां लढवले?

३. युधिष्ठिराने प्रथम अर्धे राज्य मागितले होते, पण मागाहून संजयाबरोबर निरोप पाठवून फक्त पांच गावांवर समाधान मानण्याची तयारी दाखवली. हा त्याचा मोठेपणा खरा पण आपण अज्ञातवास पुरा केलेला नसल्यामुळे आपला दावा कच्चा आहे याची त्याला जाणीव होती हेही कारण असू शकते!

४. युद्ध सुरू होण्यापूर्वी अनेकानी दुर्योधनाला युद्ध टाळण्याचा उपदेश केला. मात्र 'पांडवानी द्यूताचा पण पूर्ण केलेला असल्यामुळे तुला त्यांचे राज्य परत दिलेच पाहिजे' असे कोणीही म्हटले नाही! फक्त सर्वनाशाची भीति घातली. खुद्द कृष्णानेही शिष्टाईच्या वेळी 'आम्ही द्यूताची अट पूर्ण केली आहे असा पांडवांचा दावा आहे' एवढेच म्हटले.

५. अर्जुन विराटाच्या राजधानीत कौरवसैन्यासमोर प्रगट झाला दुर्योधनाने 'अज्ञातवास पुरा झालेला नाही' असे म्हटले. तेव्हा भीष्माने 'पांडवांनी सौरमानाने तेरा वर्षे पुरी केलेली दिसतात' एवढेच म्हटले पण हे बरोबर की चूक यावर मत दिलेले नाही!

६ बलराम दुर्योधनाचा गुरु. पांडवानी जर अज्ञातवास निर्विवादपणे पुरा केलेला असता तर त्याने दुर्योधनाला राज्य देण्यास सांगितले असते. त्याने तसे न करता उलट कृष्णालाच बजावले की पांडवाच्या दुर्दशेला युधिष्ठिरच जबाबदार आहे व आपणाला दोन्ही पक्ष सारखेच असल्यमुळे आपण युद्धापासून दूर रहाणेच योग्य!

७. नकुल-सहदेवांचा मामा, शल्य, पांडवांच्या सैन्यात सामील होण्यासाठी निघालेला असतां वाटेत दुर्योधनाची भेट झाल्यावर सरळ कौरवसैन्यात गेला! हे कसे झाले? आपला पक्ष अन्यायाचा नाही अशी त्याची खात्री पटवण्यात दुर्योधनाला यश आले. 'तू माझा सेनापति व्हावेस' असे दुर्योधनाने शल्याला म्हटले! दुर्योधनाने काहीही म्हटले तरी कौरवसैन्यात भीष्म असताना इतर कोणी सेनापति होण्याचा संभव नव्हताच.

७. राजा पांडु याचा मित्र असलेला राजा भगदत्त पांडवांऐवजी कौरवानाच मिळाला. कारण दिलेले नाही.

८. याउलट ज्या जरासंधाला भीमाने मारले वा शिशुपालाला कृष्णाने मारले त्यांचे पुत्र पांडवपक्षात होते!

यामुळे असे वाटते की पांडवांचा राज्यावर हक्क ज्या मूलाधारावर आधारलेला त्या पणाची अट पूर्ण केल्याच्या त्यांच्या दाव्यामध्येच काही कमतरता होती काय? कीं ज्यामुळे प्रत्येकाने आपल्याला योग्य वाटलेली बाजू घेतली?

या शंकेमुळे द्यूत, अनुद्यूत व त्यातून उद्भवलेला वनवास व अज्ञातवास या घटनांची, अभिनिवेश दूर ठेवून, तपासणी करणे आवश्यक ठरते.

द्यूत व अनुद्यूत : -

युधिष्टिर शकुनीशी द्यूत खेळला व पणांसाठी धन दुर्योधनाने दिले. ही विचित्र व्यवस्था युधिष्ठिराने फारशी तक्रार न करता स्वीकारली. काही करून त्याला द्यूत खेळायचेच होते! तो फार बेफामपणे खेळला. फार थोड्या वेळात तो सर्व वैभव गमावून बसला. याबद्दल बलरामाने त्याला दोषी ठरवले. नळराजा व त्याचा भाऊ पुष्कर यांचे द्यूत हे आणखी एक गाजलेले द्यूत. त्यांत सर्वस्व गमावण्यासाठी नळराजाला काही महिने लागले! कौरवांनी पांडवांचा व द्रौपदीचा नाना प्रकारे अपमान व छळ करून राजसूय यज्ञापासून त्यांच्या मनात डाचत असलेले वैषम्य धुवून काढले! आपले पुत्र जिंकत असल्याचा आनंद

उपभोगणाऱ्या धृतराष्ट्राने अखेर द्रौपदीला वर देऊन पांडवांना दास्यातून मुक्त करून द्यूताचा व्यावहारिक परिणाम सर्व पुसून टाकला. दुर्योधनाने त्याला हरकत घेतली नाही. धृतराष्ट्राच्या अंतिम आदेशाप्रमाणे पांडव व द्रौपदी इंद्रप्रस्थाला परत निघालीं. झालेल्या अपमानांचा बदला घेण्यासाठी पांडव लगेच पांचालांच्या व यादवांच्या मदतीने चालून येतील अशी भीति कौरवांना निर्माण झाली. मी तुमच्या बाजूने उभा राहीन असे स्पष्ट आश्वासन द्रोणाने दिले. तरीही युद्ध टाळणेच श्रेयस्कर होते. त्यासाठी अनुद्यूताची कल्पना पुढे आली  असे मला वाटते. धृतराष्ट्राने ती स्वीकारली व पांडवाना परतीच्या वाटेवरूनच परत बोलावले गेले.

पुन्हा द्यूताला बसताना 'आतातरी आपण जिंकू अशी मला आशा वाटली होती' असे युधिष्टिर वनवासात नंतर द्रौपदीजवळ म्हणाला! युद्ध टळले तर युधिष्टिरालाही हवे होते. त्याला कर्णाची धास्ती होती. भीष्म-द्रोण आपलीच बाजू घेतील याची मुळीच खात्री नव्हती आणि केवळ भीम-अर्जुन यांच्या बळावर जिंकण्याची खात्री नव्हती. कौरवाना तयारीला, इतर राजे आपल्या बाजूला वळवण्याला, वेळ हवा होता. अनुद्यूताच्या पणामुळे कोणताही पक्ष जिंकला तरी युद्ध तेरा वर्षे टळणार होते! पांडव जिंकले तर कौरवांपैकी कोणकोण वनात जाणार होते याचा खुलासा कोणी विचारलाच नाही. आपण हरू अशी शंकाही कौरवाना आली नाही. पांडव हरले तर मात्र त्यांचेबरोबर द्रौपदीनेही वनात जावयाचे होते! कारण ती स्वस्थ बसली नसती, तिने पांचाल-यादवांच्या मदतीने कौरवांवर युद्ध लादले असते. अपेक्षेप्रमाणे युधिष्टिर हरला त्यामुळे हा प्रश्नच उद्भवला नाही. पांडव हरून वनात गेले तर परत आल्यावर त्याना राज्य परत द्यावयाचे नाहीच असा दुर्योधनाचा ठाम बेत होता व तो त्याने साथीदारांपाशी बोलूनही दाखवला होता. (सभापर्व अ. ७४/श्लोक २१-२३).

एक महत्वाची गोष्ट म्हणजे द्यूत-अनुद्यूत कोणत्या तिथीला झाले याचा काहीही उल्लेख महाभारतात नाही! महिनाही दिलेला नाही. अनुद्यूतानंतर पांडव लगेचच वनात गेले. तेरा वर्षे त्याच तिथीला पुरी व्हावयाची असल्यामुळे तिथिचा उल्लेखच नाही ही नवलाची गोष्ट आहे. वनवासाची बारा व अज्ञातवासाचे एक वर्ष सौरमानाने मोजावयाचे की चांद्रमानाने याची चर्चा झाली नाही. सर्व व्यवहार चांद्रमानाने चालत असल्यामुळे हा विषय निघाला नसणार! सौरमानाने वर्षे कशी मोजावयाची याचा खुलासा अर्थातच कोणी विचारला नाही वा कोणी केला नाही! महाभारतात इतरत्र तिथि, वार, महिना, नक्षत्र यांचे

विपुल उल्लेख पाहता या महत्वाच्या घटनेची तिथि कां सांगितलेली नाही हे एक कोडेच म्हटले पाहिजे!

अज्ञातवास –




पुष्कळ संकटे व हाल सोसून बारा वर्षांचा वनवास पांडव व द्रौपदी यांनी पुरा केला. पांडवांच्या इतर बायका व मुले वनवासात नव्हती. पणामध्ये त्यांचा समावेश नव्हता. पांडवांनी अनुद्यूताला सुरवात करताना द्रौपदीला पणातून वगळण्याची मागणी केली नाही. युधिष्टिराला, आपण पण हरलोच तर द्रौपदीही वनात आलेलीच बरी, असे वाटले असेल कारण ती स्वस्थ बसणार नाही व युद्ध टाळण्याचा उद्देश विफल होईल ही भीति होती! वनवासाचे अखेरीस पांडवांनी सर्व नोकर, सारथी, आश्रित, यांना निरोप दिला व सर्वजण गेल्यावर पांडव स्वतंत्रपणे दुसरीकडे गेले व काही काळ वनात भटकून मग विराटाच्या नगरात गेले. ज्या दिवशी पांडव  विराटासमोर व द्रौपदी सुदेष्णाराणीसमोर उभीं राहून चाकरीला लागलीं त्या दिवसापासून अज्ञातवास सुरू झाला असे म्हटले पाहिजे. या दिवशी कोणती तिथि व महिना होता याचा उल्लेख केलेला नाही! एक वर्षानंतर याच तिथीला अज्ञातवास संपावयाचा होता. तिथि सांगितलेली नसल्यामुळे तसे झाले काय हा प्रश्न शिल्लक राहतो.



विराटाच्या आश्रयाने आपण अज्ञातवासाचे एक वर्ष पुरे करू ही आशा पांडव बाळगून होते. वर्षापैकी बराचसा काळ, तसे पाहता निर्विघ्नपणे पार पडला. सर्वांना अर्थातच हाल अपेष्टा सोसाव्या लागतच होत्या. विराटाचा मेहुणा कीचक हा राजधानीला परतून सैरंध्री-द्रौपदी त्याच्या नजरेला पडली तेव्हांपासून अडचणी सुरू झाल्या. कीचकाला, ही द्रौपदी आहे याची कल्पना नव्हती. त्याच्या लेखी

ती फक्त एक सुंदर दासी होती. तिची अभिलाषा कीचकाने धरली हे सत्ताधीशांच्या वागणुकीशी सुसंगतच होते! कीचकाने विराटाच्या भर दरबारात, युधिष्टिरासमक्ष द्रौपदीचा घोर अपमान केला व त्याचा प्रतिकारही कोणाला करता आला नाही. हा अपमान न सोसून,



नाइलाजाने द्रौपदीने त्याच रात्री भीमाची भेट घेतली व कीचकाला मारून टाकण्याचा आग्रह केला. प्रथम भीमाने तिची समजूत घालून तिला 'दीड महिन्याचा काळ कसा तरी काढ' असे म्हटले. (विराटपर्व अ. २१/१६-१७). यावेळी अज्ञातवास संपण्यास तेवढा काळ बाकी होता असे यावरून दिसते. द्रौपदीने दीड महिन्याबद्दल शंका न काढतां भीमाला स्पष्ट सांगितले कीं 'एवढा काळ कीचकाचा छळ सोसत काढणे शक्य नाही. पुन्हा अपमान झाला तर मी प्राणत्याग करीन. पण पुरा होण्याची वाट पहात बसशील तर पत्नी गमावून बसशील तेव्हा लगेचच कीचकाला मार. ' द्रौपदीची अवस्था पाहिल्यावर व तिचा निर्धार ऐकल्यावर अज्ञातवास पुरा होण्याची वाट न पाहतां व युधिष्टिराशी चर्चा न करताच, दुसऱ्याच रात्री कीचकाला मारण्याचा बेत दोघानी ठरवला व पारही पाडला.

कीचकाचा व अनुकीचकांचाही भीषण वध झाल्यावर याला पर्यायाने द्रौपदीच कारण आहे हे जाणून, भीतीने, विराटाने पत्नी सुदेष्णा हिचेतर्फे द्रौपदीला 'राज्य सोडून जा' असा आदेश दिला. सुदेष्णेशी गयावया करून द्रौपदीने थोडा अवधि मागून घेतला तो मात्र फक्त तेरा दिवस! सुदेष्णेने द्रौपदीला कीचकाकडे मद्य आणण्यास पाठ्वले व तेथे तिचा घोर अपमान झाला त्या दिवसाची तिथि चतुर्दशी होती असा स्पष्ट उल्लेख सुदेष्णेच्या तोंडी आहे मात्र शुक्ल कीं कृष्ण पक्ष याचा खुलासा नाही. तसेच महिनाही सांगितलेला नाही. लगेच दुसऱ्या रात्री कीचकवध झाला तेव्हा साहजिकच पौर्णिमा वा अमावास्या होती. कीचकवधाच्या रोमहर्षक वर्णनावरून ती अमावास्या होती असे दिसते. तेथून पुढे तेरा दिवस शुक्लपक्ष चालू होता. सुदेष्णेची सूचना कीचकाचे सुतक संपल्यावर दिली गेली असे समजले तर तेरा दिवसांची मुदत कृष्णपक्षाच्या सप्तमी - अष्टमीपर्यंत पोचते. प्रत्यक्षात अर्जुन कौरवांबरोबर युद्धाला उभा राहिला व ओळखला गेला तो कृष्ण अष्टमीलाच. मात्र कीचकवधापासून २२ - २३ दिवसच लोटले होते. दीड महिना नव्हे! अज्ञातवासाचा उरलेला

काळ भीमाने दीड महिना म्हटला होता तो द्रौपदीने सुदेष्णेकडे मुदत मागताना २२-२३ दिवसांवर कसा आणला याचा खुलासा महाभारतकारानी केलेला नाही. पुढे या कमी केलेल्या काळाचा खुलासा सौरमानाने तेरा वर्षे पुरी झाली असा केला गेला.

कौरवांकडून पांडवांचा शोध :-

वनवासाचीं बारा वर्षे पुरी होऊन पांडव अज्ञातवासात गेल्यावर त्यांचा शोध करण्यासाठी कौरवांनी पुष्कळ हुशार माणसे सर्व दिशाना पाठवली होती. पांडवांचा शोध लागला असता तर द्यूताच्या अटीप्रमाणे, त्याना पुन्हा बारा वर्षे वनवासाला जावे लागले असते! मात्र त्यांचा शोध लागला नव्हता. कीचकाचा वध झाला त्यापाठोपाठच ते सेवक हस्तिनापुराला हात हलवीत परत आले होते. कीचकवध होऊन किती दिवस लोटले होते ते स्पष्ट सांगितलेले नाही. त्यामुळे भीमाने उल्लेखिलेल्या दीड महिन्याच्या काळापैकी किती दिवस शिल्लक होते? कौरवदरबारात भीष्मद्रोणांसमक्ष याची चर्चा झाली. ‘अज्ञातवासाचा थोडाच काळ शिल्लक उरला’, असे म्हटले गेले. मात्र २-३ दिवस उरले असे कोणी म्हटले नाही. घबराट उडाली नाही. सेवकाना पुन्हा शोधासाठी पाठवले गेले. भीष्मानी त्याना खुलासेवार सूचना दिल्या व विषय संपला! त्रिगर्तांचा राजा सुशर्मा, दुर्योधनाचा मित्र, दरबारात उपस्थित होता. त्याने कीचक मारला गेल्याच्या बातमीला दुजोरा देऊन सुचवले की राजा विराट आता दुर्बळ बनला आहे तेव्हा त्याचे गोधन लुटून आणण्याची संधी आली आहे. तेव्हा आपण दोन्ही दिशांनी हल्ला करावा. त्याची सूचना मान्य होऊन दुसऱ्याच दिवशी हल्ला करावयाचे ठरले. यावरून असे दिसते की कौरवाना अद्याप पांडवांच्या शोधाची निकड भासत नव्हती. अजून वेळ होता! भीष्मानेही, पांडव सौरमानाने तेरा वर्षे पुरी करण्याची शक्यता विचारात घेऊन, त्याचे गणित करून, प्रकरण २-३ दिवसांवर आले आहे असे म्हटले नाही. चांद्रमानाने तेरा वर्षे, द्यूताच्या तिथि/मासाची तेरा आवर्तने, हीच मर्यादा सर्वांच्या नजरेसमोर होती असे स्पष्ट दिसते. विराटावरच्या स्वारीत भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, कृप, सारेच नि:शंकपणे सामील झाले. तेथे अर्जुनाशी लढावे लागणार आहे याची कोणी कल्पनाही केली नव्हती!

त्रिगर्त - विराट युद्ध –

दुसऱ्याच दिवशी सुशर्म्याने दक्षिण दिशेने विराटावर स्वारी केली. या दिवसाच्या तिथीचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. युद्ध वर्णनात म्हटले आहे कीं सूर्यास्तानंतर

बऱ्याच वेळाने चंद्रोदय होऊन प्रकाश पडला. यावरून ही कृष्णपक्षाची सप्तमी-अष्टमी ठरते. पुढे दुर्योधनाचे तोंडी स्पष्ट उल्लेखच आहे कीं त्रिगर्तांनी सप्तमीला दुपारी हल्ला करण्याचे ठरले होते. विराटाचे बाजूने, अर्जुन सोडून इतर चारही पांडव युद्धात उतरले. मात्र युधिष्टिराने भीमाला सूचना दिली की 'इतर वीरांप्रमाणेच लढ, तुझ्या खास पद्धतीप्रमाणे, झाड उपटून लढू नको नाहीतर ओळखला जाशील. ' ओळखणे टाळता आले तर, अजूनही, तेरा चांद्रवर्षे पुरी करावीत असा युधिष्ठिराचा विचार असावा. पांडवांच्या मदतीने विराटाने त्रिगर्तांचा सपशेल पराभव केला व गायी सोडवून सर्वजण राजधानीला सकाळी परत आले. त्या आधीच, सकाळीच, कौरवांचा उत्तरेकडून हल्ला आला तेव्हा त्याचा प्रतिकार करण्यासाठी कुमारवयाच्या राजपुत्र उत्तराला जावे लागले. त्याचे सारथ्य करण्यासाठी बृहन्नडावेषातील अर्जुन, द्रौपदीच्या आग्रहावरून गेला. अर्जुन व द्रौपदी दोघानाही माहीत होते की कौरवांपुढे उत्तराचा मुळीच निभाव लागणार नाही व अर्जुनालाच लढावे लागणार आहे व तो लगेचच ओळखला जाईल. दोघानीही त्याची पर्वा केली नाही. सौरमानाने तेरा वर्षे आज सकाळीच पुरी झालेली आहेत अशी त्यांची खात्री असली पाहिजे. मग कौरवांचा समाचार घेण्याची संधि अर्जुन कशाला सोडील? अपेक्षेप्रमाणेच उत्तराची जागा अर्जुनाला घ्यावी लागली व जरी तो बृहन्नडा वेषांत होता तरी कौरवांनी त्याला लगेचच ओळखले. दुर्योधनाने ताबडतोब सांगून टाकले की 'हा अर्जुन ओळखला गेला आहे व अज्ञातवासाची मुदत पुरी झालेली नाही. तेव्हा त्यांना राज्य देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, त्यानी पुन्हा बारा वर्षे वनात जावे. ' (विराटपर्व अ. १ श्लोक १-७).

अर्जुनाला ओळखून भीष्म द्रोण व इतर कौरववीरही चकित झाले. द्रोण व दुर्योधन यांनी विचारल्यावरून यावेळी भीष्माने, प्रथमच, सौरवर्षाचा विचार करून अधिकमासांचे गणित मांडले. त्यांनी म्हटले की 'बारा चांद्रमासांचे चांद्रवर्ष व सौरवर्ष यांतील फरकामुळे पांच चांद्रवर्षांमध्ये दोन अधिकमास धरावे लागतात (५८ + २ = ६०). या हिशेबाने तेरा चांद्रवर्षांचे वर (१५६ चांद्रमासांचे वर) पांच महिने व बारा रात्री एवढा अधिक काळ मोजावा लागेल. द्यूताच्या दिवशीच्या संध्याकाळ पासून आज सकाळपर्यंत हा काळ पुरा झाला आहे!' भीष्माने बारा दिवस न म्हणतां बारा रात्री असे कां म्हटले? कारण वनवास द्यूत संपल्याबरोबर संध्याकाळी लगेच सुरू झाला व ती रात्र व कालची रात्र देखील विचारात घेऊन बारा रात्री पुऱ्या झाल्या होत्या व अज्ञातवास सौरमानाने, जेमतेम, पुरा

झाला होता! दुर्योधनाने हे गणित साफ धुडकावून लावले व 'मी पांडवांना राज्य मुळीच देणार नाही' असे साफ सांगितले. भीष्म, द्रोण वा इतर कुणीही यावर काही मतप्रदर्शन केले नाही.

सौरवर्ष व चांद्रवर्ष यांतील फरक जुळवून घेण्यासाठी भीष्माने सांगितलेली व सध्या प्रचलित असलेली पद्धति यांत थोडा फरक आहे. साधारणपणे दरेक चांद्रमासामध्ये सूर्य कोणत्यातरी दिवशी एका राशीतून पुढील राशीत प्रवेश करतो. त्या राशिनामावरून त्या महिन्याचे नाव ठरते. मात्र ज्या महिन्यामध्ये असे राशिसंक्रमण होत नाही तो महिना बिननावाचा, अधिक महिना होतो. साधारणपणे दर २८-२९ चांद्रमासांनंतर असा अधिक महिना येतो. महाभारतकाळी आपल्याकडे राशी नव्हत्या. नक्षत्रे होती. आपलीं महिन्यांची नावे नक्षत्रांवर आहेत. राशी पुष्कळ मागाहून, वराहमिहिराच्या काळी आल्या. सूर्याच्या भ्रमणमार्गाचे बारा समान भाग म्हणजे राशि. सूक्ष्म वेधाशिवाय राशिसंक्रमण निश्चित करणे पूर्वी शक्य नव्हते त्यामुळे आताची पद्धतही शक्य नव्हती. राशि ग्रीकांकडून आल्या असे म्हणतात. आपली व परदेशीयांची राशिनामेही त्यामुळे एकच आहेत. पूर्वी ५८ महिन्यांनंतर महिने व ऋतु यांचे संतुलन पूर्णपणे बिघडून जाई व मग दोन महिने एकदम अधिक घेऊन ते पुन्हा जुळवले जात होते (एकेक ऋतु दोन महिन्यांचा असतो) असा तर्क करणे सयुक्तिक वाटते. वनवास-अज्ञातवासाच्या तेरा वर्षांच्या काळात १५६ चांद्रमासांचेवर २ अधिक महिने तीन वेळा आले असले पाहिजेत. दोनच वेळां आले असते तर तेरा चांद्रवर्षे सौरवर्षांपेक्षा लवकर संपली असती व काही प्रश्नच उभा राहिला नसता ! पांडवांना सहा अधिक महिने मोजायचे होते. कीचकाचा वध करावा लागला नसता तर युधिष्ठिराने तसेच केले असते! पण त्रिगर्त-कौरवांच्या आक्रमणामुळे उघडकीला येण्याची पाळी आली. विराटाची बाजू घेणे भागच होते कारण त्याने वर्षभर आश्रय दिला होता. यावेळी बहुधा सहावा अधिकमास चालू होता. त्यामुळे तेरा सौरवर्षे सकाळी पुरी झाली आणि अर्जुन खुशाल प्रगट झाला! मात्र पांच महिने-बारा रात्री व सहा महिने यांतील फरक, १८-१९ दिवस कमी पडले हे नक्की!

अर्जुन व कौरव यांच्या युद्धप्रसंगाची तिथि व पक्ष स्पष्टपणे सांगितलेलीं नाहीत. दुर्योधनाने म्हटले की त्रिगर्तांच्या स्वारीची तिथि सप्तमी ठरली होती. कौरव दुसऱ्या दिवशी चालून आले म्हणजे त्या दिवशी अष्टमी होती. पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे कृष्णपक्ष चालू होता. ऋतु ग्रीष्म होता. (भीष्माचे तोंडीं तसा स्पष्ट उल्लेख आहे. ) अर्जुनाने शमीच्या झाडावरून शस्त्रे काढून घेतली हे खरे पण, काहींच्या समजुतीप्रमाणे, ही विजयादशमी

नव्हती! महिना, बहुधा, दुसरा अधिकमास चालू होता. द्यूत अनुद्यूताच्या प्रसंगाची तिथिही सांगितलेली नाही त्यामुळे या दिवशी तोच महिना व तीच तिथि नव्हतीच ही वस्तुस्थिति थोडीशी नजरेआड होते. पांडवांच्या दृष्टीने ही बाब अडचणीची होती म्हणून ती हेतुपूर्वक झाकली आहे काय असा प्रश्न पडतो. भीष्माने पांडवांनी केलेला हिशेब उलगडून दाखवला पण त्याचे उघडपणे समर्थन केव्हाच केलेले नाही. इतर कुणीही नाही. दुर्योधनाने या प्रसंगी व नंतर अखेरपर्यंत, पण पुरा झाल्याचे कधीच मान्य केले नाही.

युद्धापूर्वी अखेरचा प्रयत्न म्हणून कृष्णाने कौरवदरबारात पांडवांची बाजू मांडली तेव्हा त्यानेही 'पण पुरा केल्याचा पांडवांचा दावा आहे' एवढेच म्हटले त्याचे समर्थन केले नाही. धृतराष्ट्र, गांधारी व इतर अनेकांनी दुर्योधनाला युद्ध टाळ असा उपदेश केला पण 'पांडवांचा पण पुरा झाला आहे तेव्हा त्यांचे राज्य परत दिलेच पाहिजे' असे कोणीही म्हटले नाही! 'युद्धात तुझा सर्वनाश होईल' अशी भीति घातली. दुर्योधनाला माहीत होते कीं केव्हातरी पांडवांशी लढावे लागणारच आहे व त्यालाही खुमखुमी होतीच. यावेळी पांडवांची बाजू कच्ची असल्यामुळे भीष्म-द्रोण-कृप-अश्वत्थामा उघडपणे त्यांची बाजू घेण्याची शक्यता कमी होती. इतर राजांना समजावून आपल्या बाजूला वळवण्याची शक्यता होती. प्रत्यक्षात तसेच झाले. राजेलोकांनी जी बाजू पटली ती घेतली! भीष्माची पंचाईत झाली. पांडवांच्या बाजूला सरळ मिळणे कठीण होते. द्रुपद हा पांडवांचा प्रमुख पाठीराखा असल्यामुळे द्रोणाला कौरवांची बाजू घेणे प्राप्तच होते. कृप व अश्वत्थामा दुसरे काय करणार? बलरामाने कृष्णाला सरळच सांगितले की 'पांडवांच्या दुर्दशेला युधिष्ठिर स्वत:च जबाबदार आहे. आपल्याला दोन्ही पक्ष नातेसंबंधाने सारखेच आहेत तेव्हा आपण दूर राहणे योग्य!' युद्ध अटळ आहे असे दिसल्यावर, बलराम उद्विग्न होऊन यात्रेला निघून गेला. कृष्णाला <u>बलरामाशी मतभेद नको असल्यामुळे</u>, पांडवांच्या बाजूने प्रत्यक्ष युद्धात उतरणे शक्यच नव्हते! ' न धरी शस्त्र करी मी' यामागचे खरे कारण हे आहे! अर्जुनाचे सारथ्य करण्यालाही बलरामाने आक्षेप घेऊ नये यासाठी आपले सैन्य त्याने दुर्योधनाला दिले! कोणत्याही परिस्थितीत बलराम कौरवपक्षाला मिळणे, पांडवाना वा कृष्णाला, परवडणारे नव्हते!

सौरमान की चांद्रमान या वादात शास्त्र पांडवांचे बाजूने होते असे आज आपणाला वाटेल. पण जनव्यवहार चांद्रमानानेच चालत होता. भारतात हिंदु सत्ता आजतागायत चालू राहिली असती तर आजही कदाचित चांद्रवर्ष मान्यताप्राप्त असते.

रविवार ऐवजी चतुर्थी-एकादशीच्या सुट्या घेतल्या असत्या व दर २९ महिन्यानी आपण एक अधिक पगार घेतला असता! तेव्हा दुर्योधनाचा राज्य देण्यास नकार हा पूर्णपणे अन्यायाचा म्हणता येईल काय? प्रश्नच आहे!
पांडवांना शक्य झाले असते तर त्यानी सहा अधिक महिने पुरे केले असते हे नक्की. मात्र तरीही दुर्योधनाने राज्य परत दिले नसतेच, कारण तो त्याचा प्रथमपासूनचा ठाम बेत होता. मात्र मग, कदाचित युद्ध, एका बाजूस पांडव, पांचाल, विराट, कदाचित कृष्ण व यादव, शल्य व दुसऱ्या बाजूस कौरव, कर्ण, द्रोण, कृप, अश्वत्थामा व शकुनि, असे झाले असते!
लेखाच्या सुरवातीला उपस्थित केलेल्या काही प्रश्नांची उत्तरे याप्रकारे मिळतात असे म्हणतां येईल.

# पांडव विवाह

महाभारत हा भारताचा सांस्कृतिक ठेवा आहे. त्यांतील मुख्य कथा सर्वपरिचित आहे. पांच पांडव व एक द्रौपदी यांचा विवाह ही एक विलक्षण घटना आहे. एका स्त्रीचा पांचांशी विवाह हा आर्यांच्या आचारचौकटीत बसणारा नाही. इतिहास-पुराणात इतरत्र कोठेही अशी घटना आढळत नाही. भारताच्या उत्तरसीमेवरील काही लोकसमूहांमध्ये असा आचार अजूनही चालू आहे असे म्हणतात पण त्याला कोठेही प्रतिष्ठित समाजात मान्यता नाही. मात्र नवलाची गोष्ट ही कीं महाभारताचे नायक म्हणतां येतील अशा पांडवांशी ही घटना निगडित असूनही त्यामुळे त्याना गौणत्व आले असे दुर्योधन व कर्ण सोडून इतर कोणीही म्हणत नाही. इतर कोणी लेखक, विचारवंत वा टीकाकार आजही तसे म्हणत नाही. पांडव, द्रौपदी, व कुरु-पांचाल कुळांनी हा विवाह आनंदाने मान्य केला. पांडवांच्या वैवाहिक जीवनावर त्याची छाया पडलेली नाही. महाभारतांतील अनेक कोड्यांपैकी हे एक कोडे आहे. महाभारत वाचताना या घटनेचा सर्व तपशील चौकसपणे तपासला तर अनेक गोष्टी नजरेला येतात. त्यांचा परामर्ष घेताना मी अशी भूमिका घेतली आहे कीं ही माणसांची कथा आहे, देव वा राक्षसांच्या अवतारांची नव्हे. घडलेल्या घटना मूळ लेखकाने यथातथ्य नोंदल्या आहे पण जय चा महाभारत होताना कित्येक विसंगति भरल्या आहेत व त्या या विवाहाचे समर्थन करण्यासाठी आल्या आहेत. सर्व पात्रे मानवी आहेत ही भूमिका घेतली की काही गोष्टींचा खुलासा शोधण्यासाठी थोडे कल्पनास्वातंत्र्य घ्यावे लागते. या दृष्टिकोनातून पांडवविवाहाची पूर्वपीठिका तपासून पहावयाची आहे. सर्व पांडवकथा सुरवातीला पाहण्याची गरज नाही, ती सुपरिचित आहे. कौरव-पांडवांच्या शिक्षणसमाप्तीपासून सुरवात करूं.

द्रुपद व द्रोण हे बालपणीचे सहाध्यायी. द्रुपद राजा झाल्यावर द्रोण त्याला भेटायला गेला व जुन्या मैत्रीची आठवण दिली तेव्हा द्रुपदाने त्याला झिडकारले व तुझी माझी मैत्री आता शक्य नाही असे म्हणून त्याचा अपमान केला. तो भरून काढण्याची द्रोणाची तीव्र इच्छा होती. स्वत: द्रुपदाशी युद्ध करून त्याचा पराभव करण्यापेक्षां उत्तम शिष्य मिळवून त्यांचेकडून द्रुपदाला धडा शिकवणे त्याला जास्त श्रेयस्कर वाटले. शिष्यांच्या शोधात भटकत असतां भीष्माचे आमंत्रण स्वीकारून द्रोण कुरुदरबाराच्या आश्रयाला

राहिला व कौरव, पांडव व इतरही राजकुमारांना त्याने शिकविले. अर्जुनाकडून त्याच्या विशेष अपेक्षा होत्या. शिक्षण संपल्यावर गुरुदक्षीणा म्हणून द्रुपदाचा पराभव करा अशी शिष्यांकडे मागणी केली. प्रथम कौरव एकटेच लढले व हरले. नंतर पांडव युद्धात उतरले व अर्जुनाने अपेक्षेप्रमाणे द्रुपदाचा पराभव केला. अनेक पांचालवीरांचे काही चालले नाही. यांत द्रुपद, पुत्र सत्यजित व भाऊ होते. द्रुपदाच्या इतर पुत्रांचा, शिखंडीचाही, उल्लेख नाही. कुरु-पांचालांचे वैर नव्हते. हे युद्ध द्रोणामुळे झाले. द्रोणाने आपल्या अपमानाची भरपाई म्हणून अर्धे राज्य मागून घेतले व द्रुपदाला सोडले. प्रत्यक्षात द्रोण काही राज्य करावयास गेला नाही तेव्हा अपमानाची भरपाई व द्रुपदाशी बरोबरी एवढाच त्याचा अर्थ होता. या युद्धानंतर द्रुपदाने हाय खाल्ली. स्वबळावर द्रोणाला व त्याच्या शिष्यांना धडा शिकवणे शक्य नाही हे जाणून तो फार उद्विग्न झाला. आपल्या पराभवाचा बदला घेऊ शकेल अशा पुत्राच्या प्राप्तीसाठी त्याने यज्ञ केला. यज्ञाचे फळ म्हणून त्याला पुत्र धृष्टद्युम्न व कन्या द्रौपदी मिळालीं. या यज्ञाची कथा तपासली पाहिजे.

अर्जुनाकडून झालेल्या पराभवानंतर किती काळाने हा यज्ञ झाला ते सांगितलेले नाही. द्रुपदाने पराभवाचा बदला घेईल अशा शूर पुत्राचीच इच्छा धरली होती. यज्ञाचा हविर्भाग द्रुपदपत्नीला देण्याची वेळ आली तेव्हां तुला पुत्र व कन्या दोन्ही मिळणार आहेत असे मुनि म्हणाले. रजस्वला असल्यामुळे राणीने हविर्भागाचा स्वीकार केला नाही. तिच्यासाठी न थांबता हवि यज्ञातच अर्पण केला व मग अग्नीतून धृष्टद्युम्न व द्रौपदी बाहेर पडलीं. यज्ञ पुरा होण्याच्या वेळी पट्टराणी तयार नव्हती हे जरा चमत्कारिकच वाटते. यज्ञाचे फलित म्हणून खुद्द तिला अपत्य न होतां कुमारवयाची अपत्ये निर्माण कां झालीं याचें हें एक लंगडे समर्थन वाटते!

सर्व पात्रे मानवी आहेत अशी भूमिका घेतली तर धृष्टद्युम्न व द्रौपदी यांचा जन्म यज्ञातून झाला ही कल्पना सोडून द्यावी लागते. या कथेतील सर्व अद्भुत भाग दूर सारला तर हीं दोघे प्रत्यक्षात द्रुपदाचींच (कदाचित अनार्य स्त्री पासून झालेलीं!) अपत्यें असावीं पण अद्याप त्यांचा राजकुळात समावेश नसावा व यज्ञ करून द्रुपदाने तो ब्राह्मणांच्या व नागरिकांच्या साक्षीने व संमतीने सन्मानपूर्वक करून घेतला, असे या कथेचे मूळ स्वरूप मला वाटते. दोन्ही मुलांचा कृष्णवर्ण हेच सुचवतो. द्रुपदाला हा यज्ञ करण्यासाठी प्रथम कोणी ब्राह्मण मिळत नव्हता. याज व उपयाज अशी एक ब्राह्मणांची जोडी होती. द्रुपदाने प्रथम उपयाजाला विचारले. त्याने नकार दिला पण सुचवले की 'तू याजाला विचार, तो योग्यायोग्य फारसे पाहत नाही. तो तुझा यज्ञ करील!' असे दिसते की यज्ञाला ब्राह्मण अनुकूल नव्हते व याजाने तो बहुधा द्रव्यलोभाने करून दिला! यज्ञ करण्याचा

हेतु वर तर्क केल्याप्रमाणे असेल तर हे सयुक्तिक वाटते! पूर्वी दशरथाने पुत्रांसाठी यज्ञ केला त्याला कोणी गौण मानले नव्हते. मात्र एकदा याजाने यज्ञ करून दिल्यानंतर, दोन्ही अपत्ये द्रुपदाच्या घरात व समाजातही सन्मानाने स्वीकारली गेली तेव्हा द्रुपदाचा हेतु सफळ झाला असे म्हणावे लागते. यज्ञामुळे स्वत:ला अपत्य झाले नाही याचा विषाद न मानता, राणीने याजाला विनवले की यांनी मलाच आई म्हणावे. यावरून असे वाटते कीं त्यांची खरी आई हयात नसावी. यांनी स्वत:च्या खऱ्या आईला विसरावे अशीही इच्छा तिने व्यक्त केली. जणू तिने त्यांना दत्तक घेतले! धृष्टद्युम्न यानतर द्रोणापाशी धनुर्विद्या शिकला असे मानले जाते. ते खरे वाटत नाही. कौरव-पांडवांचे शिक्षण पुरे झाले होते. द्रोणाचा बदल्याचा हेतुही पुरा झाला होता. त्याची अकादमी केव्हाच बंद झाली होती!

द्रुपदाच्या पराभवानंतर धृतराष्ट्राने युधिष्ठिराला यौवराज्याभिषेक केला. नंतर बऱ्याच काळाने पांडव वारणावतास गेले व एक वर्ष तेथे राहून मग वाड्याला लागलेल्या आगीतून बचावून वनात पळून गेले. तोपर्यंत द्रुपदाचा हा यज्ञ झाला नव्हता. कारण द्रौपदीची ही जन्मकथा पांडवांना, वनात तिच्या स्वयंवराची वार्ता कानी येईतोवर, माहीतच नव्हती. द्रुपदाच्या पराभवानंतर बऱ्याच काळाने हा यज्ञ झाला या तर्काला यावरून पुष्टि मिळते. तेव्हा इतक्या वर्षांनंतर द्रोणाने पुन्हा सुरवात करून धृष्टद्युम्नाला शिकवले असणे संभवत नाही. पांडवांनी लाक्षागृह सोडल्यानंतर काही काळाने द्रुपदाचा यज्ञ झाला व त्यावेळी द्रौपदी कुमारी होती तेव्हा पांडव व द्रौपदी यांच्या वयात बराच फरक होता असेही दिसते!

द्रौपदीच्या स्वयंवराची व रूपगुणांची बातमी पांडवांच्या कानी आली तेव्हा ते एकप्रकारे अज्ञातवासातच होते. ते वारणावताच्या आगीत जळून मेले अशीच हस्तिनापुरात समजूत होती. भीष्माने त्यांचे और्ध्वदैहिकही केले होते! आपण प्रगट व्हावे की नाही हा त्यांच्यापुढे प्रश्नच होता. मग आपण स्वयंवराला कसे जावे हा प्रश्न होता. त्यांचे मनोगत जाणून कुंतीने धोका पत्करून पांचालदेशाकडे जाण्याचे ठरवले. पांडवांना पांचालनगरात व्यास भेटले व द्रौपदी तुमची पांचांची पत्नी होईल असे त्यानी पांडवांना सांगितले असे अ. १६९ मध्ये म्हटले आहे. हे मागाहून घुसडलेले स्पष्ट दिसते. कारण पुढील अध्यायात वनात पांडवाची चित्ररथाशी गाठ पडली व अर्जुनाने त्याचा अस्त्रबळाने पराभव केला व पांडव पुन्हा पांचालदेशाला निघाले असे वर्णन आहे. अध्याय १८५ मध्ये पुन्हा व्यास भेटले. मात्र येथे द्रौपदी तुम्हा पाचांची पत्नी होईल असे त्यानी म्हटलेले नाही. द्रुपदाने द्रौपदीचे स्वयंवर योजले होते व पण असा लावला होता की अर्जुनासारख्या अद्वितीय धनुर्धरालाच तो जिंकता येईल. यामागे त्याचा काय हेतु होता?

अध्याय १८५-श्लोक ८-१० मध्ये म्हटले आहे कीं द्रुपदाची खरी इच्छा द्रौपदी अर्जुनाला द्यावी ही होती. अर्जुनाला हरवतां येत नाही व त्याशिवाय द्रोणाचा पराभव शक्य नाही, या पेचातून सुटका होण्यासाठी अर्जुनाला जामात करून घेणे हा एकच मार्ग होता. पण अडचण ही होती कीं पांडव तर लाक्षागृहात जळून मेले असे जाहीर झाले होते. पण तरीही जर पांडव जिवंत असलेच तर, अवघड पणाचे आव्हान स्वीकारून, अर्जुन पुढे येईलच आणि तो जिवंत नसलाच तर मग जो कोणी वीर पण जिंकेल तो महावीरच असेल व द्रोणाविरुद्ध तो उपयोगी पडेलच, या विचाराने मत्स्यवेधाचा पण लावलेला होता. स्वयंवराला आलेले लोक १५ दिवस मंडपाची शोभा पाहत होते व मत्स्ययंत्रही निरखत होते. सोळाव्या दिवशी सुरवातीलाच धृष्टद्युम्नाने केलेल्या घोषणेत, पण जिंकण्याबरोबरच थोर कुळात जन्म, देखणा व बलवान असणे याही अटी स्पष्ट सांगितल्या. द्रौपदीने कर्णाला नाकारले ते अनपेक्षित खासच नव्हते. कर्णानेच हात दाखवून अवलक्षण करून घेतले होते! अध्याय १८७ मध्ये ब्राह्मण समुदायात, त्याच वेषात बसलेल्या पांडवाना कृष्णाने ओळखले व बलरामाला खुणेने दाखवले असे म्हटले आहे. पांडव लाक्षागृहातून वाचले असावेत अशी कृष्णाला आशा वा माहिती असावी, म्हणून इतर कोणाचे नाही पण त्याचे, पांडवांकडे लक्ष गेले असावे. खरे तर या प्रसंगापूर्वी पांडव व कृष्ण यांच्या भेटीचा एकही उल्लेख महाभारतात नाही. कृष्ण कंसवधापर्यंत गोकुळात दडून होता. नंतर दीर्घकाळ जरासंधाशी युद्ध, द्वारकेला स्थलांतर, रुक्मिणीस्वयंवर, या घटनांत व्यग्र होता. पांडवांची भेट होण्याची वेळच आली नव्हती. तेव्हां तर्कानेच ओळखले असावे.
पणाचे धनुष्य सज्ज करतानाच जरासंधासारख्याचेही बळ पुरले नाही याचा अर्थ बळापेक्षा हा कौशल्याचा प्रश्न होता. कर्ण ते करू शकला असता, पण तो पडला सूतपुत्र! द्रौपदीने स्वत:च सांगून टाकले कीं मी सूतपुत्राला वरणार नाही. कर्णानंतर कृष्ण, यादव, कौरव वा इतर कोणा क्षत्रियवीराने प्रयत्नही केला नाही. अखेर ब्राह्मणवेषातील अर्जुनाने पण जिंकल्यावर द्रुपद हर्षभरित झाला. हा अर्जुनच अशी त्याची खात्री झाली. कृष्णाच्या कानावर आलेली बातमी द्रुपद व धृष्टद्युम्न यानाही माहीत होती. अध्याय १९३ श्लोक ९-१३३ मध्ये तसा स्पष्ट उल्लेख आहे. खुद्द कौरवांकडे मात्र विदुर सोडून इतर कोणाला, भीष्मालाही, पांडव जिवंत असल्याची शंका नव्हती.

एका ब्राह्मणकुमाराने पण जिंकल्यामुळे मंडपात कोलाहल झाला. पांडवांना अजूनही कोणी ओळखले नव्हते. तेव्हाच, युधिष्टिर, नकुल व सहदेव, राजेलोकांच्या क्षोभाला

तोंड देण्याचे काम भीमार्जुनांवर सोडून देऊन, त्वरेने (महाभारतांतील शब्दप्रयोग) मुक्कामाचे ठिकाणी निघून गेले. ही त्वरा कोणती होती? राजेलोकांच्या युद्धेच्छेला भीमार्जुनानी तोंड दिले. भीमाने एक झाडच उपटून सर्वांना झोडपले. अखेर कृष्णाने सर्वांना समजावले की या ब्राह्मणाने धर्मानेच पण जिंकला आहे तेव्हा युद्ध पुरे करा. युद्ध थांबले. भीम, अर्जुन व पाठोपाठ द्रौपदीही मुक्कामाचे ठिकाणी परतलीं. युधिष्ठिर आधीच परतला होता व अर्जुनाने पण जिंकला आहे व भीमार्जुनांबरोबर द्रौपदीही येणार आहे हे कुंतीला कळलेच होते. मध्ये भरपूर वेळही गेला होता. यापुढचा परिचित नाट्यप्रसंग हा एक बनाव होता व त्यामागचा हेतु वेगळाच होता.

भीम-अर्जुन परत आल्यावर बाहेरूनच त्यांनी 'भिक्षा आणली आहे' असे कुंतीला म्हटले व तिने 'पाचांत वाटून घ्या' असे म्हटले. द्रौपदी दृष्टीला पडल्यावर मग तिने युधिष्ठिराला, 'आता तूच योग्य काय ते ठरव' म्हटले. त्याने प्रथम अर्जुनालाच 'तूच द्रौपदीशी विवाह कर' म्हटले. त्याने 'प्रथम तुझा, मग भीमाचा व मग माझा विवाह होणे उचित तेव्हा तूच विचार कर' असे म्हटले. विचारांती त्याने द्रौपदी पांचांची पत्नी होईल असा निर्णय दिला. हा सर्वपरिचित कथाभाग एक बनाव वा नाटक होते व त्याच हेतु वेगळाच होता, पांचांनी द्रौपदीला वरावे असे कुंती व पांडवांचे पूर्वीच ठरलेले होते असे वाटते.

यानंतर लगेचच कृष्ण व बलराम आले व आपली ओळख देऊन इतर कुणाला हे पांडव आहेत हे एवढ्यात कळू नये म्हणून घाईने परत गेले. पाठोपाठ धृष्टद्युम्न येऊन, गुपचुप, पांडवांची व द्रौपदीची हालहवाल पाहून गेला. त्याने द्रुपदाला पांडवाचे आचारविचार, बोलणीं यावरून हे पांडवच आहेत असे म्हटले व आपला हेतु सफळ झाला असे सांगितले.

रात्र उलटली. सकाळी द्रुपदाचा पुरोहित येऊन युधिष्ठिराला भेटला व 'आपण पांडवच ना?' असे विचारले. युधिष्ठिराने मुत्सद्देगिरीने 'ज्याने पण जिंकला तो सामान्य माणूस नव्हेच, द्रुपदाला इच्छेप्रमाणे उत्तम जावई मिळाला आहे' असे ऐकविले पण स्पष्ट ओळख दिली नाही व पांचांचा द्रौपदीशी विवाह करण्य़ाचा बेत मुळीच कळू दिला नाही. पांडव द्रुपदाच्या वाड्यावर गेल्यावर त्यांच्या चालचलणुकीवरून द्रुपदाची खात्रीच पटली कीं हे पांडवच. त्याने स्पष्टच विचारल्यावर युधिष्ठिराने सर्वांची ओळख करून दिली. द्रुपदाने

वारणावताची हकीगत समजून घेतली, धृतराष्ट्राची निर्भर्त्सना केली व पांडवांना त्यांचे राज्य मिळवून देण्यासाठी सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. यानंतर द्रुपदाने म्हटले की आजच अर्जुनाने द्रौपदीचे पाणिग्रहण करावे. येथून घोटाळ्याला सुरवात झाली! प्रथम युधिष्ठिराने म्हटले की मलाही विवाह करावयाचा आहे. त्यावर द्रुपदाने त्याला व इतर पांडवांना, 'माझ्या वा माझ्या कुळातील इतर कोणाच्याही, कन्या तुम्ही पसंत करा. ' म्हटले. मात्र द्रुपदाची सूचना न स्वीकारतां युधिष्ठिराने 'आम्हा पाचही भावाना द्रौपदीशी विवाह करावयाचा आहे' असे म्हटले! हे ऐकून द्रुपद हतबुद्धच झाला. 'ही धर्मविरुद्ध, वेदविरुद्ध व जगरहाटीविरुद्ध गोष्ट करावी असे तुला वाटतेच कसे?' असे त्याने म्हटले. यावरचे युधिष्ठिराचे उत्तर अतिशय महत्वाचे आहे. त्यात त्याच्या विचारांचा पाया कशावर आधारला आहे हे दिसून येते. त्याने तीन-चार गोष्टी मांडल्या. १. धर्माची गति गहन आहे. २. माझी वाणी असत्य बोलत नाही ३. माझ्या आईचा माझ्यासारखाच विचार आहे. ४ हा प्राचीन काळापासूनचा आमच्या पूर्वजांचा आचार आहे. ५. हा शाश्वत धर्म आहे. नवलाची गोष्ट म्हणजे हे विचार ऐकल्यावर द्रुपदाने हात झटकले व 'तू, तुझी आई व धृष्टद्युम्न काय ते ठरवा' असे म्हटले! द्रौपदीची काय इच्छा आहे हे कोणीच विचारले नाही! या वेळी नेमके व्यासांचे आगमन झाले.

द्रुपदाने प्रश्न त्यांच्यासमोर मांडला व हा माझ्या दृष्टीने निव्वळ अधर्म आहे असे म्हटले. धृष्टद्युम्नाने तेच म्हटले. युधिष्ठिराने पुन्हा आपल्या मनाचा व आईच्या मताचा निर्वाळा दिला व कुंतीनेही त्याला दुजोरा दिला. यावर व्यासांनी 'हा सनातन धर्म आहे व हे कसे ते मी तुला एकट्यालाच सांगतो' असे म्हटले. मग एकांतात व्यासानी द्रुपदाला द्रौपदीची पूर्वजन्मीची कथा सांगितली. पांडव हे इंद्र, द्रौपदी ही लक्ष्मी, द्रौपदीने तप करून उत्तम पति दे असा वर पांच वेळा मागितला व शंकराने तो दिला. पांच वरांचे फळ म्हणून पांच पांडवांचा व द्रौपदीचा विवाह हा देवांनीच, विशेषत: शंकरानेच, योजलेला आहे असे बरेच काही सांगितले! यावर बोलण्यासारखे काही न उरल्यामुळे 'शंकरानेच हे योजले असेल तर मग हा धर्म असो वा अधर्म, माझ्याकडे दोष नाही' असे म्हणून, अजूनही द्रौपदीला न विचारतांच, द्रुपदाने विषय समाप्त केला! त्यानंतर पांचही पांडवांचा एकेका दिवशी क्रमाक्रमाने द्रौपदीशी विवाह झाला. द्रुपदाने अनेक अहेर केले. नवल म्हणजे पांडवाचे तर्फे कौरव, यादव वा इतर कोणीही उपस्थित नव्हते. कृष्णाने अहेर पाठवून दिले. विवाहांची

बातमी स्वयंवराला जमलेल्या राजेलोकांना गुप्तदूतांकडून कळली! पांडव लाक्षागृहांतून वांचल्याचे कळल्यावर या राजांनी कौरवांची, खुद्द भीष्माचीही, निंदा केली व सर्व परत गेले. कौरवही पांडवांना वांचलेले पाहून चरफडत हस्तिनापुराला परत गेले. अशा प्रकारे हा लोकविलक्षण विवाह पांडव व द्रुपद यांनी गुपुचूप उरकून घेतला! प्रत्यक्ष विवाहाची कथा येथे संपली.


आतां या सर्व कथेतील अद्‌भुत भाग दूर सारला तर काय उरते? असे दिसते कीं द्रौपदीची कीर्ति, व स्वयंवराचा पण कळल्यावर तो जिंकणे फक्त अर्जुनालाच साधणार आहे हे स्पष्ट होते. सर्व पांडवांना तिचा मोह पडला आहे हे कुंतीला दिसत होते. युधिष्ठिराचा व तिचा प्रथमच विचार ठरला असावा कीं अर्जुनाने पण जिंकला की पांचही पांडवांनी तिच्याशी विवाह करावा. व्यास स्वयंवरापूर्वी भेटले तेव्हांच याची चर्चा झाली व पांडवांची पूर्वपीठिका माहीत असल्याने व्यासानी मान्यता दिली. अर्जुनाने पण जिंकल्याबरोबर युधिष्ठिर, नकुल व सहदेव घाईघाईने परत आले ते आता पुढे कसे-काय करावे हे कुंतीशी ठरविण्यासाठी! कुंतीला भीम-अर्जुन द्रौपदीला घेऊन आले आहेत हे माहीतच होते. तेव्हां भिक्षा पांचांत वांटून घ्या वगैरे संवाद हा द्रौपदीला राजी करण्यासाठी होता. अर्जुनही मुकाट्याने तयार झाला त्याअर्थी सर्व बेत आधीच ठरला होता हे उघड आहे. मोठ्या भावाचा प्रथम विवाह झाला पाहिजे ही अडचण हिडिंबेच्या वेळी आली नव्हती! हिडिंबा ही सर्वांच्या मनात भरण्यासारखी नव्हती वा भीमाची पत्नी होऊन राजवाड्यात येणार नव्हती!. पण द्रौपदीची गोष्ट वेगळी होती. ती आपल्या बेताला प्रतिकूल नाही हे दिसल्यावरच युधिष्ठिराने आपला बेत द्रुपदाला सांगितला. त्याने तो अखेर कां मानला? युधिष्ठिराचा मुख्य भर, हा आमच्या पूर्वजांचा प्राचीन आचार आहे यावर होता. कुरुकुळाच्या इतिहासात बहुपतित्वाच्या आचाराची कोणतीही कथा महाभारतात नाही. मग युधिष्ठिराच्या विधानाचा अर्थ काय व व्यासांनी काय सांगून द्रुपदाला राजी केले व द्रौपदीही कां तयार झाली? याचे मूळ पांडवांच्या खऱ्या जन्मकथेत शोधावे लागते. पांडव हे पांडुचे पुत्र नव्हते असें महाभारतच म्हणते. पांडव मनुष्य, तेव्हा त्यांचा देवांपासून जन्म ही अद्‌भुत कल्पना सोडून दिली तरच या गोष्टीची संगति लागते. आपल्याला संतति होणार नाही हें नक्की कळल्यावर पांडु, कुंती व माद्री उत्तर दिशेला गेलीं. कुरुवंश हे सोमवंशीय आर्य व त्याचा उगम या भागातील. भारताच्या या अति उत्तर भागामध्ये काही जमातींमध्ये बहुपतित्वाची चाल अद्यापही प्रचलित आहे. त्या काळी ती असणारच. जेव्हा नियोगमार्ग पत्करण्याची वेळ आली तेव्हां पांडूला आपल्या मूळ पूर्वजांच्या या आचाराची आठवण आली असावी. म्हणून

कुंती व नंतर माद्री यांनी कुरुकुळाशी संबंधित अशा एकाच कुटुंबातील ४ किंवा ५ भावांपासून पुत्रप्राप्ति करून घेतली असावी. युधिष्ठिर मोठा, तेव्हां त्याला या गोष्टीची थोडीफार कल्पना असेल. हा पूर्वीचा आचार स्वत: कुंतीने पाळला असल्यामुळे, आपल्या पांच पुत्राना एकत्र ठेवण्यासाठी, द्रौपदीसारखी एक समान पत्नी उपयुक्त ठरेल या विचाराने तिने व पांच पांडवानी हा बेत एकविचाराने घडवून आणला. पांडवजन्माची ही खरी कथा व्यासांना माहीत असल्यामुळे, एकांतात ती द्रुपदाला सांगून, युधिष्ठिर म्हणतो आहे त्याप्रमाणे हा त्याच्या खऱ्या पूर्वजांचा आचार आहे व त्याप्रमाणे त्यांना करावयाचे असेल तर करू दे असे पटविले असावे. द्रौपदीची संमति कोणी विचारली नाही हे खरे पण विवाहानंतर सर्व आयुष्यात तिने एकदाही या अपवादात्मक विवाहाबद्दल असंतोष, राग वा नाराजी व्यक्त केली नाही. त्याअर्थी तिलाही तो मान्य होता. याचाही उलगडा सहजीं होत नाही. तिच्या (खऱ्या) आजोळच्या (कदाचित अनार्य) कुळातही असा बहुपतित्वाचा आचार, अपवादाने कां होईना, पाळला जात असेल तर व्यासांनी तीही पूर्वपीठिका तिला व द्रुपदाला सांगितली असेल असा तर्क करावा लागतो. बुध्दिमती, सडेतोड व निर्भीड द्रौपदीने, तिला पटले नसते तर, कर्णाला झिडकारले तसा युधिष्ठिराचा विचारही, झिडकारला असता व मग युधिष्ठिरालाही आपला हेका चालवतां आला नसता! तेव्हा द्रौपदीही आनंदाने तयार झाली असे मानले पाहिजे. कुरुकुळातील कोणीही, खुद्द दुर्योधनही, (द्यूतोन्माद सोडल्यास), या विवाहाबद्दल कुत्सित बोलले नाहीत. यादवांनीही गैर मानले नाही. त्याअर्थी त्याना पांडवांची खरी जन्मकथा ठाऊक असावी व हे मागील पानावरून पुढे चालू आहे तेव्हा हरकत नाही असे त्यानी मानले असावे. पांच पांडव व द्रौपदी यांच्या या अपवादात्मक विवाहाची ही माझ्यामते खरी कथा आहे.



पांडवांचा द्रौपदीशी संसार पुढे कसा चालला याही विषयाला अनेक पदर आहेत. सर्व पांडवांनी इतरही विवाह केले. भीमाचा हिडिंबेशी संबंध पूर्वीच आला होता व

त्याला घटोत्कच हा पुत्रही झाला होता. मात्र त्याचा दुसऱ्या कोणा स्त्रीशी विवाह झाल्याचा उल्लेख नाही. युधिष्ठिर, नकुल व सहदेव यांचे दुसरे विवाह कधी झाले त्याचा उल्लेख नाही पण ते झाले हे नक्की. अर्जुनाचे तर अनेक विवाह झाले. पांडव-द्रौपदी विवाहानंतर, पांडव इंद्रप्रस्थाला राज्य करू लागल्यावर, एकदा नारद त्यांच्या भेटीला आले असतां त्यांनी सुंदोपसुंदांची कथा त्याना सांगून पत्नीवरून तुमच्यांत वितुष्ट येऊ देऊ नका असा सल्ला दिला. पांडवांनी स्वत:च, यासाठी नियम केला की एका भावाच्या द्रौपदीशी एकांताचा दुसऱ्याने भंग केला तर अपराध्याने तीर्थयात्रा करावी व ब्रह्मचर्य पाळावे. किती काळ ते स्पष्ट नाही. नारदाने याला संमति दिली. मात्र पांच भावानी द्रौपदीचे पतित्व, एकमेकांशी वितुष्ट येऊ न देता, कसे उपभोगावे याबद्दल या नियमात काहीच सांगितलेले नव्हते! फक्त एकांतभंगाला शिक्षा ठरवून दिली होती. पण मग, हा वेळपर्यंत व येथून पुढेही आयुष्यभर, पांडव कोणता नियम पाळत होते? याचा स्पष्ट उल्लेख कोठेच केलेला नाही! बहुपतित्वाचा रिवाज पाळणाऱ्या समाजात अजूनही जी चाल आहे असे म्हणतात व जी नैसर्गिक म्हणावी लागेल, ती म्हणजे एकेका भावाने क्रमाक्रमाने, पतित्व उपभोगावे व अपत्यजन्मानंतर पतिहक्क पुढील भावाकडे जावा. संततीच्या पितृत्वाबद्दल निरपवादित्व असण्यासाठी ही चाल योग्यच म्हटली पाहिजे. पांडवांनीही अर्थातच हाच क्रम चालवला असला पाहिजे. अर्जुन तीर्थयात्रेला गेला तोपर्यंत द्रौपदीला अपत्यप्राप्ती झालेली नव्हती. युधिष्ठिरापासून व मग भीमापासून तिला अपत्य झाल्यावर मग अर्जुनाचा क्रम येणार होता!



हा वेळपर्यंत त्याचा इतरही कोणाशी विवाह झालेला नव्हता. त्यामुळे वैतागून जाऊन, द्रौपदीसाठी वाट पहात बसण्यापेक्षा बाहेर पडावे हे बरे, असे त्याने ठरविले असावे. चोरांपासून ब्राह्मणांच्या गायी सोडवण्यासाठी शस्त्रागारात जावे लागून युधिष्ठिर-द्रौपदी यांचा एकांत भंग केल्याचे कारण

त्याला आयतेच मिळाले. नियमच केलेला असल्यामुळे त्याला अडवताही आले नाही! ठरलेल्या नियमाप्रमाणे, खरे तर त्याने तीर्थयात्रेच्या काळात ब्रह्मचर्य पाळावयास हवे होते. ते त्याने अजिबात पाळले नाही. उलुपी व चित्रांगदा यांचेशी त्याने विवाह केले. चित्रांगदेला बभ्रुवाहन हा पुत्रही झाला. मात्र तीं दोघें तिच्या पित्याच्या घरीं राहिली. अर्जुन पुन्हा एकटाच! तीर्थयात्रेच्या अखेरीला तो द्वारकेला गेला असतां सुभद्रा त्याला दिसली व आवडली. बलरामाची संमति मिळणार नव्हती, तेव्हा कृष्णाच्या सल्ल्याप्रमाणे, त्याने सुभद्रेला सरळ पळवून नेली. अर्जुनाशी कोण लढणार, तेव्हा यादव अखेर कबूल झाले. मात्र विवाह करण्यापूर्वी दूत पाठवून युधिष्ठिराची संमति विचारली. बहूधा अर्जुनाला भीति वाटली असावी कीं ही पण पांचांची पत्नी होणार नाही ना? सुभद्रेला घेऊन तो इंद्रप्रस्थाला परत आला. लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे अर्जुनाने नाही पण इतर पांडवांनी या काळात बहुधा ब्रह्मचर्य पाळले असावे! कारण अजूनही द्रौपदीला अपत्य झालेले नव्हते! सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु जन्मल्यानंतर मात्र, एकएक वर्षाच्या अंतराने, तिला एकेका पांडवापासून एकेक पुत्र झाला. यावरून स्पष्ट दिसते की पांडवानी वर उल्लेखिलेला रिवाजच पाळला.

तेथून पुढे जीवनाच्या अखेरीपर्यंत द्रौपदी सर्व सुखदु:खात, हाल अपेष्टांत, तसेच ऐश्वर्यांत, पांडवांची पत्नी व सखी झाली. कुंतीचा या विवाहामागे जो पांचांना एकत्र ठेवण्याचा हेतु होता तो निश्चितच सफळ झाला. पांडवांचे उदाहरण इतर कोणी गिरवल्याचे मात्र दिसून येत नाही. असा संसार यशस्वी करणे हे लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांनाच शक्य, येरागबाळाचे काम नोहे हे त्याचे कारण म्हणतां येईल.

## जरासंध वध

महाभारतातील श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा दुहेरी आहे. श्रीकृष्णाचे मानवी पातळीवरील लोकोत्तर गुणावगुणांचे चित्रण व दैवी पातळीवरील चित्रण. मानवी पातळीवर तो वीर पुरुष, राजनीतिज्ञ, मुत्सद्दी, विचारी, तत्त्वज्ञ असा वर्णिला आहे तर दैवी पातळीवर प्रत्यक्ष अवतार व अनेक अद्‌भुत कृत्ये करणारा! 'जय' चे 'महाभारत' होत गेले तसे लोकोत्तर पुरुष म्हणून असलेले महत्त्व कमी होत जाऊन ईश्वराचा अवतार या कल्पनेला जास्त उजाळा मिळत गेला असावा. त्याचे मानवी पातळीवरील चित्रण हे माझ्या मते जास्त मनोहारी आहे!

जरासंध हा कृष्णाचा शत्रू, पांडवांचा नव्हे! पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या निमित्ताने कृष्णाने त्याचा भीमाकडून वध घडवून आणला. या घटनेमध्ये कृष्णाचे मानवी पातळीवरील लोकोत्तर गुणावगुण प्रगट झालेले दिसतात.

कृष्ण व पांडव यांची प्रथम भेट द्रौपदीच्या स्वयंवराच्या वेळी झाली हे आपण पाहिलेच आहे. बाळपणापासून भीम हा महाबलवान असल्याच्या कथा सर्वश्रुत झाल्या होत्या. अनेक कौरवांना तो एकटाच भारी पडे. यामुळे दुर्योधन त्याचा द्वेष करीत असे. ही पार्श्वभूमि कृष्णाला ऐकून माहिती असणारच. वारणावतातून सुटून गेल्यावर वनांत हिंडताना हिडिंब व बकासुर या दोन महाबलवानांचा त्याने निव्वळ शरीरबळावर वध केला होता. हे वध कोणी केले हे आधी नक्की कळलेले नसले तरी पांडवांचा परिचय झाल्यावर ते कृष्णाला कळले होते. अर्जुनाने पण जिकल्यावर इतर राजांशी युद्ध करावे लागले तेव्हा एक झाड उपटून घेऊन भीमाने सर्वांना झोडपलेले कृष्णाने स्वत:च पाहिले होते. या साऱ्या गोष्टीतून कृष्णाने मनाशी काही आडाखे बांधले असावे पण तो योग्य संधीची वाट पाहात होता. त्याच्यापुढे एक मोठा प्रश्न होता!

कृष्णाने कंसवध करून आजोबा उग्रसेन याला मथुरेच्या राज्यावर स्थापन केले. कंस हा जरासंधाचा जावई. जावयाच्या वधाने चिडलेल्या जरासंधाने तेव्हापासून वारंवार मथुरेवर हल्ले करून यादवांना सतावले होते. अठरावेळा युद्ध होऊनही कोणालाच निर्णायक विजय मिळाला नव्हता. मात्र यादवांची खात्री झाली की आपण सुखाने मथुरेत राहू शकत नाही वा जरासंधाला मारूही शकत नाही. नाइलाजाने वृष्णी, अंधक व भोज या तिन्ही यादवकुळानी, सर्व संपत्ति, गुरेढोरे यासह देशत्याग करून शेकडो मैल दूर पश्चिम

समुद्रकिनारी नवीन द्वारकानगरी वसवून मजबूत राजधानी बनवली. यानंतर पुन्हा यादव व जरासंध यांचे युद्ध उद्भवले नाही. या अठरा युद्धांमध्ये, बहुधा, अनेक यादववीर कैदी झाले असावे. द्वारकेला दूर निघून गेल्यामुळे त्यांना सोडवण्याचा कोणताच मार्ग, यादवांना वा कृष्णाला उपलब्ध राहिला नव्हता. हा कृष्णापुढील जटिल प्रश्न होता. द्रौपदी स्वयंवरानंतर कृष्ण व पांडव याची मैत्री उत्तरोत्तर दृढ होत गेली. भीष्माने निक्षून सांगितल्यामुळे अखेर धृतराष्ट्राने पांडवाना अर्धे राज्य देऊन इंद्रप्रस्थाला पाठवले. इंद्रप्रस्थ वसवण्यास कृष्णाने पांडवांना सर्व मदत केली. दीर्घकाळ इंद्रप्रस्थात राहून कृष्ण द्वारकेला परत गेला. नंतर त्याची व अर्जुनाची पुन्हा भेट अर्जुन तीर्थयात्रा करीत द्वारकेला पोचला तेव्हा झाली. तेव्हाही अर्जुनाला आवडलेल्या सुभद्रेशी त्याचा विवाह होण्यासाठी कृष्णाने सर्व मदत केली. त्याच्या सांगण्यावरूनच यादवानी अर्जुनाशी लढण्यापेक्षा अर्जुनाशी सख्य करणे श्रेयस्कर मानले! अर्जुन-सुभद्रा इंद्रप्रस्थाला परत गेलीं, मग अभिमन्यूचा व पांच पांडवपुत्रांचा जन्म झाला. या सर्व सुखाच्या काळातील पांडव व कृष्ण यांची मैत्री व परस्पर आदरभाव वाढत गेला. कृष्णार्जुनांनी मिळून खांडव वन जाळणे व इंद्रप्रस्थाची स्थापना ही यातील अखेरची पायरी म्हणता येईल. त्यानंतर कृष्ण द्वारकेला परत गेला. आगीतून वांचलेल्या मयासुराकडून पांडवांनी मयसभा बनवून घेतली. मग त्यांना राजसूय यज्ञाची कल्पना सुचवली गेली. त्यानी अर्थातच लगेच कृष्णाला सल्लामसलतीसाठी बोलावून घेतले. आपला जटिल प्रश्न सोडवण्यासाठी कृष्ण बराच काळ ज्या संधीची वाट पहात होता ती आता आयतीच चालून आली!

कृष्णाने राजसूय यज्ञ करण्याची कल्पना उचलून धरली. पण पांडवांना जरासंधाच्या सम्राट पदाची माहिती सांगून त्याला हरवल्याशिवाय युधिष्ठिराला राजसूय यज्ञ करण्याचा अधिकार नाही असे दाखवून दिले. जरासंध व यादव यांच्यामधील वैराचा सर्व इतिहास सांगितला. जरासंधाच्या बाजूने असलेल्या राजांची नामावळी सांगितली. एक युधिष्ठिराचा मामा पुरुजित कुंतिभोज सोडला तर इतर सर्व राजे, त्यांत पांडूचा मित्र असलेला राजा भगदत्त, कृष्णाचा सासरा भीष्मक, शिशुपाल वगैरे सर्व, जरासंधालाच सम्राट मानतात ही वस्तुस्थिति ऐकवली. 'थोडादेखील विसावा न घेता घोर अस्त्रांनी तीनशे वर्षे लढलो तरी जरासंधाचा पराभव करणे शक्य नाही' या कारणास्तव भोजांच्या अठरा घराण्यांनी व नंतर इतर यादव घराण्यांनीही, मथुरा सोडून द्वारकेला नवीन शहर वसवून, बंदोबस्तात राहणे पसंत केले हा इतिहास सांगितला. जरासंध व त्याचे दोन सेनापति हंस व डिंभक यांच्या पराक्रमामुळे त्याने अनेक राजे युद्धात हरवून, त्याना तुरुंगात टाकले आहे व


शंभर राजे पकडल्यावर त्यांचा यज्ञात बळि देण्याचा त्याचा विचार आहे, तेव्हा त्याला हरवल्याशिवाय वा मारल्याशिवाय तुम्ही राजसूय यज्ञ कसा करणार असा प्रश्न उपस्थित केला. वास्तविक, यादवांबरोबरच्या युद्धात हंस व डिंभक मरण पावले होते. तरीही युद्धामध्ये जरासंधाला हरवण्याची उमेद यादवांना राहिली नव्हती. तेव्हा, द्वंद्वामध्ये गाठून जरासंधाला एखाद्या महान वीराने मारले तरच त्याचे पारिपत्य शक्य होते. यासाठी अर्थातच भीमाशिवाय दुसरा कोण समर्थ होता? वास्तविक कुरूंचे व जरासंधाचे वैर नव्हते. भीष्माशी वैर वा युद्ध जरासंधालाही परवडले नसते! युधिष्ठिराने सरळ दूत पाठवून राजसूय यज्ञ करण्याचा प्रस्ताव जरासंधासमोर मांडला असता तर युधिष्ठिराबद्दलच्या आदरापोटी व भीष्माच्या धाकाने जरासंधाने कदाचित त्याला मान्यता दिलीही असती. पण या पर्यायात कृष्णाला रस नव्हता! त्याला या निमित्ताने जरासंधाचा काटा काढावयाचा होता व त्याच्या कैदेत पडलेले आपले बांधव सोडवावयाचे होते! कृष्णाने हा हेतु कसा साध्य केला?

कृष्णाच्या सूचनेवर बराच बेळ चर्चा चालून नंतर भीमाने मत दिले कीं आपण स्वत:, अर्जुन व कृष्ण यांनी जरासंधाच्या वधाचा प्रयत्न केला पाहिजे. कृष्णाने पुन:पुन्हा जरासंधाचे बळ, त्याच्या अंगातील सम्राटाला शोभणारे सर्व गुण, त्याचबरोबर सर्व राजेलोकांचा त्याने चालवलेला छळ व कैदेतील राजांचे बळी द्यावयाचा त्याचा बेत वर्णन करून जो जरासंधाचा हा बेत हाणून पाडू शकेल तोच सम्राट म्हणविण्यास पात्र ठरेल असे सांगितले. या सर्व चर्चेच्या वेळी हे राजे कोण होते याचा काहीही खुलासा महाभारतात नाही! भीम, अर्जुन व कृष्ण यांनी तिघानीच मिळून जरासंधाशी लढण्याचा भीमाचा बेत युधिष्ठिराला मुळीच पसंत झाला नाही. त्यापेक्षा तो राजसूय यज्ञ करण्याचा बेतच सोडून देण्यास तयार झाला! पण मग अर्जुनालाही जोर चढला. तोही भीमाच्या बेताला अनुकूल झाला. आपल्यासारख्या बलवानानी अन्याय्य गोष्टीचा प्रतिकार केलाच पाहिजे असे त्याने मत दिले. भीम व अर्जुन कृष्णाच्या मनातलेच बोलल्यामुळे आता कृष्णालाही जोर आला. जरासंधाबरोबर सरळ युद्ध करून जिंकणे अशक्य असल्यामुळे, गुप्तपणे त्याच्या वाड्यात प्रवेश करून त्याच्या वधाचा प्रयत्न करावा असाच बेत त्याने सुचवला. युधिष्ठिराच्या इच्छेप्रमाणे कृष्णाने पुन्हा एकदा त्याला जरासंधाच्या जन्माचा सर्व अद्‌भुत इतिहास सांगितला. तो महान बलवान व गुणी सम्राट आहे असेही पुन्हापुन्हा सांगितले. असे असूनही, कृष्णाने त्याचा जावई कंस याचा वध केल्यामुळे त्याचे यादवांशी व कृष्णाशी मोठे वैर होते व त्याच्या राजेलोकांना बळी देण्याच्या बेतामुळे कृष्णाला त्याचा वध हवा होता. कोण होते

हे राजे? महाभारतात काही खुलासा नाही. कुरु, पांचाल, यादव सोडून इतर राजघराण्यानी जरासंधाचे वर्चस्व मान्य केले होते. कुरूंचा व जरासंधाचा झगडा झालेला नव्हता. यादव द्वारकेला गेल्यावर इतर कोणा राजाशी जरासंधाचे वितुष्ट आल्याचाही उल्लेख दिसत नाही. तेव्हा हे राजे म्हणजे, वृष्णी, अंधक, भोज या यादवांच्याच वेगवेगळया कुळांतील असले पाहिजेत. यादव व जरासंध यांच्यांतील अनेक युद्धांमध्ये हे कैदी झाले असावे व यादव द्वारकेला गेल्यामुळे आता याना कसे सोडवावे हा प्रश्नच होता. कृष्ण सोडून इतर कुणा राजकुळाला याची चिंता पडलेली दिसत नाही. जरासंधाला विरोध करण्याची कोणाची हिंमत नव्हती हे त्याचे कारण असू शकेल. अन्याय करणाऱ्या इतर राजांना नारद वा इतर थोर ऋषि उपदेश करीत तसाही जरासंधाला कोणी केलेला दिसत नाही. या राजांना युद्धात जिंकून घेतलेले असल्यामुळे त्याना जरासंधाने कैदेत ठेवणे कोणाला फारसे अनुचित वाटले नसावे. यज्ञात बळि देणे अनुचितच होते पण ती वेळ आलेली नव्हती व त्याची चिंता एकट्या कृष्णालाच पडली होती यावरून ते सर्व यादवच असावे या तर्काला पुष्टि मिळते.

कृष्णाचा बेत सरळ होता. कृष्ण अर्जुन व भीम जरासंधासमोर द्वंद्वासाठी उभे राहिले तर आपल्या बळाच्या अभिमानामुळे तो भीमाशी मल्लयुद्ध करणेच पसंत करील व भीमच त्याचा वध करू शकेल हा त्याचा विचार होता! म्हणून त्याने अखेर युधिष्ठिराचे मन आपल्या बेताकडे वळवून घेतले. कृष्ण, अर्जुन व भीम यांनी लवकरच गुप्तपणे मगधाची राजधानी गिरिव्रज गाठली. स्नातक ब्राह्मणाच्या वेषात गिरिव्रजाला पोचलेल्या या तिघांनी शहरात काही दंगामस्ती करून नागरिकांमध्ये स्वत:बद्दल धाक, आश्चर्य अशा भावना निर्माण केल्या व अखेर ते जरासंधासमोर आले. त्यांच्या ब्राह्मणवेषाचा मान ठेवून पण त्यांना न ओळखून, जरासंधाने त्यांचा सत्कार केला. त्यांनी तो स्वीकारला नाही. तुम्ही कोण आहात असे जरासंधाने स्पष्टच विचारल्यावर कृष्णाने त्याला आपल्या तिघांची ओळख करून दिली व तुझ्या दुष्कृत्यांमुळे, विशेषत: राजेलोकांचे बळी देण्याच्या तुझ्या बेतामुळे तुला शासन करण्यासाठी आम्ही आलो आहोत असे आव्हान त्याला दिले. जरासंधाने कृष्णाच्या आरोपांना समर्पक उत्तरे दिली. 'मी धर्मानेच राज्य करतो आहे व माझी प्रजा सुखी आहे. राजांना मी योग्य प्रकारे युद्ध करून जिंकले आहे व त्यांचे काहीही करण्याचा मला अधिकार आहे. कुरुकुळाशी माझे मुळीच वैर नाही' असे म्हटले. अखेर कृष्णाच्या मनांतील बेताप्रमाणेच, त्याने द्वंद्वयुद्धाचे आव्हान स्वीकारले व कृष्ण वा अर्जुन यांना झिडकारून,

बलवान भीमालाच प्रतिस्पर्धी ठरवले. कृष्ण व बलराम दोघेही मल्लविद्येत प्रवीण असूनही, अद्यापपर्यंत त्यांची जरासंधाशी एकास एक अशी गाठ पडलेली नव्हती. कृष्णाचा मामा कंस याचा जरासंध हा सासरा तेव्हा भीमाच्या वा कृष्णाच्या मानाने तो खूपच वयस्क होता. तरीही, स्वत: किंवा बलराम यांचेपेक्षाही, बक, हिडिंब याच्यासारख्या अमानुष बळ असलेल्या राक्षसाना मारू शकलेला भीम, हाच एकटा जरासंधाशी लढू शकेल हे कृष्ण जाणून होता. महाभारतात, कृष्ण व बलराम यादवकुळातील असल्यामुळे, ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणे त्यांना जरासंध अवध्य होता असा खुलासा केला आहे पण तो फुसका वाटतो. ब्रह्मदेवाने हा वर जरासंधाला कां व केव्हा दिला हे सांगितलेले नाही! खरे कारण, माझ्या मते, जरासंधाने त्यांना मल्लयुद्धाची संधिच दिली नसती. त्यांना तो गवळीच मानत होता, बरोबरीचे राजकुळातले नव्हे!



भीम-जरासंध युद्ध तेरा दिवस अखंड चालले. अतिशयोक्ति सोडून दिली तरी दीर्घकाळ चालले हे खरे. अखेर जरासंध दमला पण भीम तरीही जोरात होता. अखेर त्याने जरासंधाच्या तंगड्या धरून उलटसुलट ओढून त्याला मारले. कृष्ण, बलराम, शल्य, कर्ण वगैरे इतर कोणाही मल्लविद्येत प्रवीण व्यक्तीने एवढा दीर्घकाळ मल्लयुद्ध केल्याचे महाभारतात वा इतरत्रही वर्णन आढळत नाही. भीमाच्या अफाट ताकदीवर कृष्णाने टाकलेला विश्वास भीमाने सार्थ ठरवला. जरासंध मेल्यावर, बंदीतील राजांना सोडवून, व जरासंधपुत्र सहदेव याला राज्यावर बसवून कृष्ण, अर्जुन व भीम विजयी होऊन इंद्रप्रस्थास परत आले. कृष्णाने जे योजले होते ते पार पडले.

या साऱ्या कथेमध्ये कृष्णाच्या अंगचे सर्व मानवी पातळीवरील लोकोत्तर गुण दिसून येतात. स्वत:चे शरीरबळ कदाचित पुरणार नाही व सैन्यबळावर विजय अशक्य, तेथे त्याने योग्य व्यक्तीचा उपयोग केला. त्यासाठी दीर्घकाळ संधीची वाट पाहिली. राजसूय

यज्ञाच्या बेतामुळे ती प्राप्त होतांच तिचा कौशल्याने उपयोग करून घेतला. शत्रूचे बलस्थान जे अफाट शरीरबळ, त्याच्या अभिमानालाच त्याने डिंवचले. सर्व बेत काळजीपूर्वक आखला व तडीस नेला. त्यांत, मुख्य म्हणजे, युधीष्ठिर, अर्जुन, भीम यांना समाविष्ट करून घेताना, ते कृष्णाच्या वैऱ्याशी लढत नसून जणू स्वत:च्याच वैऱ्याशी लढत आहेत अशी त्यांची मनोभूमिका करून घेतली व अखेर भीमाकरवी आपल्या कुळाच्या एका न आटपणाऱ्या वैऱ्याचा शेवट घडवून आणला. कृष्णाला अवतार मानणे हा श्रद्धेचा भाग आहे. मात्र लोकोत्तर पुरुष मानावेच लागते ते अशा प्रसंगांमुळे व कथांमुळे!

# शिशुपालवध

राजसूययज्ञ यथासांग पार पडला. राजेलोकानी पांडवाना अपार करभार दिला. यज्ञात मदत केली. पांडवानीही अफाट दानधर्म केला, अहेर केले. सर्व राजेलोकांचा दृष्टिकोण नंतर शिशुपालाच्या तोंडच्या एका वाक्यात आला आहे तो म्हणजे, 'आम्ही राजानी या युधिष्ठिराला खंडणी दिली ती पांडवाना भिऊन नव्हे वा त्यांचेपासून काही लाभ करून घेण्यासाठीही नव्हे तर सम्राटपदाची अभिलाषा बाळगणारा हा युधिष्ठिर धर्माने वागणारा असा याचा लौकिक आहे म्हणून!'

शिशुपाल हा यादवांचा व कृष्णाचा दुसरा प्रमुख वैरी होता. त्याचे व कृष्णाचे प्रत्यक्ष युद्धप्रसंग यापूर्वी घडलेले दिसत नाहीत. रुक्मिणीस्वयंवराचे वेळीं या दोघांचे वितुष्ट सुरू झाले. इतर यादवांशीं त्याचीं भांडणे व युद्धे झालीं होतीं. तो प्रतापी होता व चेदि या विख्यात राजकुळात जन्मलेला होता. रुक्मिणीमुळे कृष्ण व शिशुपाल यांच्यात प्रत्यक्ष स्पर्धा सुरू झाली. रुक्मिणीचा पिता व भाऊ या दोघांच्या मनातून तिचा विवाह शिशुपालाशी करावयाचा होता. तिला स्वतःला कृष्ण पसंत होता. कृष्णाने अखेर तिला पळवून नेली व पाठलागावर आलेल्या तिच्या भावाचा पराभव केला. या वेळीही कृष्ण व शिशुपाल यांचे प्रत्यक्ष युद्ध झाले नव्हते. हे रुक्मिणीहरण प्रकरण महाभारतात विस्ताराने आलेले नाही. ते खिलपर्वात (हरिवंशामध्ये) आहे. रुक्मिणी न मिळाल्यामुळे शिशुपाल साहजिकच कृष्णावर फारच चिडलेला होता व कृष्णालाही केव्हातरी एकदां त्याचा सोक्षमोक्ष करणे भागच होते.

कृष्णाने शिशुपालाच्या आईला वचन दिले होते कीं त्याचे शंभर अपराध भरेपर्यंत मी त्याला मारणार नाही, अशी एक कथा आहे पण तिच्या सत्यतेबाबत शंका घेण्यास जागा आहे. हें वचन कृष्णाने शिशुपाल अगदी लहान बालक असताना दिलें असे वर्णन आहे. कृष्ण वयाने शिशुपालाच्या साधारण बरोबरीचाच असल्यामुले तोही त्यावेळी लहान वयाचाच असणार. पण लहान वयात तर तो गोकुळात दडून बसलेला होता व हा वसुदेव-देवकीचा पुत्र आहे हेही गुह्यच होते. मग तो शिशुपालाच्या मातेला केव्हां भेटला असेल? भेटला तेव्हां शिशुपालाच्या मातेने त्याला कृष्णाच्या मांडीवर ठेवले तेव्हां त्याचे जास्तीचे हात व नेत्र गळून पडले व त्यामुळे त्याचा मृत्यु कृष्णाच्या हातून होणार हे जाहीर झाले व म्हणून त्याच्या मातेने कृष्णाकडून मुलाचे शंभर अपराध भरेपर्यंत थांबण्याचे वचन घेतले. ही सर्व हरदासी कथाच वाटते. प्रत्यक्षात कृष्णाने कंसवध केल्यावर व त्यातून

जरासंधाचे वैर ओढवून घेतल्यावर, शिशुपाल जरासंधाचा पक्षपाती व सेनापति, यामुळे त्याचेशींही कृष्णाचे वैर. उद्भवले. इतर यादवांशी शिशुपालाचे काही युद्धप्रसंग झाल्यावर केव्हांतरी कृष्ण व शिशुपालाची माता यांची भेट झाल्यावेळी, कृष्णाने थोडे समजुतीने घ्यावे असे तिने विनवले असेल व आतेमामे भाउ हा नातेसंबंध लक्षात घेऊन कृष्णानेही ते मान्य केले असेल, इतकेच या कथेचे मूळ असावे. कालांतराने कृष्णाला देवाचा अवतार हें रूप प्राप्त झाल्यावर त्याचे वैरी जरासंध व शिशुपाल हे अर्थातच राक्षसांचे अवतार ठरले व म्हणून त्यांच्या वर्णनात शारीरिक विकृति शिरल्या व अशा कथा प्रसृत झाल्या असाव्या. प्रत्यक्षात ते दोघेही विख्यात क्षत्रिय राजकुळात जन्मलेले होते व वीरपुरुष होते. सुस्वरूप असोत वा नसोत पण विरूप नक्कीच नव्हते! तेव्हां शिशुपालाला जास्तीचे हात व नेत्र असणे व ते गळून पडणे हीं हरदासी वर्णनेच! त्यांवर विश्वसतां येत नाहीं.

राजसूय यज्ञ पार पडल्यावर सर्व राजेलोकांचा सत्कार करण्याची वेळ आली तेव्हां प्रथम सत्कार वा अग्रपूजा कोणाची करावयाची असा सल्ला युधिष्ठिराने भीष्माला विचारला. कृष्ण हा सर्व राजांमध्ये तेज, बल व पराक्रम यांमुळे तळपत आहे तेव्हा त्याचाच प्रथम सत्कार करावा असा भीष्माने सल्ला दिला. त्याप्रमाणे त्याची अग्रपूजा युधिष्ठिराने केली. कृष्ण हा सर्वस्वीं पांडवांचा हितकर्ता, मित्र व सल्लागार व त्याच्याच मदतीने पांडवानी जरासंधासारख्या प्रबळ सम्राटाचा वध करून स्वतःला सम्राटपद मिळवले होते तेव्हां इतर कोणापेक्षां प्रथम त्याचाच सत्कार करणे भीष्माला व पांडवाना उचित वाटले यात नवल नाही.

शिशुपालाचा मात्र या घटनेमुळे तिळपापड झाला. त्याने अतिशय सडेतोड व कठोर शब्दांत भीष्माची व युधिष्ठिराची निर्भर्त्सना केली व कृष्णाची मानखंडना केली. राजसभेत उपस्थित असलेल्या इतर कित्येक वीरांशीं, पंडितांशीं, धर्मज्ञांशीं व राजांशीं कृष्णाची तुलना करून, या सर्वांपेक्षां कृष्ण मुळीच वरचढ ठरत नाही असा मोठा जोरदार युक्तिवाद केला. त्यावरून जसा त्याचा कृष्णद्वेष दिसून येतो तशीच त्याची विद्वत्ताही दिसून येते. सभेत कोणा इतर राजाने शिशुपालाची बाजू घेऊन भीष्माला वा युधिष्ठिराला दोष दिला नाही. पण उलटपक्षी कृष्णाचा प्रथम सत्कार हा योग्यच आहे असेही प्रतिपादले नाही! भीष्म, भीम, सहदेव व युधिष्ठिर एका बाजूला व शिशुपाल विरुद्ध बाजूला असा वादविवाद बराच वेळ चालला. शिशुपालाने संतापाच्या भरात 'या भीष्माला जाळून टाका' अशी चिथावणी इतर राजांना दिली. शिशुपालाचे वर्तन आततायीपणाचे झाले हे तर खरेच पण

भीष्मानेही चिथावला गेल्यामुळे, ‘मी कोणाचीच पर्वा करत नाही’ असे सर्व राजाना उद्देशून म्हटले. सहदेव व भीम यानी तर सर्वांना सरळ आव्हानच दिले कीं ‘आम्ही केलेली अग्रपूजा ज्याला पसंत नसेल त्याने शस्त्र उचलावे’ शिशुपालाने खुद्द भीष्माचाच अद्वातद्वा बोलून अपमान केला असल्यामुळे पांडव चिडणे स्वाभाविकच होतें.

कृष्णापाठोपाठ पांडवानी इतरांचाही सत्कार पुरा केल. शिशुपालाने मात्र आपला हेका अजूनही सोडला नव्हता. त्याने राजांना चिथावणी दिली कीं ‘आपण सर्वांनी मिळून एकजुटीने पांडव व यादव यांचा सामना करूंया. यावेळीं बऱ्याच राजांनी शिशुपालाची बाजू घेतली व जेणेकरून युधिष्ठिराला सम्राटपदाचा अभिषेक होणार नाही व कृष्णाची केलेली अग्रपूजा निरर्थक ठरेल असें काहीतरी केलें पाहिजे असें ते म्हणू लागले. क्रोधाने ते बेभान झाले व मानहानीमुळे रागावले असें वर्णन केलेले आहे. तो राजसमूह व अपार सेनासागर युद्धाच्या तयारीत आहे असे दिसूं लागलें. यावरून, कृष्णाची अग्रपूजा सर्व राजांनी सुखासुखी मान्य केली नाही असे दिसते. भीष्म व शिशुपाल यांची हमरितुमरी अद्याप चालूच होती. शिशुपालाने भीष्माचा सर्वतोपरी अपमान केला. उलट भीष्मानेही त्याला बोलण्यात काही कमी ठेवले नाही. मोठ्या युद्धाचाच प्रसंग उभा राहून, शिशुपालाने सरळच कृष्णाला युद्धाचे आव्हान दिले व ‘तुझ्याबरोबरच पांडवानाही नष्ट करून टाकतों’ असे म्हटलें. अद्यापपर्यंतच्या सर्व झगड्यात एक शब्दही न बोललेल्या कृष्णाने आतां सभेला आपल्या व शिशुपालाच्या वैराचा सर्व इतिहास सांगून, 'आतां तुझा वधच करतों’ असें शिशुपालाला म्हटलें. मात्र रथयुद्धाच्या भानगडीत न पडतां सुदर्शन चक्र फेकून त्याने अकस्मात शिशुपालाचा शिरच्छेद केला. शिशुपालाला प्रतिकाराची संधिच मिळाली नाही.

अध्याय ४५, श्लोक २९-३४ मध्ये या अकस्मात वधानंतर सभेतील राजाना काय वाटले याचे वर्णन केले आहे ते वाचनीय आहे. आकाशात एकही मेघ नसताना अकस्मात मुसळधार पर्जन्यवृष्टि व्हावी, जळजळीत वज्रपात व्हावा, पृथ्वी कंपित व्हावी असा प्रकार कृष्णाने शिशुपालाचा वध करतांच झाला. राजांना बोलण्यासारखे काही उरलेच नाहीं. कांही राजे तोंडातून अवाक्षरही न काढतां कृष्णाकडे नुसते टक लावून पाहत राहिले. कांही राजे संतापाने बेभान होऊन हातावर हात चोळीत बसले. दुसरे कांही क्रोधाने भ्रमिष्ट होऊन दांत ओठ खाऊ लागले. काही राजांनी मनोमन कृष्णाची स्तुति केली. कांही तटस्थ राहिले. या एकूण वर्णनावरून कृष्णाने अकस्मातपणे केलेला शिशुपालाचा वध हा सर्वमान्य वा शिष्टमान्य झाला असें खासच म्हणतां येत नाही. शिशुपालाने भीष्म व कृष्ण यांचे विरुद्ध

बोलताना सर्व संयम सोडला होता व अनुचित भाषेची मर्यादाही ओलांडली होती, यामुळेच कदाचित, त्याची बाजू घेऊन कोणी कृष्णाचा निषेध मात्र केला नाहीं.

युधिष्ठिराने शिशुपालाचा अंत्यसंस्कार यथासांग करविला व यज्ञाचीं उरलींसुरलीं कामे पार पाडलीं. सर्व राजेलोकांना सन्मानाने निरोप दिला. अखेर कृष्णानेही कुंती व सर्व पांडवांचा निरोप घेतला व तो द्वारकेला परत गेला. शिशुपालवधाचा झालेला प्रकार युधिष्ठिराला अपशकुनासारखाच वाटला होता. यज्ञ समाप्त झाल्यावर जेव्हां व्यासांचे आगमन झालें तेव्हां युधिष्ठिराने त्याना 'शिशुपालवध हा एक फार मोठा उत्पात तर नव्हे?' असें विचारलें. त्यावर व्यासांनी 'होय' असें म्हणून 'या उत्पाताचें भयंकर फळ तेरा वर्षांनी अखिल क्षत्रिय ज्ञातीच्या संहाराने दिसून येईल व तूं या संहाराला निमित्त होशील' असेही पुढे सांगितले. यामुळे अर्थातच युधिष्ठिर फार उद्विग्न झाला.


यज्ञानंतर हस्तिनापुरास परत गेल्यावर दुर्योधन व शकुनि यांचे राजसूय यज्ञाबद्दल बोलणे चालले असतां, शिशुपालवधाबद्दल दुर्योधनाने काढलेले उद्गार फार मार्मिक आहेत. तो म्हणतो – 'पहा, त्या यादववीर कृष्णाने पाहतांपाहतां शिशुपालाचा फडशा पाडला पण येवढ्या मोठ्या त्या राजसभेत कृष्णाचा प्रतिकार करण्यासाठी एकही मायेचा पूत पुढे सरसावला नाही! युधिष्ठिराने चेतवलेल्या अग्नीत सर्व राजे होरपळून निघत होते पण युधिष्ठिराने केलेला अपराध त्यांनी सहन केला. हा विपरीत प्रकार कोण सहन करूं शकेल? कृष्णाने केलेले ते (शिशुपालवधाचे) घोर कृत्य वीरश्रेष्ठ पांडवांच्याच प्रतापाने सिद्धीस गेलें. ' या वर्णनावरून दुर्योधनाचा वाढत चाललेला पांडवद्वेष अर्थातच दिसून येतो. वास्तविक, खुद्द दुर्योधनानेही, तें कृत्य पसंत पडले नसले तरी, त्याविरुद्ध आवाज उठवला नव्हताच. याचें कारण म्हणजे शिशुपालाने खुद्द भीष्माशीं केलेले गैरवर्तन.

शिशुपालाचा कृष्णाने केलेला वध त्याला फारसा शोभादायक म्हणतां येणार नाहीं. अर्जुनाचे अनेक पराक्रम व अनेक वीरांचा त्याने केलेला वध महाभारतात वर्णिला आहे. त्यांतील कोणत्याही ठिकाणी त्याला गौणत्व देणारा असा प्रकार दिसत नाही. कर्णवधाचे वेळीं देखील, सात दिवसपर्यंत वारंवार कर्णाला हरवून व हतबल करून झाल्यावर. अखेर केवळ त्याचा रथ अडकलेला असताना त्याला मारलें, एवढ्यासाठी काही लोक अर्जुनाला गौणत्व देतात. तें माझ्यामते मुळीच उचित नाहीं. मात्र कृष्णाने केलेला शिशुपालाचा वध हा खरेंतर घातपाताचा प्रकार वा <u>कृष्णकृत्य</u> म्हणावें लागेल. दोघांचें सरळ

रथयुद्ध होऊन, थोर पराक्रम करून, मग कृष्णाने शिशुपालाला मारले असते तरी ती गोष्ट त्याला जास्त सन्मानाची झाली असती! शिशुपालवध प्रकरणात, कृष्णाने आलेल्या संधीचा फायदा घेण्याचा, मानवी पातळीवरचा गुण प्रदर्शित केला. त्याला दैवी स्वरूप देण्यात अर्थ नाहीं.

जरासंध व शिशुपाल यांच्या वधांच्या कथा कृष्णाच्या मानवी पातळीवरील गुणावगुणांचे यथार्थ दर्शन घडवतात. त्याच्या 'दैवी' चित्रणाला त्या शोभत नाहीत असेंच म्हणावे लागते.

मी चमत्काराना सामोरे जाण्यापेक्षा बगल देणे पत्करतों. कोणाच्या श्रद्धाना दुखवणे त्यामुळे टळते! (तो माझा मुळात हेतुच नाही). कथेचे मूळ तपासताना ते महत्वाचेही नसतें. या कथेमध्ये, कृष्णाने शिशुपालाच्या आततताईपणामुळे आलेल्या संधीचा कसा फायदा घेतला, ही गोष्ट मला जास्त महत्वाची वाटते. जरासंधवध व शिशुपालवध या दोन्ही कथांत हा समान धागा मला जाणवतो.



शकुंतला व देवयानी

महाभारतात, मूळ कौरव-पांडवांच्या वैरकथेच्या जोडीला इतर अनेक लहानमोठी उपकथानके आहेत. यांतील काही कथानके स्वतंत्र महाकाव्ये शोभावीत एवढी विस्तृत आहेत. शकुंतला दुष्यंत यांची कथा ही एक प्रमुख उपकथा आहे. या कथेतील काव्यगुणांनी महाकवींना भुलवले व महाकाव्ये व नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले. कालिदासाच्या शाकुंतल नाटकाने जगातील थोरथोर रसिकांकडून मानाचे मुजरे मिळवले व जर्मन महाकवि गटे ते डोक्यावर घेऊन नाचला हे सर्वश्रुत आहे. महाकवीनी काव्ये-नाटके लिहिताना मूळ महाभारतातील कथेमध्ये काही फेरफार करण्याचे स्वातंत्र्य घेतलेले दिसून येते. महाकाव्ये-नाटके थोरच पण मला काही वेळा मूळ महाभारतातील व्यक्तिचित्रण जास्तच रुचते. यामध्ये मी शकुंतलेच्या कथेचा समावेश करीन. शकुंतलेची मूळ महाभारतातील कथा आपण पाहूं या.



शकुंतला-दुष्यंत-भरत याची कथा आपणाला बरीचशी परिचित आहे. संस्कृत नाटकांच्या प्रथेप्रमाणे नायकाला अवगुण शोभा देत नाही म्हणून कालिदासाने दुष्यंत व शकुंतला यांच्या चित्रणात भरपूर स्वातंत्र्य घेतले आहे. त्यासाठी मुळात नसलेली दुर्वासाच्या शापाची कथा कल्पनेने रचिली आहे! इतरही महत्वाचे फरक आहेत. शकुंतला ही मेनका व विश्वामित्र यांची कन्या हे आपणास ठाऊक आहे. मेनका ही अप्सरा व विश्वामित्र हा क्षत्रिय राजा व मागाहून ऋषिपदाला पोचलेला. मेनकेला विश्वावसु नावाच्या गंधर्व राजापासून एक कन्या झाली तिचे नाव प्रमद्वरा. मेनकेने जन्मत:च तिला स्थूलकेश

नावाच्या ऋषीच्या आश्रमाजवळ नदीकाठी टाकून दिले व मग तिला त्या ऋषीने वाढवली. मात्र ती शकुंतलेच्या आधीची नव्हे. दोघींच्या कथेतील साम्य सहज लक्षात येईल. विश्वामित्र व मेनकेची कथा शकुंतलेने प्रथम भेटीत दुष्यंताला सांगितली. विश्वामित्र मेनकेच्या मोहात पडल्यावर तो व मेनका दीर्घकाळ सुखोपभोगात रममाण झाली. हे



विश्वामित्राचे क्षणिक पतन म्हणता येणार नाही. काही काळासाठी विश्वामित्राने तप:श्चर्या बाजूला ठेवली होती! (रामायणातही विश्वामित्रकथा आहे. तेथे विश्वामित्र व मेनका यांनी दहा वर्षे एकत्र काढली असे म्हटले आहे. तसेच मेनका स्वत:च पुष्करतीर्थात स्नानाला आली होती तेव्हा विश्वामित्राने तिला पाहिले. तिला इंद्राने विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठी पाठवले होते असे रामायण म्हणत नाही पण महाभारत म्हणते!) शकुंतलेच्या जन्मानंतर मेनका तिला टाकून निघून गेली हे खरेच पण विश्वामित्रानेही तेच केले. बहुधा जन्म होईपर्यंतही तो थांबला नसेल! शकुंतला कण्वाच्या आश्रमात लहानाची मोठी झाली. राजा दुष्यंत शिकारीसाठी ससैन्य व सेवक मंत्री यांसह वनात आला होता व त्यावेळी तो कण्वाच्या आश्रमात आला व कण्व उपस्थित नसताना त्याची शकुंतलेशी गाठ पडली.

दुष्यंत शिकारीसाठी ससैन्य व सेवक, मंत्री यांसह आला होता. आश्रमाशी पोचल्यावर सैन्य व सेनापति यांना बाहेर ठेवून अमात्य व पुरोहितासह तो आश्रमात शिरला. त्याच्या व शकुंतलेच्या प्रथम भेटीला त्यामुळे अनेक साक्षीदार होते. दुष्यंताची भेट झाल्यावर त्याचे स्वागत करून मग शकुंतलेने आपला सर्व पूर्ववृत्तान्त त्याला सांगितला. दुष्यंताला शकुंतलेचे आकर्षण वाटून त्याने तिला मागणी घातली व कण्वाच्या परत येण्याची वाट न पाहता तिला वश करून घेतली. यावेळी दुष्यंताने अनेक मतलबी युक्तिवाद केले पण 'आपणच आपले बंधु-आप्तेष्ट असतो व आपल्या आयुष्याचा मार्ग आपणच ठरवायचा असतो' हे एक महान सत्यही तिला सांगितले! कण्वाची वाट न बघता तुझा निर्णय तूच घे असे तिला सुचवले. शकुंतला अल्लड होती म्हणून ती दुष्यंताच्या शब्दजालात फसली अशी आपली

समजूत असते पण महाभारत तसे म्हणत नाही! तिने गांधर्वविधीने दुष्यंताला वरण्याचा निर्णय विचारपूर्वकच घेतला. दुसरा कोणी आपल्या भेटीला साक्षी नाही याची तिने दुष्यंताला स्पष्टपणे जाणीव करून दिली. तुझा अंतरात्माच साक्ष आहे असे बजावून तिने आपली अट त्याला स्पष्टपणे सांगितली कीं 'मला होणारा पुत्र युवराज व तुझ्या पश्चात राजा झाला पाहिजे. ' दुष्यंताने ही अट कसलाही विचार न करता खुशाल मान्य केली व मी तुला नगरांत घेऊन जाईन असे स्पष्ट आश्वासनही दिले. कार्यभाग झाल्यावर मात्र, कण्व काय म्हणेल या भीतीने तो एकटाच आपल्या नगराला परत गेला. कण्वाने परत आल्यावर मात्र रागावण्याऐवजी शकुंतलेला दुष्यंत हा योग्यच वर आहे हे मान्य केले. शकुंतलेला, तिच्या इच्छेप्रमाणे, 'पुरुवंशातील राजे नित्य धर्मशील रहावे' असा वर दिला. भरताचा जन्म, दुष्यंताच्या (प्रथम) आश्रमभेटीनंतर तीन वर्षांनी झाला. कण्वाने हा दुष्यंताचा पुत्र आहे असे नि:शंकपणे मानले व त्याचे सर्व संस्कार केले त्याअर्थी या तीन वर्षांच्या काळात दुष्यंत वरचेवर आश्रमात येत-जात असला पाहिजे हे उघड आहे. प्रत्यक्ष पुत्रजन्मापूर्वी तो, काही कारणामुळे, यायचा थांबला असावा व त्याने भरताला पाहिले नसावे वा त्याच्या जन्माची त्याला कदाचित वार्ता नसावी. महाभारतात स्पष्टपणे सांगितलेले नाही. भरत सहा वर्षांचा झाला. कण्वाने त्याचे संस्कार केले. तो कांतिमान व सामर्थ्यवान झाला. अद्याप दुष्यंताकडून शकुंतलेला, कबूल केल्याप्रमाणे, बोलावणे आले



नव्हते. दुष्यंत शांतपणे शकुंतलेला विसरून गेला होता! आतां या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे या कारणास्तव कण्वाने शकुंतलेला व भरताला दुष्यंताकडे पाठवून दिले! नित्याच्या परिचयाच्या वनातून शकुंतला जात होती. (अ. ७४-श्लोक १४-१६). बहुधा, दुष्यंताबरोबर अनेकवार हिंडून हा परिचय झाला असणार. दुष्यंताच्या दरबारात शकुंतला व भरत उपस्थित झाल्यावर काय झाले?

दुष्यंतासमोर आल्यावर शकुंतलेने पूर्वी त्याने दिलेल्या वचनांची आठवण देऊन त्याप्रमाणे वाग अशी मागणी केली. (श्लोक१६-१८). पुढील श्लोकांत स्पष्ट उल्लेख आहे कीं

राजाला सर्व गोष्टी चांगल्या आठवत होत्या!  तरीही राजाने शकुंतलेची ओळख व झालेला गांधर्वविवाह सरळसरळ (निर्लज्जपणे!) नाकारला!

शकुंतला ओशाळली, खजिल झाली, तिला भोवळ आली, दु:खाने ती सुन्न झाली. पण त्याचबरोबर संतापाने तिचे डोळे लालबुंद झाले, ओठ थरथरले, ती बेभान झाली. पण भावनांचा कल्लोळ बाहेर पडू न देतां, स्वत:चे तेज मलिन होऊ न देतां तिने दुष्यंताची सरळ खरडपट्टी काढली, निर्भर्त्सना केली. तिचे सर्व भाषण श्लोक २४ ते ७२ मध्ये येते. ते मुळातून वाचण्यासारखे आहे. विस्तारभयास्तव ते सर्व उद्धृत करता येणार नाही. ही कालिदासाची असहाय अबला नाही, वाघीण आहे. ती शोक करीत नाही., स्वत:ला दोष देत नाही. तिने दुष्यंताला अनेक प्रकारे समजावले. ती म्हणाली – ‘ महाराज, आपणास सारे माहीत असतां आपण एख्याद्या असंस्कृत रासवट माणसाप्रमाणे  मला काही माहीत नाही असे बेलाशक खोटे कसे बोलता? खरे काय व खोटे काय याला आपले मनच साक्षी असते. माझा मी एकटा आहे असे माणसास वाटत असते पण हृदयस्थ ईश्वराच्या नजरेतून कोणतेही पाप सुटत नाही’. दुसऱ्या कोणा साक्षीदाराची गरजच काय असा तिचा मुद्दा होता. नंतर तिने भार्या व पुत्र यांची महती अनेक प्रकारानी विशद करून सांगितली. मुंगीसारखा क्षुद्र प्राणीही आपल्या संततीचे जतन करतो, तेव्हा पुत्राचा स्वीकार करून त्याचे जतन करणे हे तुझे कर्तव्य आहे असे दुष्यंताला बजावले. शेवटी असेही म्हटले की ‘तूं माझा त्याग केलास तर मी माझ्या आश्रमात परत जाईन पण तू तुझ्या पुत्राचा त्याग करू नकोस. ’ एवढे सर्व ऐकूनही दुष्यंताने मानले नाहीच. त्याने शकुंतलेची व तिच्या मातापित्यांची निंदानालस्ती केली. मुख्य शंका व्यक्त केली कीं ‘हा मुलगा लहान वयाचा आहे म्हणतेस मग हा एवढा थोराड व दणकट कसा? हा माझा मुलगा नाहीच. तूं जें काही बोललीस त्यातले काहीही मला मान्य नाही. मी तुला ओळखत नाही. तू वाटेल तिकडे निघून जा!’ शकुंतलेने यावर पुन्हा त्याच्या वाकडे बोलण्य़ाबद्दल त्याची खरड काढली. पुत्रमहति पुन्हा वर्णन करून पुत्राचा त्याग करणे तुला शोभत नाही, स्वत:बरोबर सत्याचे रक्षण करणे तुझे कर्तव्य आहे असे म्हणून सत्याची महति नानाप्रकारे वर्णन केली. शंभर विहिरी बांधण्य़ापेक्षा एक तळे बांधणे श्रेष्ठ, शंभर तळय़ांपेक्षा एक यज्ञ चांगला, शभर यज्ञांपेक्षा एक पुत्र चांगला, पण शंभर पुत्रांपेक्षाही सत्य श्रेष्ठ! हजार अश्वमेध व सर्व वेदांचे अध्ययन यांहूनही सत्य श्रेष्ठ

ठरेल. एवढे बोलल्यावर तिने व्यक्त केलेला स्वाभिमान तर केवळ अजोड आहे. ती पुढे म्हणाली की ‘तू जर असत्याचीच कास धरणार असशील तर तुझ्यासारख्याशी संबंधच नको! ही पहा मी निघाले. दुष्यंता, तुझ्याखेरीजही हा माझा पुत्र पृथीचे राज्य करीलच!’ एवढे बोलून ती पुत्रासह निघाली

महाभारत म्हणते, शकुंतला पुत्रासह निघाली तेव्हा अशरीरिणी वाणी झाली कीं ’दुष्यंता, हा तुझाच पुत्र आहे तेव्हां याचा स्वीकार करणे तुझे कर्तव्य आहे. ’ तेव्हा दुष्यंताने मान्य केले व पुत्र व भार्या यांचा स्वीकार केला. अशरीरिणी वाणी झाली म्हणजे माझ्या मते, उपस्थित ऋत्विज, पुरोहित, आचार्य, व अमात्य यानी दुष्यंताची कान उघाडणी केली असेल, समजूत घातली असेल, तुझ्या आश्रमभेटीना आम्हीही साक्षीदार आहोत असे बजावले असेल. स्वीकार केल्यावर मात्र आपल्या वर्तणुकीच्या समर्थनासाठी दुष्यंत शकुंतलेला म्हणाला कीं तुझा माझा संबंध नगरात कोणाला माहीत नव्हता. पुरुषाला मोहात पाडणे हा स्त्रियांचा स्वभाव असल्यामुळे तूं तसेच केले असशील व वर आपल्या पुत्राला राज्य मिळाले पाहिजे असा आग्रह धरून बसली आहेस असेंच सार्‍या लोकाना वाटले असते. म्हणून मी तुझा उतावळेपणाने स्वीकार केला नाही. तुला अनावर क्रोध यावा असे मी वागलो हे खरे आहे. ’ हे सर्व म्हणून झाल्यावर मग त्याने उच्चारलेले वाक्य मात्र आश्चर्यकारक आहे! तो म्हणतो ’त्यानंतर तू मला जे कटु शब्द ऐकवलेस त्याबद्दल, लाडके, मी तुला क्षमा केली आहे. ’ खासा न्याय! अपराध कोणाचा व क्षमा कोणाला! महाभारतातील या मूळ कथेमध्ये दुष्यंताच्या चित्रणाला उजाळा देण्यासाठी कालिदासाने घुसवलेला दुर्वासाचा शाप, मेनकेने दुष्यंताच्या दरबारातून शकुंतला-भरत याना थेट स्वर्गात घेऊन जाणे, दुष्यंताला माशाच्या पोटातली अंगठी पाहून स्मृति येणे, त्याची विरहावस्था, दुष्यंताने इंद्राच्या मदतीसाठी स्वर्गात जाणे, तेथे भरताला अचानक पाहणे, मग शकुंतलेची भेट व स्वीकार, यातील काहीही नाही! तेव्हा दुष्यंताचे कालिदासकृत उदात्तीकरण बाजूला ठेवून, त्याच्या वर्तणुकीचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. ज्याअर्थी, आपला पुत्र युवराज व्हावा ही शकुंतलेची मीलनापूर्वीची मागणी दुष्यंताने बेलाशक मान्य केली होती त्याअर्थी त्याला पत्नी असली/असल्या तरी पुत्रलाभ झालेला नसावा असे मानण्यास हरकत नाही. (भीष्मपिता शंतनु याला सत्यवतीची अशीच मागणी मान्य करता आली नाही. ) भरताच्या जन्माआधी काही काळ दुष्यंताचे शकुंतलेला भेटणे बंद

झाले असावे. त्यामुळे भरताच्या जन्माची त्याला कदाचित माहिती नसेल. त्याच्या प्रथम आश्रमभेटीला अनेक साक्षीदार होते. नंतरच्या भेटीही गुप्त थोड्याच राहिल्या असणार? पण शकुंतला भरताला घेऊन दरबारात उपस्थित झाल्यावर, खुद्द दुष्यंत मान्य करीत नाही तोवर अमात्य वा पुरोहित स्वत:हून काय करणार? शकुंतलेने निकराच्या गोष्टी बोलल्यावर अखेर त्यानीच राजाला सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली असणार व अन्यायापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला असेल. दरबारातील मंडळींचे मत अनुकूल आहे असे दिसल्यावर मग दुष्यंतालाही शकुंतलेचा स्वीकार करण्याचा धीर आला! या सर्व प्रसंगवर्णनात, इतर राजस्त्रिया वा राजकुमारांचा उल्लेख कोठेही नाही. दुष्यंतामागून भरताला निर्विघ्नपणे राज्य मिळाले, त्याअर्थी दरबारी राजकारणाचा वा वारसांचा प्रश्न नव्हता, तरीही सुरवातीला दुष्यंताने शकुंतलेचा स्वीकार न करता उलट असभ्यपणे तिचा अपमान केला तो कां याचा खरेतर पुरेसा उलगडा होत नाही. दरबारी लोक वा जनमत यांचा कौल होईपर्यंत सत्य स्वीकारण्याचा त्याला धीर झाला नाही हे खरे.



या महाभारतातील मूळ कथेमध्ये शकुंतलेचे चित्रण अतिशय ठसठशीत व मनोज्ञ आहे. तिने पति व पिता यांची कर्तव्ये, पितृत्वाचे अवीट सुख व सत्याची असाधारण महति याचे केलेले वर्णन सुंदर आहे. स्वमनाची साक्ष असत्य भाषण करणाराला धुडकावून लावणे अशक्य असते हे प्रतिपादन अप्रतिम आहे. दुष्यंताचा दोष सौम्य करण्यासाठी कालिदासाने त्याला व शकुंतलेला दुर्दैवाची शिकार बनवले आहे यात तिच्यावर अन्यायच केला आहे असे मला वाटते.

## देवयानीची कथा

आतां महाभारतांतील दुसरे उपकथानक पाहूया. हे कथानक कच, देवयानी, ययाति व शर्मिष्ठा यांचे आहे. या कथानकाने खाडिलकरांचे विद्याहरण व शिरवाडकरांचे ययाति-देवयानी हीं दोन नाटके व वि. स, खांडेकरांची गाजलेली ययाति कादंबरी या तीन प्रमुख व सुपरिचित साहित्य कृतीना जन्म दिला आहे. या लेखकानी महाभारतातील मूळ कथेमध्ये मोठे फेरफार केलेले दिसून येत नाहीत. या साहित्यकृतींमुळे ही कथा सुपरिचित आहे. त्यामुळे मूळ कथेची तपशीलवार उजळणी न करतां मला जाणवलेल्या काही खास गोष्टींचाच उल्लेख करणार आहे.

देवगुरु बृहस्पति व दैत्यगुरु शुक्राचार्य यांचेतील स्पर्धा कच-देवयानीच्या प्रेमाच्या आड आली असे विद्याहरण नाटकावरून वाटते. ब्रह्नदेवाचे अंगिरस व भृगु हे दोन पुत्र. बृहस्पती हा अंगिरसपुत्र व कवि हा भृगुपुत्र. शुक्राचार्य हा भृगुपुत्र व कच हा बृहस्पतिपुत्र म्हणजे कच व शुक्र हे एकाच कुळातील व नात्याने भाऊ. त्यामुळे, कच व देवयानी यांचे काका-पुतणीचे नाते होते. हे नाते त्यांच्या विवाहाच्या आड आले काय? देवयानीची विवाहाची याचना नाकारताना मात्र कचाने हे कारण सांगितलेले नाही. कचाने देवयानीची अभिलाषा धरू नये असे शुक्राचार्याने कधीच म्हटले नाही. कच व देवयानी समवयस्क होतीं व देवयानीचे प्रेम कचालाही हवे होते. देवांनी कचाला शुक्राचार्याकडे पाठवले तेव्हा त्यांचाही तोच हेतु होता की कचाला देवयानी व संजीवनी विद्या दोन्ही मिळवतां येतील! देवयानीचे कचावर खरेखुरे प्रेम होते. त्यापोटी पित्याला गळ घालून तिने कचाला वारंवार जिवंत करविले. अखेर दैत्यांच्या अविचारामुळे कचाची राख शुक्राचार्याच्या पोटात गेल्यामुळे त्याला जिवंत केले तर शुक्र मरणार असा पेच पडल्यावरही तिने अगतिकपणे, ‘मला तुम्हीही हवेत व कचही हवा’ असा हट्ट धरला. नाइलाजाने, इच्छेविरुद्ध, शुक्राचार्याला कचाला संजीवनी विद्या द्यावी लागली. जिवंत झालेल्या कचाने शुक्राचार्याला जिवंत केले. विद्याहरण नाटकात दाखवल्याप्रमाणे तो लगेचच देवलोकाला गेला नाही तर दीर्घकाळ शुक्रापाशी राहून तपाचरण केले असे महाभारत म्हणते. त्यानंतर तो देवलोकी जाण्यास निघाला तेव्हा देवयानीने, आपल्याला वरावे अशी त्याला विनंति केली ती त्याने नाकारली. तपाचरणाच्या काळात त्याने देवयानीबद्दलचे आकर्षण मनातून काढून टाकले असावे. संसार हा आपला मार्ग नाही व आपण देवयानीला सुखी करू शकणार

नाही हे त्याने ओळखले होते. तिचा उतावळा व रागीट स्वभावही त्याने जाणला असणार. शुक्राचार्यांनी मला पुनर्जन्म दिल्याने आपले भावाबहिणीचे नाते झाले आहे हे त्याने पुढे केलेले कारण खरे नव्हते. त्यांचे खरे नाते काका-पुतणीचे होते. कचाने नाकारल्यावर रागीट देवयानीने 'संजीवनी विद्या तुझ्या कामास येणार नाही' असा त्याला शाप दिला. त्यामुळे त्याचे काहीच अडणार नव्हते. आवश्यक तर त्याने ती विद्या देवलोकी इतर कोणाला दिली असती! त्यानेही तिला उलट शाप दिला की कोणीही ब्राह्मण तुला वरणार नाही. पुढे ययाति हा क्षत्रिय पतिच तिला लाभला.

कचाची कथा हे एक रूपक असावे असे मला वाटते. गुरु-शुक्र हे ग्रह, कच हा गुरूचा उपग्रह, त्याचे मृत्यु व पुनर्जन्म म्हणजे त्याची ग्रहणे, एक ग्रहण खुद्द शुक्राच्या मागे (शुक्राच्या उदरात) गेल्यामुळे झालेले, तो शुक्राच्या पाठीमागून बाहेर पडताना प्रथम शुक्र तेजोहीन (मृत) व नंतर पुन्हा तेजस्वी (जिवंत) होणे असा काही खगोलशास्त्रीय प्रकार या कथेमध्ये रूपक रूपाने सांगितलेला असावा अशी माझी कल्पना आहे. याला आधार काहीही नाही! गुरु, शुक्र हे ग्रह आहेत, देवयानी, शर्मिष्ठा, ययाति, वृषपर्वा, हे सर्व तारे-तारका आहेत. कचाचा तारा नाही. यावरून दुसरा तर्क म्हणजे कच हा गुरूचा उपग्रह नसून एखादा धूमकेतू असावा! तो प्रथम गुरूजवळ (म्हणून गुरुपुत्र), मग शुक्राजवळ, दिसणे, नंतर शुक्रामागे जाऊन न दिसणे, मग पुन्हा दिसू लागणे व दीर्घकाळ शुक्राच्या जवळपास दिसून मग दिसेनासा होणे असा काही घटनाक्रम या कथेने सुचवला आहे काय अशी कल्पना मला सुचते! याही कल्पनेला आधार नाहीच!

देवयानीच्या कथेचा उत्तरार्ध म्हणजे देवयानी, ययाति व शर्मिष्ठा यांची त्रिकोणी प्रेमकथा. ययाति कादम्बरी व ययाति-देवयानी हे नाटक यामुळे ही कथाही मराठी वाचकांना सुपरिचित आहे. देवयानीचा हट्टी, आग्रही व पोरकट स्वभाव या कथेत स्पष्ट दिसतो. शर्मिष्ठेने केलेल्या आपल्या व आपल्या वडिलांच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी तिला स्वत:ची दासी व्हावयास लावले तरी ती देवयानीची मैत्रीणच राहिली. तिच्यावरचा राग फार टिकला नाही. तिला देवयानीने प्रत्यक्षात दासी म्हणून वागवले नाही. देवयानीचा ययातीशी विवाह झाल्यावर शर्मिष्ठा तिच्याबरोबरच गेली. काही काळाने शर्मिष्ठेने स्वत:च ययातीला वश करून घेतले हे खरे पण असा काही प्रकार होऊ घातला आहे याची देवयानीला कल्पनाच नव्हती. ती बेसावधच होती. शर्मिष्ठेला तीन पुत्र झाले तरी देवयानीला पत्ताच नव्हता! शर्मिष्ठेला पहिला पुत्र झाला तेव्हा ऋषीपासून मला पुत्र झाला

असे तिने सांगितले व देवयानीने ते खरे मानले. ती स्वत:च्या सुखोपभोगात दंग होती व निष्काळजी राहिली किंवा तिने कळूनसवरून काणाडोळा केला! शर्मिष्टेचा विवाह होणार नव्हता पण पतिसुखापासून तिला पूर्णपणे वंचित ठेवण्याएवढा तिचा अपराध घोर नव्हता याची जाणीव असल्यामुळे कदाचित दुर्लक्ष केले असावे. सत्य सामोरे आल्यावर तिने शुक्राचार्यांकडे धाव घेतली पण तक्रार काय केली तर 'शर्मिष्ठेला तीन पुत्र आणि मला मात्र दोनच!' शुक्राचार्याने ययातीला शिक्षा केली पण शर्मिष्ठेला वा तिच्या पुत्रांना शिक्षा केली नाही. ययातीचे शुक्राचार्यांच्या शापामुळे आलेले वार्धक्य शर्मिष्ठेच्याच पुत्राने पत्करले व ययातीनंतर तो पुत्र पुरु हाच राजा होऊन त्याचा वंश पौरव या नावावे प्रख्यात झाला. दुष्यंत व भरत हे पौरव वंशाचे. शुक्राचार्यांच्या शापामुळे आलेले वार्धक्य पुत्राला घेण्यास सांगताना माझी कामसुखाची आसक्ति अद्याप संपलेली नाही असे म्हणताना ययातीने देवयानीबरोबरच शर्मिष्ठेचाही उल्लेख केला. देवयानी वा शुक्राचार्य यांनी त्याला आक्षेप घेतला नाही हे नवलच. सर्वांनी जणू शर्मिष्ठेचे पत्नीपद मान्यच केले! यापुढील ययातीची कथा एक उत्कृष्ठ बोधकथा आहे व ययाति कादंबरी व महाभारत दोन्हीकडे सारखीच आहे.

शकुंतला व देवयानी यांच्या कथा स्वभावचित्रण, काव्यमयता व तत्वविचार या तिन्ही अंगानी परिपूर्ण व रमणीय आहेत व अनेक साहित्यकृतीना जन्म देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. कवि वा नाटककार थोडेफार कल्पनास्वातंत्र्य घेणारच. मात्र मूळ महाभारतातील कथाही खूपच वेधक आहेत त्या वेधकतेचा परिचय करून देण्याचा प्रयत्न मी केला आहे.

नल-दमयंतीची कथा

नल-दमयंतीची कथा हे महाभारतातील हे एक अप्रतिम उपाख्यान आहे. यातील अद्‌भुत भाग सोडून जर कोणी पटकथा लिहिली तर एक सुंदर सिनेमा बनेल. अद्याप माझ्या माहितीप्रमाणे असा प्रयत्न कोणी केलेला नाही.

पांडव द्यूतात हरून बारा वर्षांच्या वनवासात गेल्यावर कौरवांवर सूड उगवण्यासाठी द्रौपदी व भीम उतावळे झाले होते. तेरा वर्षे फुकट न घालवतां लगेच कौरवांवर चाल करावी असा त्यांचा आग्रह होता. द्यूताचा कैफ उतरल्यावर युधिष्ठिराला मात्र परिस्थितीचे उत्तम भान होते. भीम, द्रौपदी, कृष्ण, यादव, पांचाल यांनी कितीही भरीस घातले तरी १२ वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास हा पण मोडून ताबडतोब युद्धाला उभे राहण्यास तो मुळीच तयार नव्हता. मात्र वचन मोडावयाचे नाही या विचाराबरोबरच दुसरे मुख्य कारण म्हणजे लगेच युद्ध उभे केले तर भीष्म-द्रोण पूर्ण ताकदीने कौरवांची बाजू



घेतील, इतर अनेक महावीर (त्यांत प्रमुख कर्ण, अश्वत्थामा, भूरिश्रवा) दुर्योधनाच्या मदतीला आहेत व विजय सहजीं मिळणार नाही हे तो जाणून होता. आरण्यकपर्वातील अध्याय ३६ मध्ये श्लोक १ ते २० मध्ये त्याने हे भीमाच्या गळीं उतरवले आहे ते मुळातून वाचण्यासारखे आहे. आपली बाजू बळकट करण्यासाठी, व्यासांच्या सांगण्याप्रमाणे, अर्जुनाला अस्त्रविद्येतील पुढील शिक्षणासाठी व तपाचरण करून देवांना संतुष्ट करण्यासाठी त्याने दूर पाठवले व 'तुझ्यावर आमचा सर्व भार आहे आणि भीष्म-द्रोणांच्यापेक्षा जास्त अस्त्रज्ञान तुझ्यापाशी आल्याशिवाय आपला

विजय होणार नाही' याची त्याला स्पष्ट कल्पना दिली. अर्जुनाने प्रत्यक्ष महादेव व इंद्र यांचेकडून नवीन अस्त्रविद्या संपादन केली. (माझ्या मतें त्याने ती वनातील अनार्य - किरात - योद्ध्यांकडून मिळवली! मात्र युद्धाचे प्रारंभीं 'माझ्यापाशीं जी अस्त्रे आहेत त्यांचे ज्ञान भीष्माला वा द्रोणालाही नाहीं' असें तो अभिमानाने त्यामुळेच म्हणूं शकला. ) नंतर तो स्वर्गात इंद्रापाशी आहे असे व्यासांकडून पांडवांना कळले व ते त्याच्या परत येण्याची वाट पाहात होते. अशा काळात एकदां बृहदश्व नावाचे एक ऋषि पाडवांकडे आले. त्यांनी नल-दमयंतीची कथा पांडवांना ऐकवली.

बृहदश्वाने ही कथा युधिष्ठिराला कां ऐकविली याचे कारण असे कीं बृहदश्वापाशी युधिष्ठिराने गाऱ्हाणे गाइले की 'फासे खेळण्यात पटाईत असलेल्या धूर्त जुगाऱ्यांनी मला बोलावून माझे सर्व धन व राज्य हरण केले, मी अत्यंत दु:खी होऊन कष्टाने वनवास भोगीत आहे. माझ्या दु:खाने पीडित झालेल्या मित्रांचीं संतापजनक भाषणे माझ्या हृदयात आहेत. अस्त्रविद्या मिळवण्यासाठी मी अर्जुनाला दूर पाठवले आहे पण त्याच्या विरहाने आम्ही हवालदिल आहोत. माझ्यासारखा दुसरा कोणी भाग्यहीन राजा या पृथ्वीवर असेल काय? आपण अशा कोणाला पाहिले आहे काय? माझ्यापेक्षा दु:खी दुसरा कोणी नसेल. '

त्यावर बृहदश्वाने म्हटले कीं 'तुला वाटते तसे नाहीं. तुझ्याहूनही भाग्यहीन आणि दु:खी राजाची कथा तुला सांगतो. निषध देशाच्या वीरसेन राजाचा पुत्र नल, जो धर्मार्थवेत्ता होता, तो बंधु पुष्कराकडून द्यूतांत जिंकला गेला आणि त्याने पत्नीसह वनवासाचे दु:ख भोगले. त्याच्या बरोबर सेवक, रथ, बंधुबांधव नव्हते. त्याच्याजवळ यापैकीं कांहींच राहिले नव्हते. तूं तर वीरबंधूंनी युक्त असून श्रेष्ठ व विद्वान ब्राह्मणांनीही वेढलेला आहेस तेव्हां तूं शोक करणे योग्य नाहीं'

आपली विपत्ति ज्याला त्याला असह्य वाटते पण आपल्याहूनही अधिक विपत्ति भोगलेले व भोगत असलेले अनेक असतातच, त्यांचेकडे पाहून विवेकाचा आश्रय करणे हेच उचित हे चिरंतन सत्य येथे या संवादानिमित्ताने समोर मांडलेले आहे. महाभारतात असा

वैचारिक अनुभव जागोजागीं येतो.

नल हा निषध देशाचा राजा. त्याच्या अनेक गुणांचे ऋषि बृहदश्व यांनी वर्णन केले त्यांत तो सुंदर, अश्ववेत्ता, द्यूतप्रेमी, शूर, प्रजाहितदक्ष असल्याचे म्हटले आहे. दमयंती ही विदर्भ देशाची राजकन्या रूपवान व गुणवान होती. एकमेकांचे गुण कर्णोपकर्णी एकमेकांना कळून, प्रत्यक्ष न पाहतांच ती एकमेकांच्या प्रेमांत पडलीं होतीं. प्रेमविव्हल होऊन उपवनांत बसला असतां नलाने एका सोनेरी पंखांच्या हंसाला पकडले. त्याने विनवले कीं मला जिवंत सोडलेस तर मी दमयंतीला भेटून तिच्यापाशी तुझे गुणवर्णन करीन. नलाने त्याला सोडले व हंसाने देशांतराला जाऊन दमयंतीला भेटून नलाच्या रूपगुणांचे वर्णन तिला ऐकविले. ते ऐकून दमयंतीने 'तूं नलापाशी माझे वर्णन कर' असे हंसाला म्हटले. त्याप्रमाणे हंसाने नलाकडे परत येऊन झालेली हकीगत त्याला सांगितली. हंस हा प्रेमदूत ही कल्पना कालिदासाच्या मेघदूतासारखीच आहे. महाभारत आधीचे, तेव्हां कालिदासाने नलदमयंतीच्या कथेवरून यक्षाने मेघाला दूत करण्याची कल्पना उचलली काय़? कसेही असले तरी दोन्ही कल्पना रम्यच हे खरे.

नलाचें हंसकृत वर्णन ऐकून दमयंतीचा प्रेमरोग बळावला! एकंदर लक्षणे पाहून तिच्या पित्याने तिचें स्वयंवर ठरवलें व सर्व राजेलोकांना आमंत्रणे धाडलीं त्यांत नलही होताच. स्वयंवर आहे म्हटल्यावर मोठ्या आशेने नल स्वयंवराला निघाला. वाटेत काय झाले ती कथा फारच मजेशीर आहे.



दमयंतीच्या रूपगुणांचे वर्णन ऐकून चार देव तिच्या प्रेमांत पडून तिच्या स्वयंवराला चालले होते ते नलाला वाटेत भेटले. मानव स्त्रीच्या प्राप्तीसाठी प्रत्यक्ष देवच स्पर्धेत उतरले होते ही मोठी रमणीय कल्पना आहे. इंद्र, अग्नि, यम व वरुण हे ते चार देव. नलाला पाहून त्याचे रूप व गुण लक्षात

आल्यावर आपल्याला काही चान्स नाही असेंच त्याना वाटले! मात्र प्रयत्न न सोडतां त्यांनी एक डाव टाकला! त्यांनी खुद्द नलालाच आपला दूत बनवलें व सांगितलें कीं तूं दमयंतीला निरोप दे कीं आम्ही चौघे स्वयंवराला येणार आहों व आमच्या पैकींच एकाला तूं पसंत कर! देवांची आज्ञा त्यामुळे नलाला हे एक धर्मसंकट उभें राहिलें! आपल्यापरीने त्याने ते टाळण्यासाठी सबब सांगितली कीं दमयंतीला मी एकांतात कसा भेटणार व निरोप सांगणार तेव्हां माफ करा. पण देवांना त्याची परीक्षाच पहावयाची होती. त्यांनी म्हटलें कीं आमच्या प्रभावाने तुला तिला भेटतां येईल. नाइलाजाने नलाला कबूल करावें लागलें. त्याप्रमाणे नल नगरांत गेल्यावर दमयंतीला भेटला व त्याने मन घट्ट करून देवांचा निरोप तिला सांगितला.

दमयंती म्हणाली कीं मी तुम्हालाच वरण्याचा निश्चय केला आहे. नलाने पुन्हा म्हटलें कीं प्रत्यक्ष देवांना सोडून तूं एका य:कश्चित मानवाला कसें वरण्याची इच्छा करतेस? दमयंतीने सांगितलें कीं मी तुमच्या रूपगुणांवर लुब्ध होऊन तुम्हाला वरण्यासाठीच स्वयंवर मांडले आहे. नल पुन्हा म्हणाला कीं मी देवांच्या आज्ञेवरून दूत म्हणून तुला भेटतो आहें तेव्हां मला यश देण्यासाठीं तूं त्यांच्या इच्छेप्रमाणे कर. त्यांची अवकृपा न होतां तूं मला कसें वरणार? दमयंती म्हणाली कीं हे स्वयंवर आहे आणि मंडपात देवांच्या उपस्थितीतच मी तुम्हाला माळ घालीन म्हणजे तुम्हाला दोष येणार नाहीं. नल परत गेला व 'मी तुमचा निरोप दमयंतीला दिला पण तिने मलाच वरण्याचे ठरवले आहे! तेव्हा माझा नाइलाज झाला' असें त्यांना म्हणाला. देवांनी दोघांचीही परीक्षाच पहायचे ठरवले होते त्यामुळे त्यांनी नलाला माफ केले पण स्वयंवर मंडपात एक नवीनच युक्ति केली.


स्वयंवर मंडपात सर्व राजे, राजपुत्र जमले. नलहीं त्यांत होताच. चारी देवांनी त्याच्या शेजारचींच आसने पकडलीं एवढेच नव्हे तर चारी देवांनी नलाचेच रूप धारण केले! मंडपांत एका ओळीत पांच नल बसलेले दिसत होते. दमयंती स्वयंवर मंडपांत आली. तिला नलालाच माळ घालायची असल्याने इतर राजांकडे न पाहतां ती सरळ नल बसला होता तेथेच आली. पाहते तों पांच नल! तिला काही सुचेना. तिला अर्थातच कळले कीं चारी देवांनी नलाचें रूप घेतले आहे. खरा नल ओळखल्याशिवाय माळ घालतां येईना. मग तिने मनांतल्या मनांत देवांची प्रार्थना केली कीं मी मनाने नलालाच वरले आहे तेव्हां आतां

दुसऱ्या कोणाला माळ घातली तर ती प्रतारण होईल तेव्हां देवांनो तुम्हीच मला खरा नल कसा ओळखावा तें सांगा. देवांना तिच्या शुद्ध प्रेमाची खात्री पटली व मग नलाचें रूप त्यानी टाकलें नाहीं पण अशीं लक्षणे प्रगट केलीं कीं त्यायोगें नलरूपी देव ओळखूं यावे आणि तिलाच तीं लक्षणे ओळखण्याचीही प्रेरणा दिली. तीं लक्षणे अशीं कीं त्यांचे नेत्र स्थिर होते म्हणजे पापण्या व बुबुळे हलत नव्हतीं, त्यांच्या गळयांतील हारांचीं फुले एकजात सारखीच टवटवीत व धुळीचा कणही न उडालेलीं होतीं, एकही किंचितही सुकलेले नव्हतें, त्यांचे पाय जमिनीला न टेकतां अधांतरी होते. त्यांचे चेहेऱ्यावर किंचितही घाम नव्हता. खऱ्या नलराजाचे ठायीं अशीं लक्षणे अर्थातच नव्हतीं. सूक्ष्म निरीक्षणाने दमयंतीला खरा नल ओळखता आला व तिने त्याच्या गळयात माळ घातली. लगेचच देवांनीही नलाचें रूप टाकून ते स्वत:च्या नित्य रूपांत दिसूं लागले. सर्व उपस्थितांनाही हा सर्व प्रकार पाहून आश्चर्य व आनंद वाटला. देवांनी नलाचे अभिनंदन केले व त्याला अनेक वर दिले. त्यांत मुख्य म्हणजे अग्नीने 'तुला पाहिजे तेव्हा व तेथे मी लगेच प्रगट होईन' असा वर दिला व वरुणाने 'पाहिजे तेव्हां तुला जल प्राप्त होईल' असा वर दिला. स्वयंवर संपून नल-दमयंतीचा यथासांग विवाह झाला.

विवाहानंतर सर्व राजे आणि देवही परत निघाले. देवांना वाटेत 'कलि आणि द्वापर' असे दोघे भेटले. हे देव वा मानव कोणीच नव्हते. या कोणी दैवी शक्ति होत्या. मात्र देवांना टाकून दमयंतीने मानव नलाला वरिलें याचे कलीला वैषम्य वाटलें व त्याने जाहीर केले कीं मी नलाला धडा शिकवीन. पुढे नल-दमयंतीवर जी अनर्थपरंपरा कोसळली त्याचे कारण खरेतर नलाचे आत्यंतिक द्यूतप्रेम होते पण त्या जबाबदारीतून त्याला मुक्त करण्यासाठी 'तो सर्व कलीचा प्रभाव होता' असे त्याचे कारण दर्शविले गेले आहे. 'कलीचा प्रभाव' म्हणजे काही काळपर्यंत स्वत:ची विवेकबुद्धि हरवून बसणे एवढेच म्हणावयाचे. नलदमयंतीचा संसार सुखाने चालला होता. त्याना दोन मुले झालीं. बराच काळ पर्यंत 'कली'ला आपला बेत साध्य करतां आला नाही. पण अखेर काळ नलाला प्रतिकूल झाला अन मग कलीने दावा साधला. नलाचा एक भाऊ होता. त्याचे नाव पुष्कर. तो नलाच्या राज्यात राहत होता असे म्हटलेले नाही. त्याचा व नलाचा काही झगडा झाला होता वा नलाने

त्याचा अपमान करून त्याला राज्यातून हाकलून दिले होते असे म्हटलेले नाही आणि पुष्कराचे वेगळे राज्य होते असेही म्हटलेले नाही. मग या पुष्कराने नलाशी वैर कां धरावें? 'कलीचा प्रभाव!' एक दिवस अचानक हा पुष्कर नलाकडे आला आणि त्याने नलाला द्यूताचे आव्हान दिले. ते नलाने राजेलोकांच्या स्वभावाप्रमाणे स्वीकारले आणि मग 'कलीच्या प्रभावामुळे' नलाची विवेकबुद्धि त्याला सोडून गेली. तो बेभानपणे द्यूताच्या संपूर्ण आहारीं गेला अन मग अनर्थपरंपरा सुरू झाली.

पुष्कर व नल यांचे द्यूत अनेक दिवस चालले. कौरव-पांडवांच्या द्यूताप्रमाणे तें अर्ध्या दिवसांत संपले नाही. मात्र युधिष्ठिराप्रमाणेच नलही कायम हरतच होता पण द्यूत संपवीत नव्हता. राज्याच्या मंत्र्यांना भेटावयासही त्याला सवड नव्हती. दमयंतीला काय करावे हे काहीच सुचत नव्हते. तिने नलाला निरोप पाठवले कीं 'इतकें धन गेलें व इतकेच शिल्लक आहे. ' परिणाम शून्य! शेवटीं तिने वार्ष्णेय नावाच्या विश्वासू सारथ्याला बोलावून घेऊन त्याच्या बरोबर आपल्या दोन्ही मुलांना माहेरीं पाठवून दिलें. वार्ष्णेयाला सांगितले 'मुलांना पोंचवून व रथ तेथेच सोडून तूं निघून जा कारण राजाला आतां तुझा उपयोग होईल असे दिवस राहिलेले नाहीत. ' वार्ष्णेयाने त्याप्रमाणे केलें. तो दुसऱ्या ऋतुपर्ण नावाच्या राजाचे पदरीं नोकरीला राहिला. इकडे दमयंतीने येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची मनाची तयारी केली. सर्व धन संपत्ति हरून नल निष्कांचन झाला. पुष्कराने, नलाला (शकुनिप्रमाणेच)) 'दमयंतीला पणाला लाव' असें सुचवलें. मात्र नलाने ती मर्यादा ओलांडली नाहीं. सर्वस्व हरल्यामुळे नल व दमयंती नेसत्या वस्त्रानिशी नगराबाहेर पडलीं.



पाठोपाठ आलेल्या नगरजनाना परत पाठवून दोघें वनांत शिरलीं. नलाची दुर्दशा होऊनही

’कली’चे समाधान झालेले नव्हते असे महाभारत म्हणते.

रात्रीं उपाशींपोटीं वनात भटकत असताना दमयंतीला ग्लानि येऊन झोपली असताना नलाला तीन सोनेरी पक्षी जमिनीवर दाणे टिपताना दिसले. त्यांना पकडावे म्हणून नलाने नेसते वस्त्र सोडून त्यांच्यावर टाकले पण ते वस्त्रच घेऊन ते पक्षी उडून गेले. दमयंतीच्याच वस्त्राचा थोडा भाग फाडून घेउन नलाने तो कमरेला गुंडाळला. त्याने आधी दमयंतीला ’तूं माहेरीं या अमुक रस्त्याने जा’ असें दाखवले होतें पण अशा आपत्काळीं त्याला सोडून जायचे तिने साफ नाकारले होते. आतां अर्ध्या वस्त्रावर पाळी आली तेव्हां नलाने विचार केला कीं आपण हिला झोपेत असताना सोडून गेलो तर ही नाइलाजाने माहेरीं जाईल, आता दुसरा इलाजच नाहीं. म्हणून अतिशय दु:खी अंत:करणाने दमयंतीला तशीच एकटी, अर्ध्या वस्त्रांत व निद्रित अवस्थेत सोडून नल वेगळ्या रस्त्याने निघून गेला. ’कली’ने नलाला म्हटलें ’तुम्ही दोघें वस्त्रांत होतांत तेंही मला पाहवलें नाहीं म्हणून द्यूताचे तीन फासेच मी पक्षीरूपाने तुझ्याकडे पाठवले होते, आतां माझे कार्य झाले तुझी पुरती दुर्दशा झाली. ’ याचा अर्थ असा विचार नलाच्या मनात आला एवढाच घ्यावयाचा असे मला वाटते.

नल व दमयंती वेगळ्या मार्गाला लागलीं. नल आपल्याला एकटी सोडून गेला हे कळल्यावर, हिंम्मत न सोडतां, अरण्यांतून अनेकानेक संकटांना तोंड देत प्रवास करून दमयंती अखेर आपल्या पित्याच्या घरीं पोंचली. या सर्व संकट परंपरेचे मी वर्णन करीत नाहीं. मात्र हे सर्व होऊनही दमयंतीचे नलावरचे प्रेम कणभरही कमी झाले नाहीं! त्याचे काय झाले असेल व तो आपल्याला पुन्हा कसा भेटेल याचीच चिंता तिला लागून राहिली. इकडे नलाचीही पाठ संकटांनी सोडली नाहीं. अर्ध्या वस्त्राने वनात फिरताना त्याला कर्कोटक नाग डसला व त्याचे सुंदर रूपच क्षणात नष्ट झाले. मात्र कर्कोटकाने त्याला म्हटलें ’ मी मुद्दामच असे केले कारण काही काळ तरी तुला विजनवासात काढावा लागणार आहे तर निदान तुझी ओळख कुणाला पटूं नये. योग्य वेळीं माझ्या कृपेने तुला तुझे मूळ रूप प्राप्त होईल. ’ कर्कोटक नागाचा दंश हेही माझ्या मते एक रूपकच आहे. खुद्द नलालाच आपण काळ अनुकूल येईपर्यंत

अज्ञात रहाणे आवश्यक आहे हे लक्षात येऊन त्याने रूप व वेष पालटला असावा. (वनातील कर्कोटक नावाच्या नागकुळातील पुरुषाने त्याला साह्य केले. ) तसे करून नलही वनातून भटकत अखेर त्याच ऋतुपर्ण राजापर्यंत पोचला. त्याच्या दीर्घकाळच्या सारथ्याने, वार्ष्णेयाने, त्याला ओळखले नाही. स्वत: नलही रथसंचालनाच्या कामात महान तज्ञ होता. त्याने ऋतुपर्णापाशीं सारथ्याची नोकरी धरली व तो व वार्ष्णेय दोघेही जोडीने ते काम करत राहिले. नल अज्ञातवासात दु:खाने कालक्रमणा करीत होता व दमयंतीचे काय झाले असेल याची चिंता करत होता पण त्याला आशा वाटत होती कीं दमयंतीने हर प्रयत्नाने माहेर गाठले असेल. तसे झाले असेल तर ती आपल्या काळजीने चूर झाली असेल असेच त्याला वाटत होते. इकडे दमयंती पित्याच्या घरीं तुलनेने सुखात होती दोन्ही मुलेंही तिच्या पाशीं सुखरूप होतीं पण नलाचे काय झालें असेल व पुन्हा त्याची भेट कशी होणार हा विचार तिला स्वस्थ बसूं देत नव्हता. तिने आपल्या परीने नलाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू केले.

वडिलाच्या पदरीं असलेल्या काहीं ब्राह्मणांना तिने नलाचा शोध घेण्यासाठीं सर्व दिशांना पाठवलें. कोणा एका पतीने वनात पत्नीला एकटीला सोडून दिल्याचे व तिच्या झालेल्या हाल अपेष्टांचे वर्णन करणारे एक कवन त्याना शिकवून 'ते अनेकांना ऐकवा व कोणाचा काही प्रतिसाद मिळाला तर येऊन मला सांगा' असे त्याना सांगितले. सर्व जण हात हलवीत परत आले पण पर्णाद नावाच्या एका ब्राह्मणाने मात्र म्हटले कीं मी राजा ऋतुपर्णाच्या राजधानीला गेलो होतो व तुमचे काव्य ऐकवले असतां राजाचा बाहुक नावाचा एक सारथी व्याकुळ होऊन त्याने उद्गार काढले कीं 'उच्चकुळांतील स्त्रिया संकटे कोसळलीं म्हणून धीर सोडत नाहीत वा पतीला दोष देत नाहीत. पत्नीला ज्याने एकटे सोडले त्या पतीला तसेच काही कारण झाले असेल. त्या पत्नीने पतीवर राग धरूं नये' हे ऐकून दमयंतीला तो नल तर नव्हे अशी शंका आली पण त्या सारथ्याचे रूपगुण नलासारखे मुळीच नव्हते असे त्या ब्राह्मणाच्या वर्णनावरून दिसत होते. फक्त तो रथचालनात प्रवीण आहे व पाककलेतही तज्ञ आहे एवढे वर्णन नलाशीं जुळते होते. तेव्हां खरें काय हे कळण्यासाठी आईशी विचारविनिमय करून पण वडिलांशी न बोलतां तिने एक नवीनच धाडसी युक्ति केली. सुदेव नावाच्या दुसऱ्या ब्राह्मणाला ऋतुपर्णाकडे निरोप देऊन पाठवलें कीं 'नलाचा शोध अजिबात लागत नसल्याने दमयंतीने पुन्हा स्वयंवर ठरवले आहे मात्र ते उद्यांच आहे

तेव्हां वेळेत आमच्या राजधानीला पोचता येते का पहा. ' हा निरोप इतर कोणा राजाकडे अर्थातच पाठवलेला नव्हता. बाहुक हाच नल असेल तर त्याच्या रथचालनाच्या अद्वितीय कौशल्याने ऋतुपर्ण येऊन पोंचेल व बाहुकाला प्रत्यक्ष पाहतां येईल असा तिचा विचार होता.

सुदेव त्याप्रमाने ऋतुपर्णाच्या राजधानीला जाऊन त्याला भेटला व निरोप सांगितला. ऋतुपर्णाने बाहुकाला म्हटले कीं 'इतक्या थोड्या वेळांत इतके दूर कसें पोंचतां येईल?' बाहुकाला दमयंतीचा पुन्हा स्वयंवराचा बेत ऐकून फार दु:ख झाले पण स्वत:च्या रथसंचालनाच्या अभिमानापोटीं त्याने ऋतुपर्णाला म्हटलें की तुमची इच्छा असेल तर मी तुम्हाला नेऊन पोंचवीन! ऋतुपर्ण बाहुक व वार्ष्णेय तिघेही निघाले. नलाने अश्वशाळेतील स्वत: पारख केलेले दिसायला हाडकुळे पण तेजस्वी घोडे रथाला जोडले. घोडे पाहून ऋतुपर्णाला शंका वाटली. नलाने म्हटलें कीं माझी निवड तुम्हाला पटत नसली तर तुमच्या पसंतीचे घोडे जोडा आणि वार्ष्णेयाला घ्या, तोही उत्तम सारथ्य जाणतो. ऋतुपर्ण मुकाट बसला.

राजा ऋतुपर्ण हा द्यूतविद्येत व गणनाशास्त्रात प्रवीण होता. नल रथसंचालनात व अश्वपरीक्षेत तज्ञ होता. नलाचे द्यूतातील अज्ञान दूर झाल्याखेरीज त्याला आपले राज्य व वैभव पुष्कराकडून परत मिळवता येणार नव्हते. नलाच्या वेष पालटून ऋतुपर्णाच्या पदरीं नोकरी करण्यामागे त्याचेकडून अक्षविद्या प्राप्त करून घ्यावी हा हेतु असावा. कदाचित कर्कोटकानेच त्याला ही कल्पना सुचवली असावी असा तर्क सयुक्तिक वाटतो. प्रवासात वाटेतच हे विद्येचे आदानप्रदान झाले असे वर्णन महाभारतात आहे. कदाचित नलाच्या ऋतुपर्णाच्या सेवेत असण्याच्या काळात ते वेळोवेळी झाले असेल.

प्रवासामध्ये ऋतुपर्णाच्या आणखी एका विषयांतील प्रावीण्याचे प्रदर्शन झाले. तो गणनशास्त्रातही प्रवीण होता. रथ भरवेगाने चालला असतां ऋतुपर्णाचे एक उपवस्त्र वाऱ्याने उडाले तेव्हां तो बाहुकाला रथ थांबव असें म्हणाला. बाहुकाने म्हटलें कीं रथाच्या वेगामुळे ते आता फार मागे पडले आहे व पुन्हा मागे वळून जाण्यात फार वेळ जाईल.


ऋतुपर्णाला गप्प बसणे भाग झाले. मग पुढे एक भलामोठा वृक्ष दिसल्यावर ऋतुपर्णाने 'या वृक्षावर अमुक इतकीं पानें आहेत' असें म्हटलें. विश्वास न बसून, नलाने म्हणजे बाहुकाने रथ थांबवला व 'मी पानें मोजून पाहणार' असें म्हणाला. 'यांत वेळ घालवला तर पोंचणार कसें' असें ऋतुपर्णाने म्हटल्यावर एका फांदीची पाने मोजून पहावी असे ठरले. तीं ऋतुपर्णाच्या अंदाजाप्रमाणे बरोबर निघालीं! नल चाट झाला. हे वर्णन मजेशीर आहे. ही Sampling ची विद्या असावी, म्हणजे एका फांदीच्या पानांचा काळजीपूर्वक अंदाज घेऊन व एकूण वृक्षाचा विस्तार विचारात घेऊन सर्व पानांचा अंदाज घेणे असा कांहीतरी प्रकार असावा. एकमेकांना एकमेकांच्या विद्या देऊन रथ दमयंतीच्या गावी संध्याकाळपर्यंत पोंचला. तेथे स्वयंवर असल्याचा काही मागमूस दिसत नव्हता त्यामुळे ऋतुपर्ण चक्रावून गेला. दमयंतीव्या पित्याशी भेट झाल्यावर त्यालाही कळेना कीं राजा ऋतुपर्ण अचानक कशासाठीं आला आहे! त्याने ऋतुपर्णाला विचारल्यावर काय उत्तर द्यावे हा त्यालाही पेच पडला. 'मी निव्वळ आपणाला भेटण्यासाठी आलो आहे' असे उत्तर देऊन त्याने वेळ मारून नेली. काय प्रकार आहे तें कळेलच असा विचार करून दमयंतीच्या पित्याने त्याला 'आज तुमचा प्रवास फार झाला आहे तेव्हां आराम करा, मग उद्यां बोलूं' असे म्हटले. राजाची सोय लागली व वार्ष्णेय-बाहुक या जोडीचीही रथशालेत व्यवस्था लागली.

अपेक्षेप्रमाणे ऋतुपर्ण तातडीने येऊन पोंचला त्यामुळे दमयंतीची आशा बळावली. वार्ष्णेय तिला माहीतच होता पण बाहुक हाच नलराजा काय याची शहानिशा करणे आवश्यक होते. त्याचे बाह्यरूप तर नलासारखे मुळीच नव्हते. दमयंतीने त्यासाठी अनेक युक्त्या केल्या.

तिने आपल्या दासींना सांगितले कीं बाहुकाला पाणी वा विस्तव देऊं नका व तो स्वत:साठी अन्न कसे शिजवतो तें नीट पाहून मला सांगा. त्याने मांस शिजवले तर जमल्यास त्याचा नमुना माझ्यासाठी आणा. नलराजाला अग्नि व वरुण यांनी वर दिलेले असल्यामुळे जर बाहुक हाच नल असेल तर त्याचे पाणी वा अग्नि यावांचून अडणार नाहीं तसेंच नल पाकक्रियेत खास प्रवीण असल्यामुळे बाहुकाने मांस शिजवले तर त्याला नलाच्या हातची चव असेल अशा तिच्या अपेक्षा होत्या. त्याप्रमाणेच झाले. दासींनी येऊन सांगितले

कीं त्याच्या चुलीत अग्नि आपोआप प्रगट झाला व कलशामध्ये जळही आपोआप भरले! याचा तारतम्याने इतकाच अर्थ घ्यावयाचा कीं स्वयंपाकघरांतील सर्व क्रियांमध्ये नल प्रवीण होता व ही गोष्ट सर्वसामान्य पुरुषांना (त्याकाळींही) सहजसाध्य नसल्याने बाहुकाचे नलाशीं साम्य दिसून आले. अजूनही खात्री करण्यासाठी दमयंतीने आपल्या दोन्ही लहान मुलांना बाहुकाकडे पाठवलें व दासींना लक्ष ठेवण्यास सांगितले. मुलें दृष्टीस पडल्यावर बाहुकाला म्हणजे नलाला मन आवरतां आलें नाहीं व तो त्यांना कवटाळून रडूं लागला. हे ऐकून दमयंतीची जवळपास खात्री झाली पण रूप मुळीच जुळत नव्हते. नलाचे वेषांतर उत्तम जमले होते. अखेर दमयंतीने आईला विश्वासात घेऊन म्हटले कीं बाहुक हाच नल असला पाहिजे तेव्हां खात्री करण्यासाठी मला त्याची एकांतात भेट घेऊंदे. पित्याला काही न सांगतां आपल्या जबाबदारीवर तिने हे धाडस केले. प्रत्यक्ष भेटीत दमयंतीने स्पष्टच विचारल्यावर नलाचा नाइलाज झाला व त्याने मीच नल असें मान्य केलें. 'वनात तुला एकटीला टाकून गेलो कारण नाहींतर तूं मला सोडून माहेरीं गेली नसतीस व तूं हरप्रयत्नाने माहेरीं पोंचशीलच असा मला भरवसा होता' असा खुलासा केला. मग वेषांतर टाकून स्वरूप धारण केले. 'तूं पुन्हा स्वयंवर करणार आहेस हे ऐकून मला काही सुचेना' असे नल म्हणाला तेव्हां अर्थातच दमयंतीने खुलासा केला कीं 'हा सर्व, पित्यालाही न कळवतां, माझाच बेत होता आणि त्याचा हेतु फक्त एकच होता कीं तुम्हीच बाहुकरूपाने ऋतुपर्णापाशीं असाल तर फक्त तुम्हीच एक दिवसात येथे येऊन पोंचाल दुसऱ्या कोणासही हे शक्य होणार नाही हें मी खात्रीने जाणत होतें' पतिपत्नींतील परस्पर विश्वासाचे हे एक उत्तम उदाहरण म्हटले पाहिजे. नलाने व दमयंतीने एकेकट्याने सोसलेल्या संकटांची हकीगत एकमेकांना सर्व सांगितली. दुसऱ्या दिवशीं नलदमयंतीने वडील माणसांस व ऋतुपर्णासही सर्व हकिगत सांगितली. स्वयंवराबाबत फसवणूक झाल्याबद्दल बिलकुल राग न धरतां ऋतुपर्णाने दोघांचे अभिनंदन केले व 'नला मी तुला न ओळखून नोकराप्रमाणे वागवले याचे वाईट वाटते' असे म्हटले. नलाकडून रथसंचालनात प्रावीण्य मिळवून ऋतुपर्ण परत गेला. दमयंतीच्या पित्यानेही कन्या व जावई पुन्हा एकत्र आल्याबद्दल आनंद व्यक्त केला व नलाचा आदरसत्कार केला. यथावकाश, द्यूतविद्येत नव्याने प्रावीण्य मिळवलेल्या नलाने आपल्या राजधानीला परत जाऊन पुष्कराला आव्हान दिले व द्यूतामध्ये विजय मिळवून सर्व गतवैभव जिंकून घेतले.

मात्र पुष्कराला शासन न करतां क्षमा करुन राज्याबाहेर घालवले. येथे नलदमयंती कथा संपली. संकटपरंपरा कोसळली तरी कुलीन व गुणवंत व्यक्ति धैर्य न सोडतां योग्य कालाची वाट पाहून दीर्घ प्रयत्नाने पुन्हा गतवैभव प्राप्त करून घेऊं शकतात हा मथितार्थ युधिष्ठिराला पटवण्यासाठी बृहदश्वाने ही कथा त्याला सांगितली. त्या पासून योग्य तो बोधही युधिष्ठिराने घेतला असे म्हणतां येईल.




# कृष्णशिष्टाई

महाभारताच्या मुख्य कथेशी बहुसंख्य भारतीय परिचित असतात. पांडव व कौरवांमध्ये द्यूत व अनुद्यूत होऊन पांडव दोन्हीत हरले व आपले राज्य कौरवांच्या हवाली करून त्याना बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास सोसावा लागला. त्यानंतर कौरवानी त्यांचे राज्य परत देण्याचे नाकारले त्यामुळे अखेर दोन्हीमध्ये भीषण युद्ध झाले व कुळाचा संहार झाला. हे युद्ध टाळण्यासाठी पांडव अज्ञातवासातून प्रगट झाल्यापासून पुढील काही महिने समेटाचे अनेक प्रयत्न झाले. कृष्णाने कौरव दरबारात पांडवांचे बाजूने शिष्टाई केली ती त्यातील अखेरची घटना. त्या प्रयत्नांची ही कथा आहे.

अर्जुन विराटाच्या गायी लुटण्यासाठी आलेल्या कौरवांच्या प्रतिकारासाठी युद्धाला उभा राहिला व ओळखला गेला तेव्हाच अज्ञातवास संपला. पांडव त्यानंतर तीन दिवसानी विराटासमोर स्वरूपात उभे राहिले. विराटाने आपली कन्या अर्जुनाला देऊ केली पण अर्जुनाने तिचा सून म्हणून स्वीकार केला. अर्थातच ती अभिमन्यूलाच वयाने जुळणारी होती. त्या विवाहाच्या निमित्ताने पांडवपक्षाचे अभिमानी व समर्थक असे सारे यादव व पांचाल वीर एकत्र जमले होते. विवाह आटोपल्यावर आता पांडवाना त्यांचे राज्य कसे परत मिळवून द्यावयाचे याचा विचार सुरू झाला. त्यानिमित्ताने झालेल्या चर्चा, विचारविनिमय, दूतांची देवघेव, राजकारणाचे डावपेच यात काही महिन्यांचा काळ गेला. तो दोन्ही पक्षानी सैन्याची जमवाजमव व इतरांचे सहाय्य मिळवण्यासाठी वापरला. या दीर्घ राजकीय घडामोडींमध्ये बुद्धिकौशल्य, डावपेच, राजकारण याचे अनेक चित्तवेधक नमुने पहावयास मिळतात. यांचा आता तपशीलवार परामर्ष घ्यावयाचा आहे.

विराटाच्या दरबारातील चर्चेने या घडामोडीना सुरवात झाली. पांडवांचे वतीने प्रथम भाषण करून कृष्णाने त्यानी भोगलेल्या हाल अपेष्टांचे वर्णन केले व त्यानी स्वपराक्रमाने कौरवांच्या राज्यात जी इंद्रप्रस्थाची भर घातली ते राज्य परत मिळवण्यासाठी एखादा धर्मशील, कुलीन, दक्ष असा दूत कौरवांकडे पाठवावा असा प्रस्ताव मांडला. यावेळी कृष्णाने असा स्पष्ट दावा केला कीं पांडवानी वनवास व अज्ञातवासाची अट पुरी केली आहे. यावर, प्रचलित चांद्रवर्ष गणनेप्रमाणे तेरावे वर्ष पांडवानी पुरे केलेले नाही असे कोणी म्हटले नाही. बलरामाने दूत पाठवण्यास अनुमोदन दिले पण कौरवानी अन्याय केल्याचा आरोप धुडकावून लावला. द्यूताचे वेळी पांडवाच्या झालेल्या अपमानाना त्याने युधिष्ठिरालाच

जबाबदार धरले कारण शकुनीसारख्या कुटिल द्यूतप्रवीणाशी तो स्वत:हून बेफामपणे द्यूत खेळला होता. यादववीर व अर्जुनाचा मित्र व शिष्य असलेल्या सात्यकीने प्रत्युत्तरात, 'अज्ञातवास पुरा झाल्याचे कौरवाना मान्य नाही' याची दखल घेतली व अखेर युद्ध करावे लागेलच असे म्हटले. द्रुपदाने सात्यकीला अनुमोदन दिले व दुर्योधनाशी मृदु भाषणाचा उपयोग नाही तेव्हा सरळ सैन्य जमवण्यास सुरवात करावी व राजेलोकांकडे दूत पाठवून सहाय्य मागावे असा युद्धबेत सुचवला. मात्र उपचार पाळण्यासाठी स्वत:चा पुरोहित दूत म्हणून पाठवावा असे सुचवले. कृष्णाने दूताला काय कार्य सांगावयाचे ते द्रुपद व विराट यानी ठरवावे, सख्य न झाल्यास मग राजांकडे दूत पाठवावे, आम्हा यादवांचा दोन्ही पक्षांशी नातेसंबंध असल्यामुळे ( बलरामाची कन्या दुर्योधनाची सून होती) आमच्याकडे शेवटी यावे असा उपसंहार केला. आपण व बलराम यांच्यात मतभेद होऊन वितुष्ट येण्याची भिती एव्हाना कृष्णाला स्पष्ट दिसूं लागली होती व ते कृष्णाला टाळणे भाग होते त्यामुळे त्याने सुरवातीला थोडे दूर राहण्याचे ठरवले असे दिसते!



सख्य प्रयत्नातील पहिली पायरी म्हणून द्रुपदाने आपल्या पुरोहिताला कौरवांकडे पाठवले. त्याला त्याचे काम काय हे द्रुपदाने समजाविले. त्याने त्याला स्पष्टच सांगितले की कौरव पांडवांचे राज्य परत देण्याची मुळीच शक्यता नाही. तुझ्या बोलणी करण्यामुळे निदान काही कौरव योदध्यांचे मन आपल्या बाजूला वळवणे, भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा व दुर्योधन यांच्यात काही मतभेद निर्माण होणे, कौरवांच्या सैन्यसंघटनास बिलंब घडवणे हे तुझ्या जाण्याचे खरे हेतु आहेत! द्रुपदाची राजकीय परिपक्वता यात स्पष्ट दिसते.

दृपदाचा पुरोहित कौरवांकडे गेला न गेला तोंच सैन्य जमा करण्याचा उद्योग दोन्ही पक्षांकडे सुरू झाला. आमच्याकडे शेवटी या असे कृष्णाने स्पष्ट सांगितले असूनही, सुरवातीलाच, अर्जुन व दुर्योधन दोघेही एकाच वेळी कृष्णाकडे गेले असे महाभारत म्हणते. कृष्ण स्वत: दुर्योधनाला मिळणे शक्यच नव्हते. मात्र बलरामाशी वितुष्ट टाळण्यासाठी

काहीतरी तडजोड करणे भागच होते. त्यामुळे साहजिकच, सैन्याची मदत दुर्योधनाला व स्वत: फक्त नि:शस्त्र सहायक म्हणून अर्जुनाकडे, अशी वाटणी अनिवार्य होती. प्रचंड सैन्य स्वत:ला मिळाले व कृष्ण स्वत: युद्धात उतरणार नाही असा दिलासा मिळाला म्हणून दुर्योधन खूष झाला. अर्जुनाला कृष्णाच्या सारथ्याची व सल्ल्याची किंमत ठाऊक होती. त्याला हवे ते मिळाले. कृष्णाच्या निर्णयाचा मुख्य फायदा म्हणजे बलरामाने युद्धापासून पूर्णपणे दूर राहाण्याचे ठरवले. कृष्ण-बलराम वितुष्ट टळले. इतर अनेक यादववीरही स्वस्थ बसले. सात्यकी व कृतवर्मा यानी आपल्या आवडीप्रमाणे पांडव व कौरवांचा पक्ष एकेक अक्षौहिणी सैन्यासह घेतला. 'अर्जुन व दुर्योधन एकाच वेळी कृष्णाकडे आले तेव्हा तो झोपला होता, दुर्योधन डोक्याशी व अर्जुन पायांशी बसला' वगैरे प्रसंग मात्र अगदीच हरदासी आहे! जे निर्णय कृष्णाने घेतले ते अनिवार्यच होते!

इतर कित्येक राजे आपापल्या विचारांप्रमाणे एकेका पक्षाला मिळाले. त्यांत नकुलसहदेवांचा मामा शल्य कौरवपक्षाला मिळाला हे एक नवलच. त्याचा खुलासा अज्ञातवासावरील माझ्या लेखात केला आहे. पांडवानी त्याचे सहाय्य गृहीत धरले असावे. त्याला आपल्या बाजूला वळवण्यात दुर्योधनाचा मुत्सद्दीपणा दिसून आला. कौरव सैन्याचा सेनापति भीष्म होणार हे उघड होते. त्याखालोखाल द्रोण, कर्ण, कृप, अश्वत्थामा होते. या साऱ्यांना डावलून शल्य कौरवांचा सेनापति होणे शक्यच नव्हते. तरीही दुर्योधनाने शल्याला 'तू सेनापति हो' अशी विनंति केली. भीष्म-द्रोण युद्धविन्मुख राहिले तर? अशी कदाचित त्याला शंका असावी! या सन्मानाचा शल्याला मोह पडला असे दिसते. द्रुपदाचा पुरोहित कौरवदरबारात पोचला. त्याने मुद्दे मांडले कीं धृतराष्ट्राने मुळात कौरवांच्या राज्याचा हिस्सा पांडवाना दिलाच नव्हता! इंद्रप्रस्थाचे नवे राज्य पांडवानी स्वपराक्रमाने मिळवले. द्यूतामुळे ते कौरवांच्या ताब्यात गेले. आता पांडवानी द्यूताची अट पुरी केली आहे तेव्हा ते त्याना परत मिळाले पाहिजे. त्यानी मोठे सैन्य जमा केले आहे व ते स्वत:ही फार प्रबळ आहेत तेव्हा युद्ध झालेच तर त्यांचा विजय ठरलेलाच आहे! तेव्हा आपल्या वचनाप्रमाणे विनाविलंब त्यांचे राज्य त्याना परत द्या! उत्तरादाखल भीष्म काही बोलत असतानाच त्याला अडवून कर्णाने मुख्य मुद्दा मांडला की 'अज्ञातवास पुरा होण्यापूर्वीच पांडव ओळखले गेले तेव्हा राज्य मागण्यापूर्वी त्यानी पुन्हा बारा वर्षे वनवास भोगावा. पांडवांच्या युद्धाच्या धमकीला आम्ही मुळीच घाबरत नाही'. भीष्माला कर्णाच्या आगाऊपणाचा राग आलेला पाहून, धृतराष्ट्राने त्याला चुचकारून, दूताला सांगितले की 'आम्ही तुझ्या म्हणण्याचा विचार करून मग संजयाला युधिष्ठिराकडे

आमचा दूत म्हणून पाठवतो. ' हा निरोप घेऊन द्रुपदाचा पुरोहित परत गेला. द्रुपदाच्या अपेक्षेप्रमाणे कौरवपक्षात फूट पडू लागली!

धृतराष्ट्राने संजयाला पांडवांकडे जाण्यापूर्वी स्वतःचे विचार ऐकवले. त्यामध्ये त्याने सर्व प्रमुख पांडववीरांची त्याला वाटणारी भीति व धाक व्यक्त केला. कृष्णाने पांडवांच्या हितासाठीच पूर्वी शिशुपालाचा वध केला असे म्हटले. खरे तर तो काही पांडवांचा वैरी नव्हता, कृष्णाचा वैरी. तो जिवंत असता तर कौरवांना मिळाला असता असा धृतराष्ट्राचा अभिप्राय दिसतो. युद्धापूर्वीच पांडवांचे राज्य त्याना द्यावे हेच मला योग्य वाटते. तेव्हा संजया तू पांडवांना व कृष्णाला भेट व धृतराष्ट्र पांडवांशी सख्य करू इच्छितो असेच त्याना सांग, जे पांडवांचा क्रोध वाढवणार नाही वा युद्धाला कारण होणार नाही असेच समयोचित भाषण सभेत तू कर, असे धृतराष्ट्राने त्याला सांगितले. पण हे सर्व खोटे व वरवरचे होते. त्याला स्पष्ट दिसत होते कीं दुर्योधन, दु:शासन, कर्ण व शकुनि पांडवांचे राज्य परत देण्यास मुळीच तयार नाहीत व युद्धाच्या भीतीने तर नक्कीच नाहीत. मग संजयाला पाठवण्य़ात व मवाळपणे बोल असे त्याला सांगण्यात त्याचा खरा हेतु काय होता? पांडवसभेतील संजयाच्या भाषणात तो उघड झाला!

पांडवानी आपला मुक्काम विराटाच्या राज्यातील उपप्लव्य गावी ठेवला होता व अनेक राजे सैन्यासह तेथे जमले होते. संजय पांडवाना भेटला. युधिष्ठिराने हस्तिनापुरातील सर्वांचे बारकाईने कुशल विचारले. त्यात अश्वत्थामा, कृप, द्रोण आमच्यावर दोषारोप तर करीत नाहीत ना असेही विचारले. संजयाने सुरवातीलाच सर्वांच्या हितासाठी तूच सलोखा कर असे युधिष्ठिराला विनवले. दरबारात सर्वांना उद्देशून बोलताना धृतराष्ट्र सलोखा करू इच्छितो असेच पुन्हा म्हटले. मात्र खुलासेवार बोलताना, तुम्ही सर्व शत्रूना मारून जिवंत राहिलात तरी ज्ञातिवधाचे दु:ख भोगत रहाल पण खरे तर भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण, शल्य व इतर अनेक राजे यांचेविरुद्ध तुम्ही कसे जिंकाल? असेही म्हटले.

युधिष्ठिराने जबाब दिला की युद्धाशिवाय आमचा हेतु साध्य झाला तर युद्ध कोणाला हवे आहे? पूर्वीचे सर्व विसरून मी सलोखा करीन पण इंद्रप्रस्थात माझे राज्य असूदे व हस्तिनापुरात दुर्योधनाचे! यावर बोलताना संजयाचा व पर्यायाने धृतराष्ट्राच्या मनातील खरा हेतु बाहेर पडला. संजय युधिष्ठिराला म्हणाला कीयुद्धाशिवाय जर दुर्योधन तुला राज्य

देत नसेल तर तुम्ही वृष्णींच्या वा विराटाच्या राज्यात भीक मागून रहा पण राज्यासाठी युद्ध करू नका! जर तुम्ही राज्यासाठी ज्ञातिवधाला तयार होणार असाल तर दुर्योधनाने तुम्हाला वनात पाठवले हा धर्मच झाला म्हटले पाहिजे! तुम्हाला युद्धच पाहिजे होते तर द्यूत झाले तेव्हाच करणे योग्य होते. आता युद्ध केलेत तर भीष्मासह सर्वांच्या वधाचे पातक लागेल म्हणून युद्ध करू नको! युद्ध झाले तर त्याचा सर्व दोष पांडवाच्या माथी मारण्याचा धृतराष्ट्राचा कुटिल डाव स्पष्ट झाला!

युधिष्ठिराने व कृष्णानेही जबाबात स्पष्ट सांगितले की राज्य देत असाल तरच युद्ध टळेल. अखेर कृष्णाने सामोपचाराचा अखेरचा प्रयत्न म्हणून स्वत: कौरवांकडे शिष्टाईसाठी जाण्याची तयारी दर्शवली. युधिष्टिराने संजयाला निरोप दिला, सर्वांचे कुशल पुन्हा विचारले व खुद्द दुर्योधनाला अखेरचा निरोप दिला की पांडव युद्धालाही तयार आहेत व शांतीलाही. व शांती रहावी यासाठी राज्याचा एक तुकडा, फक्त पांच गावे, आम्हाला दे व येथेच युद्धाचा शेवट होऊदे! मात्र तू जाणतोसच की मी शांतीला तयार असलो तरी युद्धालाही समर्थ आहें! युधिष्ठिराचा सर्व सद्भाव, वडिलांचा मान राखण्याची वृत्ति त्याचबरोअर ठाम निश्चय हीं या निरोपातून स्पष्ट दिसून येतात. पांच गावांवर समाधान मानण्य़ाची तयारी दाखवून धृतराष्ट्राचा कुटिल डाव त्याने बरोबर उलटवला व युद्ध झाले तर कौरवच जबाबदार राहतील हे स्पष्ट केले.

संजय पांडवाना बनवण्य़ात अपेशी होऊन परत गेला व त्याने प्रथम धृतराष्ट्राची भेट घेतली. होणाऱ्या युद्धाला कौरवच जबाबदार राहतील असे आपले स्पष्ट मत सांगून, पांडवांचा संदेश उद्यां दरबारात सांगेन असे म्हणून तो घरी गेला. अस्वस्थ होऊन धृतराष्ट्राने विदुराला बोलावून त्याच्याशी मसलत केली. त्याने अनेक सद्विचार सांगितले पण धृतराष्ट्र अखेर म्हणाला की मला सर्व पटते पण दुर्योधन समोर आला की माझी बुद्धि फिरते! दुसरे दिवशी दरबारात धृतराष्ट्राने प्रथम, अर्जुन काय म्हणाला, असे संजयाला विचारले. संजयाने सांगितले कीं अर्जुनाने अनेक प्रकारे आपला निर्धार व्यक्त करून कळविले आहे कीं युद्धांत मी तुम्हा सर्वांचा खास नाश करीन तेव्हा भीष्म, द्रोण, कृप, विदुर यांचा सल्ला ऐका. भीष्म, द्रोणानी कबुली दिली कीं आपण अर्जुनापुढे टिकणार नाही. कर्णाने नेहेमीप्रमाणे, मी एकटाच सर्व पांडवाना मारीन, अशी प्रौढी मिरवली. भीष्माने धृतराष्ट्राला समजावले कीं यात काही अर्थ नाही. हा अनेक वेळा पांडवांकडून हरला आहे हे विसरू नका. द्रोणानेही भीष्माला दुजोरा दिला. धृतराष्ट्राने नेहेमीप्रमाणे त्यांचेकडे दुर्लक्ष केले! त्याने संजयाला

विचारले कीं कोणाच्या भरवशावर पांडव युद्धाला तयार झाले आहेत? आमचे बळ त्याना माहीत नाही काय? त्यावर संजयाने पांडवांकडील सर्व वीरांचे सविस्तर वर्णन केले. पुन्हा पलटी घेऊन, भीमार्जुनांची आपणाला वाटणारी धास्ती सांगून, कौरवांनी युद्ध न करणेच चांगले असे मला वाटते असे धृतराष्ट्र म्हणाला. त्याची धरसोड वृत्ति यातून दिसते. यावर दुर्योधनाने म्हटले कीं द्यूतांनंतर लगेच सर्व यादव, पांचाल व इतर मित्र पांडवांकडे जमून आमचे पारिपत्य करण्यास तयार झाले होते तेव्हा मदतीला कोणी नसल्यामुळे मला भय होते तेव्हा भीष्म-द्रोणानी मला धीर दिला. आता तर त्यांच्याशिवाय इतरही अनेक वीर व प्रचंड सैन्य माझेपाशी जमले आहे. माझे बळ जाणूनच युधिष्ठिर फक्त पाच गावे मागतो आहे. मला पराभवाची मुळीच भीति वाटत नाही.

अशीच चर्चा पुन्हापुन्हा होऊन अखेर धृतराष्ट्राने दुर्योधनाला दाखवून दिले की भीष्म-द्रोण युद्धाला मुळीच उत्सुक नाहीत. यावर दुर्योधनाने स्पष्ट केले कीं माझा भरवसा मी स्वत:, दु:शासन व कर्ण यांच्यावरच आहे. आम्ही जिंकू वा मरू पण सुईच्या अग्रावर राहील एवढीही भूमि मी जिवंत असेपर्यंत पांडवाना मिळणार नाही! कर्णाने पुन्हा बढाया मारल्या व भीष्माने त्याची निंदा केली. यावर कर्णाने 'भीष्मा तू चिरशांत झाल्यावरच माझा प्रताप सर्वजण पाहतील' असे म्हणून सभात्याग केला. कौरवपक्षात ही एक मोठी फूट पडली! यानंतर संजयाने सर्वांना सांगितले की अखेरचा प्रयत्न म्हणून कृष्ण स्वत:च पांडवांतर्फे शिष्टाई करण्यासाठी येणार आहे.

इकडे पांडवांकडे कृष्ण कौरवदरबारात जाणार यावर बरीच चर्चा झाली. युधिष्ठिराने भीति व्यक्त केली कीं तुझा अपमान होईल वा तुला धोका होईल. कृष्ण म्हणाला की तूं माझी काळजी करू नको. माझा मी समर्थ आहे. भीमार्जुनानी प्रथम म्हटले कीं युद्ध टळेल असेच तू बोल. यावर कृष्णाने त्यांची हेटाळणी केली. तेव्हा रागावून दोघानीही म्हटले की 'तू आमचे मन ओळखत नाहीस काय? कुलक्षय टळत असेल तर ठीकच पण नसेल तर आमचा प्रताप दिसेलच. ' कृष्णानेही म्हटले की 'यशाची मुळीच आशा नाही पण लोकांनी आपल्याला बोल लावू नये यासाठी मी शेवटचा प्रयत्न करणार आहें'. सहदेव व सात्यकी या दोघानी मात्र म्हटले कीं 'आम्हाला अपमानांचा बदला घेण्यासाठी युद्धच हवे आहे!' द्रौपदीने आपल्या सर्व घोर अपमानांची कृष्णाला आठवण देऊन म्हटले कीं 'भीमार्जुनाना शम हवा असेच वाटत असेल तर माझा वृद्ध पिता, माझे बंधुबांधव, माझे पुत्र व अभिमन्यु हेच

लढतील व अपमानांचा बदला घेतील!' कृष्णाने तिचे सांत्वन केले व तुला हवे तेच घडेल असे म्हटले. युधिष्ठिराचे मत विचारात घेऊन कृष्णाने सर्व शस्त्रास्त्रे, सैन्य, सात्यकी व कृतवर्मा यांना बरोबर घेतले. अखेर निघतेवेळी अर्जुनाने पुन्हा स्पष्ट सांगितले कीं अर्धे राज्य किंवा युद्ध! अर्जुनाचा ठाम निर्धार ऐकून भीमाला फार हर्ष जाला.

इकडे कौरवांकडे, कृष्ण येतो आहे हे कळल्यावर, धृतराष्ट्राने त्याच्या स्वागताची जंगी तयारी केली. त्याच्यावर देणग्यांचा वर्षाव करण्याचा बेत केला. विदुराने त्याला खडसावले की तुझी सख्य करण्याची खरी इच्छा नाही पण तू कृष्णाला वश करून घेण्याची आशा करतो आहेस पण ती फोल आहे. तुझ्या स्वागताकडे तो ढुंकूनही पाहणार नाही. दुर्योधनाने याला दुजोरा दिला पण आपल्या स्वभावाप्रमाणे म्हटले की फार मोठा सत्कार केला तर तो भीतीपोटी आहे असे कृष्ण समजेल! उलट माझा तर त्यालाच पकडण्य़ाचा बेत आहे! यावर, हा दुर्योधन पापमार्गाने जात आहे व धृतराष्ट्रा तूंही त्याचे अनुकरण करू इच्छितोस! मला हे ऐकवत नाही असे म्हणून विदुर सभेतून उठून गेला.

दुसरे दिवशी कृष्ण हस्तिनापुराला आला. भीष्मद्रोणानी त्याचे वाटेतच स्वागत केले. धृतराष्ट्राच्या वाड्यांत सर्वांचे क्षेम कुशल विचारून तो विदुराकडे गेला. तेथे कुंतीची भेट झाली. कुंतीने पांडवाना भोगाव्या लागलेल्या विपत्तींबद्दल शोक केला. पांडवाना, तुमचा पुरुषार्थ दाखवा असा स्पष्ट निरोप दिला. कृष्णाने सांत्वन केल्यावर मात्र, 'धर्माचा लोप न करतां व कपट न करतां पांडवांच्या हिताचे असे सर्व तू कर' असे त्याला सांगितले. त्यानंतर कृष्ण दुर्योधनाला भेटला. त्याने स्वागत करून भोजनाचे आमंत्रण दिले ते मात्र कृष्णाने नाकारले. 'असें कां? तुझे-माझे काही भांडण नाही' असे दुर्योधनाने म्हटल्यावर, 'पांडवांचा द्वेष तूं करतॊ आहेस व मी त्यांचा दूत म्हणून आलो आहे त्यामुळे तुझ्याकडे अन्नग्रहन मला उचित नाही, मी फक्त विदुराकडेच जेवेन' असे म्हणून कृष्ण परत आला.

विदुराकडे भोजन होऊन रात्री विश्रांति घेताना विदुराने मत दिले की 'तुझे येणे योग्य नाही. दुर्योधन स्वत:च्या, कर्णाच्या व भीष्म-द्रोणांच्या बळावर विसंबून शम करण्यास मुळीच तयार नाही. तुझे प्रयत्न व्यर्थ जाणार आहेत. त्या दुष्टांच्या मेळाव्यात तू जाऊच नकॊ. ' कृष्णाने उत्तर दिले की 'मी कौरवांचाही आप्त व मित्र आहे. शक्य असूनही मी

युद्ध टाळण्य़ाचा प्रयत्न केला नाही असे कोणी म्हणू नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करून मला लोकनिंदा टाळावयाची आहे. '

या सर्व मतप्रदर्शनावरून असे दिसते की, सहदेव, सात्यकी, द्रौपदी व कुंती याना युद्धच हवे होते. भीम व मुख्यत्वे अर्जुन याना कुलक्षय नको होता. पण युद्धाची त्यांची तयारी होती. युधिष्ठिरालाही कुलक्षय नको होता पण पांच गावे कां होईना, पण दुर्योधनाने दिलींच पाहिजेत म्हणजे द्यूताचा पण पुरा न केल्याचा ठपका येणार नाही असे वाटत होते. युद्ध झालेच तर त्याचा निर्णय काय लागेल याबद्दलही तो साशंक असावा. अपमानांच्या बदल्य़ासाठी युद्ध त्याला आवश्यक वाटत नव्हते. खरे तर युद्ध अटळच आहे हेही सर्वांना दिसत होते.

दुसरे दिवशी कृष्ण कौरवदरबारात उपस्थित झाला. त्याचे यथोचित स्वागत झाले. शिष्टाई ऐकण्यासाठी थोर ऋषि आले होते. त्यांना उचित आसनावर बसविल्यावर मग सभा सुरू झाली. कृष्णाशेजारीं सात्यकी व कृतवर्मा बसले होते. कृष्णाने आपले मुद्देसूद भाषण, दुर्योधनाकडे दुर्लक्ष करून, खुद्द धृतराष्ट्रालाच उद्देशून केले. त्याने मुख्य मुद्दे माडले ते असे,

१. क्षत्रिय वीरांचा व सैन्याचा संहार व सर्वनाश न होतां कौरवपांडवांचा शम व्हावा हेच चांगले.

२. तुमच्या थोर कुळात तूं निमित्त होऊन कुलक्षय होऊं नये.

३. शम करणे तुझ्या हातात आहे. तूं कौरवाना आवरलेस तर पांडवाना मी आवरीन.

४. शम केलास तर पांडव व त्यांचे सर्व समर्थक – आम्ही यादवही – तुझ्या आधीन होतील. ते सर्व व तुझे सध्याचे समर्थक मिळून तूं अजिक्य सम्राट होशील.

५. युद्ध झाले तर दोन्ही पक्षांचा प्रचंड संहार होईल. त्यांत तुला काय आनंद?

६. पांडवांची तुला विनंति आहे की आम्ही द्यूताच्या अटी पाळल्या व तूही त्या पाळशील असा विश्वास बाळगला. वडील या नात्याने तूंच आता आमचे रक्षण कर व ठेव म्हणून तुजपाशी ठेवलेले आमचे राज्य आता आम्हाला परत दे.

७. सभेलाही पांडवांची विनंति आहे की येथे धर्मज्ञ सभासद उपस्थित असताना अनुचित गोष्ट वा अन्याय होऊ नये.

८. तुझ्या पुत्रांचा लोभ अनावर झाला आहे. त्यांना तूच आवर.

९. पांडव तुझ्या सेवेला तत्पर आहेत तसेच युद्धालाही तयार आहेत. उचित काय ते तूंच ठरव.

हे भाषण अत्यंत मुद्देसूद आहे. पांडवांचा दावा स्पष्ट्पणे मांडून युद्ध झालेच तर त्याची जबाबदारी तुमचीच आहे असे बजावले आहे. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी युद्ध करणारी दोन्ही राष्ट्रे एकमेकांकडे वकील पाठवून आमच्या मागण्या मान्य न केल्यात तर होणाऱ्या युद्धाला जबाबदार तुम्हीच असे बजावत असत त्याची आठवण येते! लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे पांडवांनी द्यूताच्या अटी पूर्ण केल्या आहेत असे कृष्ण स्वत: बजावून सांगत नाही! पांडवांचा तुला तसा निरोप आहे असे म्हणतो. पांडवांच्या दाव्यातील कच्चेपणा जाणवत असल्यामुळे त्यावर कमीतकमी भर दिलेला आहे! यानंतर सभेमध्ये भाषण करून परशुरामाने सांगितले कीं अर्जुन व कृष्ण हे नर-नारायणांचे अवतार आहेत, त्यांचेविरुद्ध तुम्ही जिंकू शकणार नाही. कण्वमुनीनेही त्याला दुजोरा दिला. दुर्योधनाने त्यांच्या भाषणाची 'वटवट' अशी वासलात लावली! व्यास, भीष्म, नारद यानीही नानाप्रकारे समझावले. त्यांतल्या कोणीही, पांडवांनी द्यूताच्या अटी पूर्ण केल्या आहेत त्यामुळे त्याना राज्य दिले पाहिजे असे म्हटले नाही! तूं जिंकू शकत नाहीस व सर्वनाश होईल म्हणून शम कर एवढेच म्हटले! मुख्य प्रश्नाला सर्वानीच बगल दिली. धृतराष्ट्राने अखेर दुर्योधनाला समजावण्याची आपली असमर्थता व्यक्त करून कृष्णाला म्हटले कीं तूंच त्याला समजाव. कृष्णाने नानाप्रकारे पांडवाची थोरवी सांगून व दु:शासन, कर्ण यांची निंदा करून समजावले. त्यानंतर पुन्हा भीष्म-द्रोणानी पुन्हापुन्हा सांगितले की युद्ध सुरू होण्यापूर्वीच शम करा. इतक्या सर्वांनी केलेले अप्रिय भाषण एवढावेळ मुकाट्याने ऐकून घेणाऱ्या दुर्योधनाने अखेर कृष्णाला आपला मुद्देसूद जबाब ऐकवला. तो असा :-

१. तुम्ही सर्वांनी माझी निंदा करण्याचे मला काही कारण दिसत नाही.

२. पांडव स्वखुशीने द्यूत खेळले व सर्व राज्य व वैभव हरले, तरी अखेर वडिलांनी ते सर्व त्याना परत केले पण तरीही मी त्याला विरोध केला नाही. त्यानंतर ते

पुन्हा अनुद्यूतात हरले व त्याना वनवास – अज्ञातवास भोगावा लागला यात माझा काहीही दोष नाही.

३. पांडवांनी अज्ञातवास पुरा केलेला नाही. त्यापूर्वीच ते ओळखले गेले.

४. पांडवांना वा त्यांच्या सहाय्यकाना भिऊन मी नतमस्तक होणार नाही. ताठ मानेने वागणे हेच माझ्या क्षात्रधर्माला उचित आहे. युद्धात वीरगतिही मला प्रिय होईल.

५. वास्तविक पूर्वीच पांडवाना राज्य देणे उचित नव्हते. आम्ही लहान असताना, अज्ञानामुळे व भीतीने ते दिले गेले.

६. आता सुईच्या अग्रावर राहील एवढीही भूमि पांडवाना मिळणार नाही. अद्यापपर्यंत संयमाने व दरबारी रिवाजाना धरून होणाऱ्या सभेतील कामाने या जबाबानंतर वेगळेच व अनिष्ट वळण घेतले.

दुर्योधनाच्या या जबाबानंतर कृष्णाचाही तोल सुटला व त्याने रागारागाने त्याला त्याच्या सर्व कुटिल कृत्यांची यादी ऐकविली व ’तुझे मातापिता व सर्व हितकर्ते तुला शम करावयास सांगत असून तू शम करूं इच्छित नाहीस तर मग तुला हवी असलेली वीरगति तुला लवकरच मिळेल’ अशी तंबी दिली. दु:शासन त्यावर दुर्योधनाला म्हणाला कीं ’तूं सख्य न करशील तर तूं, मी व कर्ण यांना बांधून भीष्म, द्रोण व धृतराष्ट्र पांडवांचे स्वाधीन करतील असा रंग दिसतो आहे. ’ यावर क्रुद्ध होऊन दुर्योधन व त्याचे समर्थक सभा सोडून गेले. भीष्म यावर कृष्णाला म्हणाला कीं हे सर्व लोक कालवश झालेले दिसतात. हें ऐकून, क्रुद्ध होऊन, कृष्ण भीष्मद्रोणांचीही निंदा करून म्हणाला कीं दुर्योधनाला तुम्ही थोपवत नाही हा तुम्हा कुरुवृद्धांचा अपराध आहे. आम्ही यादवानी जुलमी कंसाला मारून, उग्रसेनाला पुन्हा सत्तेवर आणले, आता आम्ही सर्व यादव सुखात आहोत. कुळाच्या हितासाठी (कु)पुत्राचा त्याग करणेच योग्य होय. यावर धृतराष्ट्राने विदुराकरवी दुर्योधनाला परत बोलावले व गांधारीकडून त्याला उपदेश करविला. तिने सांगितले की ’परस्परांतील भेदाला भिऊनच भीष्म, युझा पिता व बाल्हीक यानी पांडवाना राज्यभाग दिला होता. तुला अर्धे राज्य पुरेसे आहे. मूर्खा, तुला दिसत नाही का की भीष्म, द्रोण व कृप सर्व शक्तीनिशी तुझ्यातर्फे लढणार नाहीत? तुझा व पांडवांचा राज्यावर सारखाच हक्क आहे हे ते जाणतात. ’

पालथ्या घड्यावर पाणी पडून, उलट, दुर्योधनाने शकुनीबरोबर कृष्णालाच पकडण्याची चर्चा चालवली! ते लक्षांत येताच सात्यकी व कृतवर्मा बाहेर गेले व त्यानी सैन्य सज्ज केले. सात्यकीने परत येऊन कृष्णालाही सावध केले. कृष्णाने धृतराष्ट्राला म्हटले की दुर्योधनाला खुशाल मला पकडण्याचा प्रयत्न करू दे!. धृतराष्ट्राने पुन्हा दुर्योधनाला बोलावून उपदेश केला कीं हे बरे नाही. कृष्णाने त्याला सरळ दम दिला कीं तूं मला पकडण्य़ाचा प्रयत्न करच व मग माझा प्रताप पहा! कृष्णाने यावेळी विश्वरूप दर्शन दाखवले काय? हा श्रद्धेचा भाग आहे. महाभारत तसे म्हणते. माझ्या मते त्याची आवश्यकताच नव्हती. सात्यकी, कृतवर्मा यांची तयारी व कृष्णाचा आविर्भाव पाहून दुर्योधनाला वेळीच भान आले की आपला बेत तर सफळ होणार नाहीच पण उलट कृष्ण उघडच पांडवांच्या वतीने युद्धाला उभा रहावयास मोकळा होईल. बलरामही मग त्याला थांबवू शकणार नाही. हे जाणून त्याने आपला बेत सोडून दिला.

धृतराष्ट्राने कृष्णापाशी सरळच कबूल केले कीं माझी दुर्योधनावर सत्ता चालत नाही. यावर बोलण्यासारखे काही न उरल्यामुळे कृष्णाने भीष्म-द्रोणाना म्हटले की धृतराष्ट्र काय म्हणाला ते तुम्ही ऐकले आहे. आता मी तुमचा निरोप घेऊन परत जातो. माझे प्रयत्न हरले. त्यानंतर सात्यकी व कृतवर्मा यांच्यासह बाहेर पडून तो कुंतीकडे गेला. कृष्णशिष्टाई अशा प्रकारे असफळ झाली. मात्र पांडवांचा व कृष्णाचा आपणावर बोल येऊ नये हा उद्देश सफळ झाला.

यानंतर प्रत्यक्ष युद्धापूर्वी दोन महत्वाच्या घटना घडल्या

कौरव दरबारातील सर्व प्रयत्न असफल झाल्यावर पांडवांकडे परत जाण्यापूर्वी कृष्णाने दुसरे दिवशी सकाळी कर्णाची एकांतात भेट घेतली. त्यावेळी त्याने कर्णाला तूं कुंतीपुत्र या नात्याने पांडवांचाच वडील भाऊ आहेस असे सांगितले. त्यांचेविरुद्ध तू दुर्योधनाची बाजू घेणे उचित नाही. पांडव सत्य कळल्यावर तुला वडील भावाचा सर्व सन्मान देतील, तू दुर्योधनाची बाजू सोडलीस तर अजूनही शम होईल व पांडवाना मिळणाऱ्या राज्यभागाचा तूच मालक होशील, द्रौपदी ही सर्व पांडवांची पत्नी या नात्याने तुझीही पत्नी होईल असे सांगून त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. मात्र सर्व जन्म सूतपुत्र म्हणून काढल्यावर आता मला यातून काय मिळणार? दुर्योधनाने मला सर्व सन्मान, वैभव दिले आहे. त्याची बाजू अशी आयत्या वेळी मी सोडली तर ती अर्जुनाला भिऊन, असेच सर्व जग म्हणेल व माझी छीथू होईल. आता वेळ गेली आहे व मला असे करणे मुळीच उचित

नाही असे म्हणून कृष्णाच्या सूचनेला त्याने स्पष्ट नकार दिला. तेव्हा कृष्णाने नाइलाज होऊन त्याचेजवळ दुर्योधनाला निरोप दिला की आजपासून सात दिवसानी कार्तिक अमावास्या आहे त्या दिवशी कुरुक्षेत्रावर आपली रणांगणावर गाठ पडू द्या. त्यानंतर कृष्ण रथात बसून सरळ उपप्लव्याला पांडवांकडे गेला.

दुसरी महत्वाची घटना म्हणजे कृष्ण परत गेला व अमावास्येला युद्ध सुरू करण्याचे ठरले असे कळल्यावर खुद्द कुंतीने भल्या सकाळी सूर्याला अर्घ्य देत असताना कर्णाला गाठून 'तू माझाच पुत्र आहेस व पांडवांचा वडील भाऊ आहेस तेव्हा त्यांच्या विरुद्ध जाऊ नको असे विनवले. कर्णाने तिलाही स्पष्ट नकारच दिला. फक्त एकच गोष्ट कबूल केली कीं 'मी अर्जुन सोडून इतर चारांशी लढताना त्यांचा वध करणार नाही. माझे व अर्जुनाचे युद्ध मात्र अटळ आहे व आमच्यापैकी कोणीही एक जगला तरी तुझे पांच पुत्र जिवंत राहतील. ' कुंतीला एवढ्याच आश्वासनावर समाधान मानावे लागले. या दोन घटनांमध्ये कर्णाचे वर्तन धीरोदात्त झाले असे म्हणावे लागते. कृष्ण वा कुंती दोघानीही कर्णाचा खरा पिता कोण हे सांगितले नाही. सूर्यापासून जन्म याचेवर श्रद्धा असेल तर प्रश्न उरत नाही पण सर्व कथा माणसांची आहे व माणसापासूनच सर्वांचे जन्म आहेत हे मान्य केले तर हा प्रश्न उरतो. कर्णाचा खरा पिता ब्राह्मण वा क्षत्रिय असता तर ते यावेळी सांगावयास प्रत्यवाय नव्हता. त्यामुळे माझ्यामते कर्ण हा (बहुधा) खरोखर सूतपुत्रच असावा!

दुसरी नवलाची गोष्ट म्हणजे कर्ण हा कुंतीपुत्र आहे हे कृष्णाला कसे माहीत होते? तो देवाचा अवतार तेव्हा त्याला सर्वच ज्ञात असे मानले तर प्रश्न उरत नाही! पण तो मानवच असे मानणारांसाठी शंका उरते! माझे मते शिष्टाई असफल होऊन कृष्ण विदुराकडे परत आला व कुंतीला भेटून तिला सर्व हकीगत सांगितली तेव्हा पुत्रस्नेहाने कुंतीनेच आपले एवढा दीर्घकाळ जपलेले गुपित स्वत:च कृष्णाला सांगून 'तू हे कर्णाला सांग व त्याला वळवण्याचा अखेरचा प्रयत्न कर' असे म्हटले असले पाहिजे. तो प्रयत्नही असफळ झाला व युद्ध होणार हे कळल्यावर मात्र सर्व भीडभाड बाजूला ठेवून तिने स्वत:च कर्णाला भेटून व त्याचे जन्मरहस्य स्वमुखाने सांगून अखेरची विनवणी केली. तीही असफळ झाली. ते एकप्रकारे अटळच होते.

कुंती- कर्ण भेट व कृष्ण-कर्ण भेट यांत प्रथम कोणता प्रसंग घडला याबद्दल संशयाला जागा आहे. कुंतीने कर्णाला 'तू माझा पुत्र आहेस' असे म्हटले तेव्हां 'हे मला

माहीत आहे ' असें तो म्हणाला नाही. कृष्णाला मात्र कर्ण तसे म्हणाला! त्यामुळे कुंतीची व कर्णाची भेट आधी झाली असण्याची शक्यता वाटते.

अशा प्रकारे सर्व प्रयत्न संपून अखेर कौरव-पांडवाची गाठ नियतीने ठरवल्याप्रमाणे कुरुक्षेत्रावर पडली. कृष्णशिष्टाईची कथा येथे संपली. या प्रकरणामध्ये कॄष्णाचे मानवी पातळीवरील सर्व अलौकिक गुण प्रगट झालेले दिसून येतात. त्याला अवतार मानण्याची मला त्यामुळेच गरज वाटत नाही! तो एक थोर व आदर्श मानव म्हणूनच आपल्याला प्रिय व्हावा हेच योग्य.

कृष्ण – कर्ण संवाद

कौरव-पांडव युद्ध टाळण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून कृष्णाने कौरवदरबारात जाऊन पांडवांची बाजू मांडून आटोकाट प्रयत्न केले. दुर्योधनाने अज्ञातवास पुरा केल्याचा पांडवांचा दावा सपशेल फेटाळून लावला व राज्य पाहिजे तर आणखी बारा वर्षे वनवास करा असा जबाब दिला. शिष्टाई असफल झाल्यानंतर परत जाताना कृष्णाने कर्णाला आपल्याबरोबर आपल्या रथावर घेऊन वाटेत त्याला 'तूं कुंतीपुत्र आहेस म्हणून दुर्योधनाची बाजू सोडून दे व पांडवपक्षात ये' असे आवाहन केले. मात्र ते कर्णाने नाकारले. अखेर त्याचा निरोप घेताना कृष्णाने ' आठ दिवसानी अमावास्या आहे, त्या दिवशी कुरुक्षेत्रावर भेटूं व युद्ध सुरू करूं'असा कौरवांसाठी निरोप दिला व मग कृष्ण पांडवांकडे परतला असा कथाभाग महाभारतात आहे. तो सर्वसाधारणपणे खरा मानला जातो व मलाही तसे पूर्वी वाटत होते. मला एकच प्रश्न पडला होता कीं कर्णाचे जन्मरहस्य कृष्णाला कसे माहीत असणार? त्यावर मलाच सुचलेले उत्तर असे होते कीं शिष्टाई विफल झाल्यावर संध्याकाळी, परत जाण्यापूर्वी कृष्ण कुंतीला भेटला होता तेव्हां खुद्द कुंतीनेच हे रहस्य कृष्णाला सांगून 'अवश्य तर हे तूं कर्णाला सांग पण कर्ण व पांडव या भावांचा युद्धप्रसंग टाळ'असे त्याला म्हटले असेल! (कर्णाने कृष्णाला दाद दिली नाही असे कळल्यावर मग तिने अखेरचा प्रयत्न म्हणून स्वतःच कर्णाची भेट घेतली व 'तूं माझा पुत्र आहेस तेव्हां कौरवांची बाजू सोड'असे विनवले, तेही कर्णाने मानले नाहीच. ) या कृष्ण-कर्ण भेटीनंतर आठ दिवसानी कार्तिक अमावास्या होती व त्या दिवशी युद्ध सुरू झाले असे मानले जाते पण हा कालानुक्रम व घटनाक्रम खरा आहे काय? कित्येक उल्लेख याचेशी विसंगत आहेत.

कृष्ण उपप्लव्याहून शिष्टाईसाठी निघाला त्यादिवशी 'रेवती' नक्षत्र होते असा उल्लेख आहे. मार्गात एकच रात्र कृष्णाने मुक्काम केला व दुसऱ्या दिवशी तो हस्तिनापुराला पोचला असे म्हटलेले आहे. त्या दिवशी दुर्योधनाचे आतिथ्य नाकारून तो विदुराकडे मुक्कामाला राहिला. तिसरे दिवशी कौरवदरबारात शिष्टाई झाली. संध्याकाळपर्यंत ती अयशस्वी ठरून कृष्ण विदुराकडे परत येऊन कुंतीला भेटला व मग पांडवांकडे परत निघाला. या दिवशी 'भरणी' नक्षत्र असणार कारण रोज एक नक्षत्रातून चंद्र पुढे जातो. हा

कार्तिक मास होता हे गृहीत धरल्यास अमावास्येला चंद्र ‘ज्येष्ठा’नक्षत्रापर्यंत पोचणार होता. (पौर्णिमेला-शिष्टाईच्यादुसऱ्या दिवशी-तो कृत्तिका नक्षत्रात पोचणार होता कारण हा कार्तिकमास). ‘भरणी’ पासून ‘ज्येष्ठा’ पंधरा नक्षत्रे पुढे आहे! तेव्हां शिष्टाईच्या या दिवसापासून आठच दिवसानी अमावास्या येणे शक्यच नाही! तेव्हां जर कृष्णाने ‘आठ दिवसांनी अमावास्या आहे त्या दिवशी युद्ध सुरू करूं’ असे कर्णाला म्हटले असेल तर हा संवाद झाला त्या दिवशी ‘मघा’ किंवा ‘पूर्वा’ नक्षत्र असले पाहिजे होते जे शिष्टाईच्या दिवशीच्या भरणी नक्षत्रानंतर ७-८ दिवसांनी येणार होतें! तोंवर कृष्ण हस्तिनापुरात होता कोठे? तो केव्हाच परत गेला होता! कृष्ण शिष्टाईच्याच दिवशी परत गेला असला पाहिजे असे दुसऱ्या संदर्भावरूनही निश्चित ठरते. पांडवांकडे तो परतल्यावर मग शिष्टाईबद्दल सर्व चर्चा झाली, युद्ध अटळ आहे हे स्पष्ट झाले, मग पांडवपक्षाच्या सर्व वीरांची बैठक झाली, चर्चेअंती धृष्टद्युम्नाला सेनापति नेमले गेले, पांडव वीर व सैन्य कुरुक्षेत्रावर पोचले, रुक्मीने येऊन सहाय्य देऊ केले ते पांडवानी उडवून लावले व तो निघून गेला वगैरे घटना घडल्या. मग बलराम शिबिरात आला व युद्ध होणारच हे कळल्यावर, ‘मला हे युद्ध पहावयाचे नाही म्हणून मी तीर्थयात्रेला जातो’असे कृष्णाला व पांडवाना म्हणून लगेच शिबिर सोडून गेला. येथे नक्षत्राचा उल्लेख नाही. तो नंतर भीम-दुर्योधन गदायुद्ध १८व्या दिवशी झाले तेव्हां उपस्थित झाला. त्याने तेव्हां मात्र म्हटले कीं ‘मी पुष्य नक्षत्रावर निघालो होतो तो आज श्रवण नक्षत्रावर (४२ दिवसानी) परत येतो आहे. ’अर्थ इतकाच कीं पुष्य नक्षत्राच्या बलराम-पांडव भेटीच्या व आधीच्या पांडवशिबिरातील वर वर्णन केलेल्या सर्व घटनांच्या दिवशीही कृष्ण पांडवांच्या शिबिरात होता. ‘भरणी’ नक्षत्राच्या शिष्टाईच्या दिवसापासून या सर्व घटनांमध्ये ४-५ दिवस गेले होते. मग कृष्ण कर्णाला भेटला असेलच तर यानंतर दुसऱ्या वा तिसऱ्या दिवशी, मघा वा पूर्वा नक्षत्राच्या दिवशीं, गुप्तपणे भेटला काय?

मुळात या तथाकथित कृष्ण-कर्ण संवादाचा उल्लेखही महाभारतात सरळ निवेदन-रूपाने आलेला नाहीं. महाभारत म्हणते, कृष्णाने कर्णाला परत जाताना आपल्या रथावर घेतले होते व त्यांची दीर्घ चर्चा झाली हे कळल्यामुळे, (कदाचित काळजी वाटून), धृतराष्ट्राने 'त्यांचे काय बोलणे झाले?' असे संजयाला विचारले व मग संजयाने ते सर्व धृतराष्ट्राला सांगितले! हे अशक्यच वाटते! कुंतीने आयुष्यभर जपलेले गुपित तिने,

नाइलाजाने, कृष्णाला आणि कृष्णाने ते कर्णाला सांगितले असे घटकाभर मानले तरी ते संजयाला कसे कळणार? आणि संजयाला कळून त्याने धृतराष्ट्राला सांगितले तर मग ते फुटलेच कीं व मग अर्थातच दुर्योधन-भीष्म-द्रोणापासून युयुत्सुपर्यंत सर्वच कौरवांना कळले म्हटले पाहिजे! एकट्या युधिष्ठिरापासूनच ते गुह्य राहिले? हे अतर्क्यच आहे. तेव्हां हा संजय-धृतराष्ट्र संवाद प्रक्षिप्त मानला पाहिजे. कृष्ण-कर्ण भेट होणे व कृष्णाने युद्ध टाळण्याचा अखेरचा प्रयत्न करणे त्याच्या शिष्टाईच्या भूमिकेशी सुसंगत आहे. मात्र हा प्रसंग (मागाहून केव्हा तरी, कदाचित कृष्ण माहात्म्य वाढवण्यासाठी) महाभारतात शिरला तेव्हा तो सरळ निवेदन रूपाने न येता, गफलतीने, संजय-धृतराष्ट्र संवाद रूपाने शिरला! (शिष्टाई संपवून परत जाण्यापूर्वी कृष्ण कुंतीला भेटला तेव्हां तिने त्याचेबरोबर आपल्या मुलांना 'आतां सर्व शक्तीनिशी युद्ध करा, तेच क्षत्रिय या नात्याने तुमचे कर्तव्य आहे' असा स्पष्ट आदेश दिला. हा विदुराघरी झालेला संवादही धृतराष्ट्राला कळला व त्याने पुन्हा एकदा दुर्योधनाला उपदेश केला असा उल्लेख आहे! हे धृतराष्ट्राला कसे कळले याचा मात्र काही खुलासा केलेला नाही. ) मग खरोखर काय घडले?

या सर्व घटनांचा सुसंगत व तर्कशुद्ध कालानुक्रम माझ्या मते असा आहे. १ शिष्टाई संपल्यावर कृष्ण कुंतीला भेटून लगेच परत गेला. २ पांडवांकडे सर्व युद्धबेत ठरून सैन्यासह ते पुष्य नक्षत्रावर वा आधी कुरुक्षेत्रावर गेले. ३ कौरव सैन्यही दुर्योधनाच्या आदेशाप्रमाणे पुष्य नक्षत्रावर कुरुक्षेत्री गेले त्यापूर्वीच कुंतीने कर्णाची गुप्तपणे गाठ घेऊन त्याचे मन वळवण्याचा असफल प्रयत्न केला. कदाचित तिने कृष्णाला गुपित सांगून कर्णाचे मन वळवण्याची त्याला सूचना केलीही असेल पण कृष्णाने मात्र लगेचच तसे केले नव्हते. 'तूंच त्याला भेट, तेच जास्त उचित' असेच त्याने कुंतीला म्हटले असावे. मात्र कर्ण कौरव शिबिरात उपस्थित झालेला असल्यामुळे कुंतीचा प्रयत्न असफल झाल्याचे उघड झाले. ४ त्यामुळे कृष्णाने अखेरच्या क्षणी (मघा वा पूर्वा नक्षत्रदिनी, शिष्टाईच्या दिवशीं नव्हे, ) युद्ध टाळण्याचा निर्वाणीचा प्रयत्न म्हणून कर्णाची गुप्त भेट घेतली. 'मी कुंतीपुत्र आहे हे मला माहीत आहे' असे या भेटीत कर्ण कृष्णाला म्हणाला असा स्पष्ट उल्लेख आहे. कुंती भेटली तेव्हां मात्र तो असे काही म्हणाला नव्हता!. कुंती त्याला कृष्णाचे आधीच भेटली असेल तर कर्णाने कृष्णापाशी केलेले ते विधान सुसंगत आहे. मात्र दुर्योधनाची बाजू सोडण्याचे कर्णाने मानले नाहीच. उलट, 'तुझी-माझी भेट व माझे जन्मरहस्य गुप्तच राहूदे' असे त्याने कृष्णाला

विनविले. ५ तेव्हा, हाही प्रयत्न विफल झाल्यावर मात्र, कृष्णाने त्याला 'तर मग आठ दिवसानी अमावास्येला युद्ध सुरू करूं'असे म्हटले व त्याप्रमाणे ते झाले ६ त्यानंतर मात्र कुंती, कर्ण व कृष्ण यानी कुंतीचे गुपित अखेरपर्यंत सांभाळले. कौरवांना ते कधीच कळले नाही. कृष्णाने 'हे मला माहीत होते' असे कोणाही पांडवापाशी वा इतर कोणाशीं कधीही म्हटले नाही व अखेर कुंतीलाच ते युधिष्ठिरापाशी उघड करावे लागले. त्यावेळीही कृष्णाने 'हे मला माहीत होते' असे युधिष्ठिराला म्हटले नाही! नाहीतर युधिष्ठिराने कुंतीप्रमाणेच त्यालाही दोष दिला असता. या घटनाक्रमामध्ये कोणतीही अनैसर्गिक वा अतार्किक गोष्ट नाही. या संदर्भातील उल्लेख केलेल्या विसंगति महाभारतात कालांतराने भर पडताना अनवधानाने आल्या असाव्या असे वाटते.

# अभिमन्यूचा वध

अभिमन्यूचा वध ही भारतीय युद्धातील एक फार महत्त्वाची घटना आहे. कारण आपल्या मुलाच्या मृत्यूमुळे चिडून जाऊन अर्जुनाने जयद्रथाचा दुसऱ्या दिवशींच वध करण्याची प्रतिज्ञा केली आणि दिवसभर जयद्रथाचे अर्जुनापासून संरक्षण करण्याचा कौरवांनी आटोकाट प्रयत्न करूनही ते जयद्रथाला वाचवू शकले नाहीत. अर्जुनापुढे आपले कोणाचेच काही चालत नाही हे त्याना कळून चुकले. जयद्रथाच्या वधाबद्दल मी विस्ताराने लिहिले आहे. त्यामुळे आतां त्याची पार्श्वभूमी असलेल्या अभिमन्यू वधाबद्दल लिहिणार आहे. युद्धाचे पहिले दहा दिवस भीष्म कौरवांचा सेनापती होता. त्याने प्रथमच दुर्योधनाला सांगितले होते कीं मी एकाही पांडवाला मारणार नाही. दहा दिवसात पांडव पक्षाचा एकही प्रमुख वीर मेला नव्हता. भीष्माने पांडव सैन्याचा मात्र फार संहार केला होता. भीष्म शरपंजरी पडल्यावर त्याने दोन्ही पक्षांना युद्ध संपवा असें विनवले होते. मात्र ते शक्य नव्हते. भीष्म पडल्यावर दुर्योधनाने द्रोणाला सेनापती होण्यास विनवले. त्याने ते स्वीकारले. येथून पुढे डावपेचाचे युद्ध झाले. सुरवातीलाच द्रोणाने दुर्योधनाला विचारले कीं तुला काय हवे आहे. त्यावर दुर्योधनाने म्हटले कीं 'युधिष्ठिराला पकडावे. द्रोणाने आनंद व्यक्त केला कीं 'तू युधिष्ठिराला मारुं इच्छित नाहीस. ' दुर्योधनाने म्हटले कीं 'युधिष्ठिराला मारून युद्ध संपणार नाही, इतर पांडव आमचा सर्वनाश केल्याशिवाय राहणार नाहीत. युधिष्ठिराला पकडले तर मी त्याला पुन्हा द्युत खेळायला बसवीन व पुन्हा वनवासाला धाडीन. ' द्रोणाला हा विचार पसंत पडला कारण पांडवाना मारण्याचे अप्रिय काम यामुळे टळणार होते. द्यूत खेळणे योग्य कीं अयोग्य याचा विचारही त्याला पडला नाही. तेव्हा त्याने मान्य केले कीं 'मी युधिष्ठिराला पकडण्याचा आटोकाट प्रयत्न करीन मात्र अर्जुन त्याचे संरक्षण करण्यास उपस्थित असेल तर हे शक्य होणार नाही. तेव्हां त्याला काही करून दूर ठेवा. ' दुर्योधनाने हे मान्य केले. पुढील तीन-चार दिवस कौरवांचा हा मुख्य युद्धहेतू राहिला व सर्व युद्धबेत त्याप्रमाणे ठरले. ही गोष्ट अर्थातच पांडवाना समजलीच व त्यांनीही युधिष्ठिराचे संरक्षण करण्याला प्राधान्य दिले.

पहिल्या दिवशी अर्जुन त्रिगर्त सैन्याशी लढण्यात बराच काल व्यग्र राहिला. हे संशप्तक सैन्य हे एक जरासे धुसर प्रकरण आहे. युद्धाच्या पहिल्या दिवसापासून यांनी आव्हान दिले कीं अर्जुन त्यांच्याशी लढत बसे. अठरा अध्याय गीता ऐकून देखील अर्जुन पितामह भीष्म वा गुरु द्रोण यांच्याशी अटीतटीने लढण्यास कधीच उत्सुक नसे. तो आपला संशप्तकांशी लढत राही! अगदी पांडवांच्या इतर वीराना भीष्म वा द्रोण झेपेनासे झाले म्हणजे त्याला पुढे व्हावेच लागे. कृष्णही त्याला तसे करू देत होता असें दिसते. या द्रोणपर्वातीलप्रथम दिवशीही दिवस अखेर द्रोणाचा हल्ला परतवण्यासाठी अर्जुनाला संशप्तकांचा नाद सोडून देऊन द्रोणाशी सामना करावा लागला. मात्र द्रोणालाही युधिष्ठिराला पकडण्यात यश आले नाही. दुर्योधनाने नाराजी व्यक्त केल्यावर द्रोणाने पुन्हा निक्षून सांगितले कीं अर्जुन प्रतिकार करत असताना युधिष्ठिराला पकडणे मला जमणार नाही तेव्हां त्याला दिवसभर अडकवून ठेवा. मग पुन्हा त्रिगर्तराज सुशर्मा, त्याचे भाऊ व इतर त्रिगर्त वीरांनी हे आव्हान स्वीकारले व आम्ही पडेल ती किंमत देऊन उद्यां दिवसभर अर्जुनाला व्यग्र ठेवूं असे दुर्योधनाला आश्वासन दिले. त्याप्रमाणे युद्धाच्या बाराव्या दिवशी अर्जुन युधिष्ठिराच्या रक्षणाचे काम सत्यजित नावाच्या द्रुपदपुत्रावर सोपवून त्रिगर्तांशी लढायला गेला. वास्तविक, सत्यजित हा कोणी सात्यकी वा धृष्टद्युम्न यांच्यासारखा महावीर नव्हता. तेव्हां ही व्यवस्था पुरेशी नव्हती. पण याबद्दल युधिष्ठिर, इतर पांडव वा कृष्ण यांनी नाराजी व्यक्त केली नाही. बहुधा वेळ आलीच तर नेहेमीप्रमाणे आपण त्रिगर्ताना सोडून परत येऊं असे अर्जुनाला वाटले असावे. मात्र हा सर्व दिवस त्रिगर्तानी अर्जुनाला सोडले नाही. अर्जुनाने त्यांची अपरिमित हानि केली. अनेकाना मारले. या युद्धाचे रसभरित वर्णन व्यासानी केले आहे. मात्र इकडे बिचारा सत्यजित द्रोणापुढे काही न चालून अखेर मारला गेलाच. दिवसभर प्रयत्न करून द्रोणालाही युधिष्ठिराला पकडता आले नाहीच कारण इतर पांडवपक्षाच्या वीरानी प्रखर प्रतिकार केला. दिवसाच्या उत्तरभागात कौरवपक्षाचा एक योद्धा भगद्त्त हा पांडवांना फार भारी पडूं लागला व कोणालाही आवरेना त्यामुले अखेरीस, द्रोण बाजूलाच राहून, अर्जुनाला भगदत्ताचाच प्रतिकार करण्यासाठी धाव घ्यावी लागली. अर्जुनाने भगदत्ताला मारेपर्यंत दिवस मावळला व दुर्योधन व द्रोण यांचा युधिष्ठिराला पकडण्याचा मुख्य बेत असफलच राहिला. दुर्योधनाने नाराजी व्यक्त केल्यावर द्रोणाने पुन्हा

तेच कारण सांगितले कीं अर्जुन असताना जमणार नाही.

तिसऱ्या दिवशी पुन्हा त्रिगर्तानीच अर्जुनाला आव्हान दिले व अर्जुन पुन्हा एकदा त्यांच्याशी लढायला गेला असे महाभारत म्हणते. दुसऱ्या दिवशीच्या त्रिगर्त-अर्जुन युद्धाचे दीर्घ आणि रसभरित वर्णन करणाऱ्या व्यासानी या दिवशीचे अर्जुन-त्रिगर्त युद्ध कसे झाले, कोणी काय पराक्रम केला, अर्जुनाने कोणाकोणाला मारले याबद्दल अवाक्षरही लिहिलेले नाही. सर्व दिवसाच्या युद्धाचे वर्णन फक्त दोन श्लोकांत 'उरकले' आहे. हे अतिशय संशयास्पद आहे! शिवाय यादिवशी युधिष्ठिराच्या रक्षणाची कोणतीही व्यवस्था अर्जुनाने केली नव्हती! आदल्या दिवशी ती जबाबदारी सत्यजितावर सोपवली त्याचे काय झाले हे कृष्णार्जुनाना ठाऊक नव्हते काय? या सर्वांमुळे मला असा दाट संशय आहे कीं त्या तिसऱ्या दिवशी अर्जुन थकव्यामुळे वा जखमांमुळे युद्धाला बाहेर पडलाच नसावा! मात्र या तर्काला महाभारत ग्रंथात कोणताही आधार मला देता येत नाही. या दिवशी अर्जुन युद्धात असणार नाही हे बहुधा कौरवपक्षाला खात्रीपूर्वक माहीत नसावे कारण तसे असते तर द्रोणाने युधिष्ठिराला पकडण्याच्या दृष्टीने 'आक्रमक' व्यूहरचना केली असती. प्रत्यक्षात त्याने दुर्योधनाला आश्वासन दिले कीं 'आज मी पांडवपक्षाच्या एकातरी प्रमुख वीराचा वध घडवून आणीन!' आणि त्याने कौरव सैन्याचा चक्रव्यूह रचला. या व्यूहाचे 'भेदण्यास अत्यंत अवघड' असे व्यासानी वर्णन केले आहे. हे वर्णन बचावात्मक व्यूहाला जास्त योग्य वाटते आक्रमक व्यूहाला नव्हे! त्यामुळे असे वाटते कीं अर्जुन आज कदाचित युद्धामध्ये नसेल याची कौरवाना काही कल्पना असती तर द्रोणाने सर्व बळ एकवटून युधिष्ठिराला पकडण्याचा प्रयत्न केला असता. बचावात्मक व्यूह रचला नसता.

संजयाने सर्व १८ दिवसांच्या युद्धाचे वर्णन धृतराष्ट्राला ऐकविले हे सर्व ज्ञात आहे. त्याचेसाठी कृष्णाने त्याला दिव्यदृष्टि दिली होती, तो सर्ववेळ धृतराष्ट्रापाशी बसून युद्धाचा 'आंखों देखा हाल' त्याला ऐकवत होता, अशी एक भोळसट हरदासी समजूत आहे. प्रत्यक्षात तसे काही नाही. संजय प्रत्यक्ष युद्धभूमीवरच उपस्थित होता असे अनेक उल्लेख युद्धवर्णनात आहेत. शेवटच्या दिवशी तर त्याने स्वत: युद्धातही भाग घेतला! मात्र त्याचे आधी, त्याला युद्धभूमीवर कोठेही फिरण्यास आडकाठी करू नये असे दोन्ही पक्षानी मान्य

केले असावे. आजही वृत्तपत्रे वा रेडिओ-टीव्ही याना असे स्वातंत्र्य असते. त्याने, भीष्म पडल्यावर, द्रोण मारला गेल्यावर, कर्णाचा मृत्यु झाल्यावर व अखेरच्या दिवशी, अशा चार टप्प्यात युद्धाचे वर्णन धृतराष्ट्राला प्रथम संक्षिप्त व पुन्हा खुलासेवार असे ऐकवले असे महाभारतच म्हणते! पण कृष्णाला देवाचा अवतार बनवणाराना कोण आवरणार? या दिवसाचे युद्धवर्णनही व्यासानी संजयाच्या तोंडून धृतराष्ट्राला ऐकवले आहे. युद्धाला तोंड लागले तेव्हां चक्रव्यूहाच्या पुढे द्रोण स्वत:, जयद्रथ, अश्वत्थामा, शकुनि, शल्य व भूरिश्रवा हे पांडवांना सन्मुख सज्ज होते. द्रोणाने युधिष्ठिरावर आक्रमण करण्यापूर्वीच पांडवांच्या प्रमुख वीरांनी द्रोणावरच हल्ला केला. मदतनिसांच्या सहाय्याने द्रोणाने त्याना यशस्वीपणे तोंड दिले. आता आपल्या वीरांची परवा न करतां द्रोण आपल्यावरच कोसळेल असे दिसल्यामुळे (अर्जुन अर्थातच जवळ नव्हताच), नाइलाजाने युधिष्ठिराने अभिमन्यूला द्रोणावर आक्रमण करण्यास सोडले. हा वेळ पर्यंत चक्रव्यूह मागे तसाच होता. तो तोडण्यासाठी कोण पुढे येतो हे द्रोण पहात होता. तोंच द्रोणावर आक्रमण करून अभिमन्यूने अचानक, द्रोणाचीही पर्वा न करतां, मुख्य चक्रव्यूहावरच आक्रमण केले. चक्रव्यूह तोडून आत घुसून त्याने अनन्वित संहार आरंभला. त्याचा प्रतिकार करण्यासाठी दुर्योधन स्वत; पुढे झाला. अभिमन्यु हा महारथी असल्यामुळे दुर्योधनाचा पाड लागणार नाही हे जाणून द्रोणाने त्याच्या मदतीला दु:सह, दु:शासन, कृप, विविंशति, यांचे बरोबरच, स्वत:जवळ असलेल्या अश्वत्थामा, भूरिश्रवा, शल्य, शकुनि यानाही पाठवले व मग काही वेळाने तो स्वत:ही तिकडेच धावला. यामुळे युधिष्ठिरावर हल्ला करण्याचा बेत बाजूलाच पडला. युधिष्ठिराचा हेतु त्या वेळेपुरता सफळ झाला पण त्याची फार भयानक किंमत पांडवांना मोजावी लागली.

कौरवपक्षाचे अनेक महावीर अभिमन्यूवर चालून आले. कर्णासह सर्वांना अभिमन्यूने अनेकवार चकमकींत हरवून पळवून लावले. शल्याला हरवल्यावर त्याचे सैन्य पळून जाऊ लागले तेव्हां त्याच्या भावाने ते सावरून धरले. मात्र अभिमन्यूने त्याच्यावर हल्ला चढवून त्यालाच मारले. अभिमन्यूचा पराक्रम पाहून द्रोण त्याचे कौतुक करू लागला तेव्हा दुर्योधनाला राग येऊन तो द्रोणाला म्हणाला कीं ’त्याचे कौतुक कसले करता? तो

कोणालाच आवरत नाहीं. त्याच्या वधाचा उपाय सांगा. ' तेव्हा द्रोणाने म्हटले कीं 'त्याच्या हातातले धनुष्य चालू आहे तोंवर आपल्या कोणाही वीराला तो दाद देणार नाही. एकजुटीने हल्ला करूनही तुमचा निभाव लागत नाही. तेव्हा प्रयत्नपूर्वक त्याचे धनुष्य तोडा!' अभिमन्युपुढे कोणीच उभा राहूं शकत नव्हता. कर्णालाही त्याने पुन्हापुन्हा पळवून लावले. त्याच्या भावाला अभिमन्यूने मारले. एक उल्लेख आहे कीं 'एक जयद्रथ सोडला तर इतर कोणाचेच काही चालत नव्हते' मात्र प्रत्यक्षात जयद्रथ व अभिमन्यूचे युद्ध झालेले अजिबात वर्णिलेले नाही!

अभिमन्यु चक्रव्यूहात एकटाच शिरला अशी समजूत आहे. एके ठिकाणी मात्र असाही उल्लेख संजयाच्या वर्णनात आहे कीं 'युधिष्ठिर, भीम, शिखंडी, सात्यकी, धृष्टद्युम्न व इतर अनेक अभिमन्यूच्या मार्गाने गेले व त्याच्या भोवती संरक्षक कडे करून त्यानी कौरवांचा पाठलाग केला, मात्र मग त्या सर्वांना जयद्रथाने अडवले. एके ठिकाणी असाही उल्लेख आहे कीं 'अभिमन्यूच्या सारथ्याने व्यूहात पडलेल्या भगदाडातून कौशल्याने त्याचा रथ बाहेर काढला व पांडवानी त्याचा जयजयकार केला. ' मात्र हे क्षणिक उल्लेख सोडले तर अभिमन्यु एकटाच चक्रव्यूहात शिरला आणि त्याने उघडून दिलेल्या वाटेने इतर पांडववीर व्यूहात शिरण्याचा प्रयत्न करीत असताना एकट्या जयद्रथाने त्यान यशस्वीपणाने अडवून धरले असेच महाभारत म्हणते. त्याला वर मिळाला होता कीं 'युद्धात कोणत्यातरी एका दिवशी अर्जुन सोडून इतर सर्व पांडवाना तूं अजिंक्य ठरशील. ' हा वर त्याने जेव्हा पांडव वनात असताना द्रौपदीला एकटी असताना पळवण्याचा प्रयत्न केला होता व मग पांडव परत आल्यावर भीमार्जुनानी तिला सोडवून मग त्याची भयानक अप्रतिष्टा केली होती तेव्हा चिडून जाऊन तप:चर्या करून मिळवला होता असे महाभारत म्हणते. यात गोम अशी आहे कीं या वरामध्ये सात्यकी किंवा धृष्टद्युम्न किंवा पांडवाकडील इतर रथी-महारथी यांचा समावेश कुठे होता? मग त्यांचेही जयद्रथापुढे कां चालले नाही? महाभारत याचा खुलासा करत नाही! अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं Every dog has his day या उक्तीप्रमाणे हा जयद्रथाचा दिवस होता! त्यामुळे अभिमन्यूच्या मदतीला कोणीही व्यूहात शिरू शकले नाही.

जयद्रथाला मिळालेल्या वराची हकीगत पांडव पक्षाच्या वीराना व्यूहात

शिरण्यात आलेल्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी रचली असावी असा संशय येतो! जयद्रथाला स्वप्नात शंकराने वर दिला असें म्हटले आहे त्यामुळे असें वाटते. काही असो, अभिमन्यु चक्रव्यूहात एकटा अडकला. त्याने दिवसभर कौरवांच्या पक्षाच्या एकाही महावीराला दाद दिली नाही. अनेकजण मिळून चालून आले तरीही त्याने त्याना पळवले. त्याने कोणाकोणाला मारले याची मोठी यादी होईल. अखेर द्रोणाचा सल्ला मानून कर्णाने पुन्हा अभिमन्यूवर चाल केली आणि अखेर त्याचे धनुष्य तोडले. महाभारतातील युद्धवर्णनात अनेक वीरांचीं धनुष्ये अनेकवार तोडली गेल्याचे उल्लेख येतात. त्याला अपवाद फक्त अर्जुनाचा! त्याचे गांडीव धनुष्य मात्र कधीही तोडले गेल्याचा उल्लेख मिळत नाही. कर्णाजवळ गांडीवधनुष्याच्या तोडीचे धनुष्य होते असे म्हटलेले आहे मात्र त्याचे धनुष्य जयद्रथवधाचे दिवशी भीमाने मोजून सतरा वेळां तोडले असे वर्णन आहे. सात्यकी, अभिमन्यु आणि इतर अनेकांनीही ते तोडले. धनुष्य तोडणे याचा अर्थ प्रत्यंचा तोडणे असाही कदाचित असेल!

अभिमन्यूचे धनुष्य तुटले, सारथी मेला, घोडे मेले. मग हाताशी मिळेल त्या आयुधाने त्याने युद्ध चालूच ठेवले. अखेर सर्व संपल्यावर दु:शासनाचा पुत्र व अभिमन्यु यांचे गदायुद्ध झाले, दोघे मूर्छित पडले मात्र दु:शासनपुत्र आधी शुद्धीवर आला व त्याने गदेच्या प्रहाराने अभिमन्यूची अखेर केली. दिवस संपत आलेला होता. त्यामुळे युद्ध संपवून दोन्ही सैन्ये माघारीं फिरलीं.

दिवस मावळला. सैन्ये शिबिरात परतलीं. त्यानंतर संशप्तकांकडून कृष्ण व अर्जुन परत आले असे महाभारत म्हणते. पांडव शिबिरात सामसूम व शोक पाहून काय झाले ते अर्जुनाने विचारले व मग नाइलाजाने युधिष्ठिराने अभिमन्यु मारला गेल्याचे अर्जुनाला सांगितले. त्याने अर्जुनाला सांगितलेली हकिगत व आधीच्या लेखात दिलेली हकीगत यात किरकोळ विसंगति दिसते. युद्धाच्या सुरवातीला पांडववीरानी संयुक्तपणे द्रोणावर हल्ला केल्याचे व तो द्रोणाने परतवून लावल्याचे युधिष्ठिर सांगत नाही. तो म्हणाला, 'मला पकडण्याचा द्रोणाने शर्थीचा प्रयत्न केला आणि त्याचाच प्रतिकार आम्हाला जड पडत होता

मग सैन्याचा मुख्य चक्रव्यूह कोण तोडणार हा प्रश्न होता. नाइलाजाने ते काम अभिमन्यूवर सोपवावे लागले कारण त्यालाच ते माहीत होते. त्याने व्यूह तोडल्यावर त्याच वाटेने त्याच्या पाठोपाठ जाऊन त्याचे रक्षण करण्याचे आमचे सर्व प्रयत्न जयद्रथामुळे विफल झाले आणि अभिमन्यु एकटाच व्यूहात सापडला. मग द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण, बृहत्बल व कृतवर्मा यांनी त्याला घेरले आणि अखेर दु:शासनपुत्राकडून तो मारला गेला.' अर्जुन संशप्तकांकडे अडकलेला असो वा माझ्या शंकेप्रमाणे शिबिरातच असो, पण एक दिवस तो नसताना त्याचा पुत्र मारला गेला. अर्जुनाने, जणू, जयद्रथाला या अनर्थाला जबाबदार धरून, 'उद्या सूर्यास्तापूर्वी मी जयद्रथाचा वध करीन, नाहीतर अग्निकाष्टे भक्षण करीन' अशी घोर प्रतिज्ञा अचानक केली. प्रत्यक्षात अभिमन्यूला घेरणाऱ्या सहाही वीरांना सोडून (त्यातील बृहत्बलाला अभिमन्यूनेच मारले होते.) जयद्रथाला मारण्याची प्रतिज्ञा अर्जुनाने कां केली हे एक जरासे कूट आहे. आपले हरदास-पुराणिक म्हणत कीं अर्जुन आणि कृष्ण रणात अभिमन्युचा शोध घेत फिरत होते व मरणासन्न अभिमन्यूने त्याना सर्व हकीगत स्वत:च सांगितली. रणात पडलेल्या अभिमन्यूला जयद्रथाने लाथ मारली हे अभिमन्यूकडून ऐकून चिडून अर्जुनाने त्याच्या वधाची प्रतिज्ञा केली. महाभारतात असें काही मुळीच नाही. थोडा विचार केल्यावर अर्जुनाच्या प्रतिज्ञेचा मला असा खुलासा सुचतो कीं कौरववीरांनी अनेकांनी मिळून एकट्या पडलेल्या अभिमन्युचा वध केला तर आतां त्या सर्वांना अर्जुनाचे हे एक निर्वाणीचे आव्हान होते कीं 'मी जयद्रथाच्या वधाची प्रतिज्ञा केली आहे, ती माझ्या एकट्याच्या बळावरच विसंबून. अभिमन्यु एकटाच होता त्याला तुम्ही सर्वांनी मिळून मारलेत, आता तुमच्यात बळ असेल तर सर्वांनी मिळून जयद्रथाला एकट्या माझ्यापासून वांचवा!' पुत्राच्या मृत्यूमुळे त्याला अनिवार शोक झाला असणारच तेव्हा आता एक तर कौरववीरांचा नक्षा उतरवणे किंवा स्वत: मरून जाणेच श्रेयस्कर असे त्याला वाटणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. दुसऱ्या दिवशी काय घडले याचा विस्तृत परामर्ष मी जयद्रथवध प्रकरणात घेतला आहे. तो वाचकानी अवश्य नजरेखालून घालावा. अनेकांनी मिळून केलेला अभिमन्यूचा वध कौरवपक्षाला फार महाग पडला व दिवस अखेर पांडवपक्षाची अंतिम विजयाकडे वाटचाल सुरू झाली एवढेच म्हणून हा विषय पुरा करतों.

# जयद्रथवध

जयद्रथवध हे महाभारत युद्धातील एक अतिशय वेधक असे प्रकरण आहे. सर्व अठरा दिवसांच्या युद्धाचे खुलासेवार वर्णन महाभारतात आहे. त्यातील संख्यात्मक अतिशयोक्ति व अद्‌भुत असे अस्त्रवापराचे वर्णन सोडून दिले तर युद्धहेतु, डावपेच, असेही बरेच वाचण्यासारखे आहे. जयद्रथवधाच्या दिवशीचे डावपेच, दोन्ही पक्षांच्या प्रमुख योद्‌ध्यांनी दाखवलेले अतुलनीय धैर्य व कौशल्य, या दिवसाच्या घोर युद्धाचा दोन्ही पक्षांच्या तौलनिक बळांवर झालेला निर्णायक परिणाम, कृष्ण व अर्जुन दोघानीही अनेक अडचणींवर दिवसभर धैर्याने व युक्तीने मात करून अखेर मिळवलेले यश या सर्वांमुळे हे एक अतिशय रंगतदार युद्धप्रकरण ठरते.

भीष्माच्या आधिपत्याखाली दहा दिवस युद्ध चालले तोवर दोन्ही पक्षांनी थोडाफार संयम राखला होता व अनुचित प्रकार झाले नाहीत. भीष्मपतनानंतर द्रोण सेनापति झाला, तसेच दहा दिवस युद्धापासून अलिप्त राहिलेला कर्णही युद्धात उतरला. त्यानंतर डावपेचांचे युद्ध सुरू झाले! दुर्योधनाच्या सूचनेवरून द्रोणाने युद्धहेतु ठरवला कीं रणात युधिष्ठिराला पकडावयाचे व पुन्हा द्यूत खेळावयास लावून व हरवून वनांत पाठवावयाचे! युद्ध संपवण्याचा कौरवांनी ठरवलेला तो मार्ग होता. द्रोणाने या हेतूसाठी अट घातली की अर्जुनाला दूर ठेवू शकलात तरच हे जमेल, त्याच्या उपस्थितीत नाही! हा बेत साधला तर पांडवाना मारण्याची गरज उरणार नाही हे जाणून द्रोणाने तो मान्य केला असावा. पांडवपक्षाला हा बेत कळल्यामुळे द्रोण जिवंत असेपर्यंतच्या पांच दिवसांच्या युद्धात त्यांनी या बेताचा निकराने प्रतिकार केला. इंद्राकडून कर्णाला मिळालेली अमोघ शक्ति नष्ट होईपर्यंत कृष्णालाही त्याचा व अर्जुनाचा निर्णायक युद्धप्रसंग टाळावयाचा होता. युधिष्ठिराला पकडण्याच्या बेताचा दुर्योधनाने बराच गाजावाजा केला होता, त्यामुळे आपला शब्द पाळण्याचे द्रोणावरही दडपण होते.

द्रोणाच्या आधिपत्याखाली पहिल्या दिवशी (युद्धाच्या अकराव्या दिवशी) दोन्ही पक्षांच्या वीरांची घनघोर युद्धे झाली. अर्जुन उपस्थित असल्यामुळे द्रोणाचा बेत सफळ झाला नाही. दिवस अखेर पांडवांचीच सरशी राहिली. द्रोणानी पुन्हा म्हटले कीं अर्जुनाला इतरत्र गुंतवलेत तरच मला काही करतां येईल. तेव्हा त्रिगर्त देशाचा राजा सुशर्मा व त्याचे भाऊ यानी हे कार्य पत्करले. त्यानी अर्जुनाला अडवण्याची प्रतिज्ञा केली. त्याप्रमाणे बाराव्या दिवशी सुरवातीलाच त्यानी अर्जुनाला आव्हान दिले. युधिष्ठिराच्या रक्षणाचे काम द्रुपदपुत्र सत्यजित याच्यावर सोपवून अर्जुन त्रिगर्तांकडे वळला. या दिवशी अर्जुनाने अद्भुत पराक्रम करून त्रिगर्त सेनेला धूळ चारली. मात्र इकडे द्रोणापुढे मात्रा न चालून सत्यजित मारला गेला. युधिष्ठिराला धृष्टद्युम्न व इतरानी वाचवले. पाठोपाठ राजा भगदत्ताने पांडवांवर जोराचा हल्ला केला व द्रोण बाजूलाच राहून भगदत्तच पांडवाना भारी पडू लागला तेव्हा त्रिगर्तांचा प्रतिकार मोडून काढून अर्जुन परतला व त्याने भगदत्ताला मारले. दिवसभर निकराचे प्रयत्न करूनही दुर्योधन-द्रोणांचा बेत सफळ झाला नाही. दुर्योधनाने यासाठी द्रोणाला दोष दिला तेव्हा त्याने पुन्हा तेच म्हटले की अर्जुन असताना काही जमत नाही. त्यामुळे तेराव्या दिवसाचा युद्धबेत पुन्हा तोच ठरला की त्रिगर्तानी अर्जुनाला अडवावयाचे. द्रोणाने आश्वासन दिले की हे जमले तर आज मी पाडवपक्षाच्या एकातरी महान वीराला मारीन. युधिष्ठिराला पकडण्याबद्दल मात्र त्याने काही म्हटले नाही. हा दिवस अभिमन्यूचा व जयद्रथाचा ठरला व अभिमन्यु मारला गेल्यामुळे अर्जुनाने जयद्रथवधाची प्रतिज्ञा केली.

आदल्या दिवशी प्रचंड हानि होऊनही या दिवशी पुन्हा एकदा त्रिगर्तांनी अर्जुनाला आव्हान दिले व यावेळी मात्र त्याला दिवसभर अडवून ठेवण्यात यशस्वी झाले. सर्व भारतीय युद्धाच्या वर्णनात अर्जुनाच्या अनेक पराक्रमांचे खुलासेवार वर्णन आहे. आदल्या दिवशी त्रिगर्तांचे अर्जुनाने केलेले हाल तसेच खुलासेवार वर्णिले आहेत. या दिवशीचे त्रिगर्त-अर्जुन युद्धवर्णन मात्र अतिशय त्रोटक आहे. हे एक नवल आहे. प्रत्यक्षांत अर्जुन या दिवशी थकव्यामुळे वा जखमांमुळे युद्धापासून दूरच राहिला होता कीं काय अशी मला शंका आहे! दुसरे नवल म्हणजे या दिवशी अर्जुन मुख्य युद्धापासून दूर असूनही द्रोणाने

युधिष्ठिराला पकडण्याचा प्रयत्न केलाच नाही! त्याने सैन्याचा चक्रव्यूह रचला. तो खरेतर बचावात्मक व्यूह होता. आक्रमण करण्यास अत्यंत कठीण असेच त्याचे वर्णन केलेले आहे. तो कसा तोडावा हे अर्जुन सोडून इतर कोणाला माहीत नव्हते. अर्जुनाशिवाय जो कोणी या व्यूहावर आक्रमण करील तो मारला जाईल ही द्रोणाची अपेक्षा असावी. त्यानुसारच त्यांची एकातरी प्रमुख वीराला मारण्याची प्रतिज्ञा होती. मात्र अर्धवट ज्ञानावर अभिमन्यूने प्रयत्न केला व व्यूह तोडल्यावर तो फारच अनावर झाला. एकटा असूनही दिवसभर त्याने अतुल पराक्रम केला व कौरवसैन्याची अपरिमित हानि झाली. अनेक वीर मारले गेले. दिवस अखेरीला द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, बृहत्बल व कृतवर्मा या सर्वांनी एकत्र येऊन त्याला घेरण्यात व त्याचे धनुष्य तोडण्यात यश मिळवले व मग कसाबसा त्याचा वध केला व सुटकेचा निश्वास टाकला! प्रत्यक्ष मॄत्यु मात्र दु:शासनपुत्राबरोबर गदायुद्ध करताना झाला. व्यूहांत अभिमन्यु एकाकी पडण्याचे कारण असे की त्याने मोकळी करून दिलेल्या वाटेने व्यूहात शिरूं पाहणाऱ्या सात्यकी, भीम व इतर पांडव वीरांना जयद्रथाने दिवसभर अडवून ठेवले. महाभारतामध्ये याचा खुलासा, एक दिवस अर्जुन सोडून इतर पांडवांना तू अजिंक्य होशील असा शंकराकडून त्याला वर मिळाला होता असा केला आहे. तेव्हां हा जयद्रथाचा दिवस होता असे म्हणावे लागते. मात्र अभिमन्यूच्या वधात त्याचा प्रत्यक्ष सहभाग मुळीच नव्हता. मृत्युमुखीं पडलेल्या अभिमन्यूला त्याने लाथ मारली अशी एक हरदासी कथा आहे पण त्याला महाभारतात आधार मुळीच नाही. एकूण या दिवसाचे लक्ष्य, युधिष्ठिराला पकडणे असे न राहता अभिमन्यूला मारणे हे ठरले व त्यांत मात्र कौरव यशस्वी झाले. त्याची भयंकर किंमत त्याना दुसरे दिवशी मोजावी लागली!

अभिमन्यूच्या मृत्यूबरोबरच या दिवशीचे युद्ध संपले. अर्जुन परत आल्यावर त्याला झालेला प्रकार समजला. अभिमन्यूला संरक्षण न दिल्याबद्दल त्याने सर्व पांडववीरांना दोष दिला. जयद्रथाने सर्वांना अडवले असे कळल्यावर झाल्या अनर्थाला जयद्रथच व्यक्तिश: जबाबदार आहे असे ठरवून, ‘उद्यां सूर्यास्तापूर्वी जर मी जयद्रथाला मारले नाही तर मी अग्निकाष्टे भक्षण करीन’ अशी घोर प्रतिज्ञा अर्जुनाने अचानक केली. पांडवपक्षाला ही प्रतिज्ञा अडचणीत टाकणारी होती. अर्जुनाने कृष्णाशी वा इतर पांडववीरांशी सल्लामसलतही केली

नाही. रागाच्या भरात केलेल्या या प्रतिज्ञेचे युद्धावर फार निर्णायक परिणाम झाले. अर्जुनापासून जयद्रथाला एक दिवसभर वांचवण्यासाठी द्रोणाने सर्व कौशल्य पणाला लावून व्यूहरचना केली. सर्व सैन्याच्या व्यूहाच्या मागे दूरवर जयद्रथाला ठेवून त्याच्या रक्षणासाठी खुद्द जयद्रथाचेच मोठे सैन्य ठेवले. शिवाय कर्ण, अश्वत्थामा, शल्य, कृप, भूरिश्रवा, कर्णपुत्र वृषसेन या सहा महावीरांना मोकळे ठेवून त्याना अर्जुनाचा प्रतिकार करण्याचेच काम दिले. मुख्य सैन्याचा चक्रशकट नावाचा व्यूह रचून त्याचे प्रमुखपदी दु:शासन, दुर्मर्ष व विकर्ण याना नेमून व्यूहाच्या अग्रभागी द्रोण स्वत: होता. पाठीमागील कौरव सैन्याचा पद्मव्यूह रचून त्याचे प्रमुखपद कृतवर्म्याकडे दिले होते. हा सर्व व्यूह तोडून व सहा महावीरांचा प्रतिकार मोडून काढल्यावरच अर्जुनाला जयद्रथ दिसणार होता व मग त्याच्याशी अंतिम युद्ध करावयाचे होते! सहा महावीराना मोकळे ठेवण्याचा हेतु त्यानी दिवसभर अर्जुनाला पाळीपाळीने अडवावयाचे असा होता. हा एक Dynamic Defense चा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. अर्जुन हा व्यूह तोडण्यात व सहांशी लढण्यात दिवसभर मग्न असताना द्रोणाच्या हाताखालील वीरांचा मुख्य रोख युधिष्ठिरावर राहणार होता. त्याला पकडण्याची या दिवशी चांगली संधि होती. पांडवांनाही याची जाणीव होती त्यामुळे या दिवशी मात्र व्यूहात शिरण्यापूर्वी अर्जुनाने युधिष्ठिराच्या रक्षणाची जबाबदारी महारथी सात्यकीवर टाकली होती. या दिवशीच्या युद्धाचे फार निर्णायक परिणाम झाले त्याचे वर्णन महाभारतात फार सुंदर व खुलासेवार केले आहे.

युद्ध सुरू झाल्यावर दोन स्पष्ट भाग पडले. कित्येक वीर व प्रचंड सैन्य अर्जुनाचा प्रतिकार करत होते तर दुसरीकडे द्रोणाचा प्रतिकार युधिष्ठिर, सात्यकी, धृष्टद्युम्न व इतर पांचाल वीर करत होते. अर्जुनाने सबंध दिवसभर कित्येक प्रमुख वीरांशी, काहींशी पुन्हापुन्हा, सामना करत व प्रचंड सैन्यसंहार करत जयद्रथाच्या दिशेने प्रगति चालू ठेवली. युधामन्यु व उत्तमौजा या दोन पांचाल राजपुत्रांकडे अर्जुनाचा रथ रक्षण्याचे काम होते. मात्र सुरवातीलाच, कृतवर्म्याने त्यांना अडवून धरले. अर्जुन पुढे निघून गेला. त्यानंतर दिवसभर त्याना अर्जुनाला गाठता आले नाही. सगळ्या कौरवसैन्याला वळसा घालून दिवस अखेरीला ते पाठीकडून अर्जुनापाशी पोचले.

द्रोणाला बाणांनीच वंदन करून व कृतवर्म्याला हारवून अर्जुन एकटाच सैन्यात घुसल्यावर, दिवसभर अनेकानी त्याला अडवले. अनेकाना त्याने मारले. सर्वांची यादी देत बसण्यात अर्थ नाही. दुर्योधन द्रोणापाशी जाऊन तक्रार करू लागला की 'तुम्हाला ओलांडून अर्जुन पुढे कसा गेला? तुम्ही वचन दिले नसते तर मी जयद्रथाला परत जाऊं दिले असते. आता त्याचे रक्षण कसे करावे याची सर्वाना चिंता वाटते आहे'. द्रोणाने उत्तर दिले की 'कृष्णाने रथ एवढ्या वेगाने नेला की माझे बाण त्याच्यापर्यंत पोचेनात. आता तो गेलाच आहे व समोर युधिष्ठिर आहे तर त्याला पकडण्याचा मी यत्न करतो. तुला मी मंत्र कवच बांधतो. म्हणजे तुला अर्जुनाचे बाण लागणार नाहीत. तूंही शूरवीर आहेस तेव्हा तू अर्जुनाशी सामना कर. ' कवच बांधून दुर्योधन अर्जुनाला गाठण्यासाठी गेला. इकडे दिवसभर, अर्जुनाशी सामना करण्यासाठी मोकळे ठेवलेले सहा महावीर सोडून इतर अनेक वीरांनी द्रोणाला युधिष्ठिराला पकडण्यासाठी साह्य केले. युधिष्ठिर, सात्यकी, भीम, धृष्टद्युम्न व इतर पांडव व पांचालवीर यांनी या हल्ल्यांचा भार वाहिला.

अर्जुन हळूहळू जयद्रथाच्या दिशेने प्रगति करीत होता. अवंतीचे महारथी राजे विंद व अनुविंद यानी त्याला अडवले. त्याना अर्जुनाने मारले व त्यांचे सैन्य उधळून लावले. यानंतरची एक अद्‌भुत घटना म्हणजे, आपल्या घोड्याना विश्रांति व सेवा हवी आहे असे पाहून अर्जुन रथातून खाली उतरून फक्त एका धनुष्याने सैन्याचा प्रतिकार करत राहिला व कृष्णाने शांतपणे घोडे सोडून व त्याना खरारा करून, अंगात घुसलेले बाण काढून टाकून व हलकेच फिरवून त्याना परत हुशार केले व पुन्हा रथाला जोडले. अर्जुन व कृष्ण पुन्हा रथावर चढलेले पाहून कौरव योद्धे उदासीन झाले व जयद्रथ आता वाचत नाही असें म्हणू लागले. यावेळी मंत्रकवच बांधलेला दुर्योधन स्वत: अर्जुनाला भिडला

अर्जुनाचे व दुर्योधनाचे युद्ध सुरू झाले. अर्जुनाचे बाण लागूनही दुर्योधनाला इजा होत नाही हे पाहून कृष्ण चकित झाला. तुझ्या हातातील बळ संपले की काय असे त्याने अर्जुनाला खिजविले! द्रोणाने दुर्योधनाला बांधलेले मंत्रकवच ओळखून अर्जुन कृष्णाला म्हणाला की ही विद्या द्रोणाने मला एकट्यालाच शिकवली आहे व कवचाचा भंग करणेही शिकवले आहे! त्याप्रमाणे कवचभंगासाठी त्याने केलेला अस्त्रप्रयोग मात्र अश्वत्थाम्याने

दुरूनच दुसरे अस्त्र सोडून निष्फळ केला. आतां त्याच अस्त्राचा पुन्हा प्रयोगही करता येणार नव्हता! त्यामुळे निर्भय झालेल्या दुर्योधनाने जोरदार शरवृष्टि सुरू केली तेव्हा राग येऊन अर्जुनाने त्याचा रथ, सारथी, घोडे यांचा नाश केला व त्याच्या तळहातांवर व नखांवर बाण मारले. हे भाग कवचाने संरक्षित नसल्याने भयंकर इजा होऊन दुर्योधनाने पळ काढला! आकस्मिक आलेल्या अडचणीला अर्जुनाने कौशल्याने तोंड दिले. यानंतर अर्जुनाचीं सहा संरक्षक वीरांशी वारंवार युद्धे झाली.

द्रोणाशी सामना करताना युधिष्ठिराला कृष्णाच्या पांचजन्याचा सारखा आवाज येत होता पण अर्जुनाच्या गांडीव धनुष्याचा येईना त्यामुळे अर्जुनाच्या सुरक्षिततेची चिंता वाटून त्याने अखेर सात्यकीला 'माझे रक्षण मी कसेही करीन पण तू जा' असे निक्षून सांगून त्याला अर्जुनाच्या मदतीला पाठवले. युधिष्ठिराच्या रक्षणाची जबाबदारी भीमावर सोपवून सात्यकी निघाला. द्रोण व कृतवर्मा यांचा जोरदार विरोध मोडून काढून सात्यकी सैन्यात घुसला. अनेक वीरांचा व सैन्याचा पुन्हापुन्हा संहार करून शेवटी तो अर्जुनाजवळ पोचला. सात्यकी जाऊनही बराच वेळ झाला तरीही अर्जुनाची खुशाली कळेना तेव्हा मोठा धोका पत्करून युधिष्ठिराने भीमालाही अर्जुनाच्या मदतीला पाठवले. नाइलाजाने, युधिष्ठिराच्या संरक्षणाचा भार धृष्टद्युम्नावर सोपवून भीम निघाला. त्यालाही द्रोणाशी जोरदार सामना करावा लागला. द्रोणाची पर्वा न करता, अनेक वीरांचा व सैन्याचा संहार करीत तोही अर्जुनापर्यंत पोचला व त्याला खुशाल पाहून भीमाने मोठमोठ्याने गर्जना केल्या. त्या ऐकून अर्जुन व कृष्ण यांनीही केल्या. त्या ऐकून युधिष्ठिराची खात्री पटली की अर्जुन, सात्यकी व भीम एकत्र व सुखरूप आहेत. 'सात्यकी व भीम सैन्यात घुसले कसे व आता जयद्रथाचे काय होणार' अशी तक्रार घेऊन दुर्योधन पुन्हा द्रोणापाशी गेला. तेव्हा, 'सात्यकी व भीम आता येथे नाहीत तेव्हा मी आता युधिष्ठिराला पकडण्याचा निकराचा प्रयत्न करतो, तुम्ही सर्वांनी अर्जुनाचा प्रतिकार करा' असे सांगून द्रोणाने त्याला परत पाठवले. आता पुन्हा सैन्यात शिरलेल्या युधामन्यु व उत्तमौजा यांची दुर्योधनाशी गाठ पडली. दुर्योधनाने त्याना हारवले पण त्यानीही दुर्योधनाला रथहीन केले. भीम व कर्ण यांच्या वारंवार चकमकी झाल्या. भीमाने दरवेळी कर्णाला मार देऊन पळवून लावले. सतरा वेळा त्याचे धनुष्य

तोडले. त्याच्या व दुर्योधनाच्या देखतच, त्याच्यावर चालून येणाऱ्या अनेक कौरवांचा वध केला. अनेक चकमकींनंतर अखेर कर्णाने भीमाचा पराभव केला व त्याला दुरुत्तरे केली. अखेरपर्यंत भीमाने हार मानली नाहीच वा पळूनही गेला नाही. त्याने कर्णाला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले. कर्णाचेही धनुष्य तुटले होतेच. अर्जुन भीमाच्या मदतीला आल्यावर अखेर कर्ण व भीम इतरांच्या रथांवर बसून दूर झाले. अर्जुनाने यावेळी कर्णावर सोडलेला घातक बाण मात्र अश्वत्थाम्याने दुरूनच तोडून टाकला व आपण पळून गेला! कर्ण वांचला. इकडे सात्यकी व भूरिश्रवा यांचे तुंबळ युद्ध होऊन भूरिश्रवा सात्यकीचे केस पकडून त्याचे डोके उडवण्याच्या प्रयत्नात आहे असे कृष्णाने अर्जुनाच्या नजरेला आणले तेव्हा अर्जुनाने दुरूनच बाण सोडून भूरिश्रव्याचा हातच तोडला! नंतर सात्यकीने भूरिश्रव्याला मारले. जयद्रथाच्या रक्षणासाठी नेमलेल्या सहा वीरांपैकी भूरिश्रवा मेला व भीमाने कर्णाला वारंवार हरवून जखमी व नामोहरम केले त्यामुळे अर्जुनाला फार मदत झाली. कर्णाने दुर्योधनाशी कबुली दिली कीं 'भीमाकडून मी आज एवढा मार खाल्ला आहे की युद्धात उभे राहिलेच पाहिजे म्हणून मी नाइलाजाने उभा आहें'

सर्व संरक्षकाना वारंवार हरवून व सैन्यसंहार करून अखेर अर्जुनाने जयद्रथाला गाठलेच. त्याने जयद्रथाचा सारथी मारला व ध्वज तोडला. तोंवर पुन्हा संरक्षकानी त्याला मध्ये घेऊन अर्जुनाला अडवले. अर्जुनाने कृप, कर्ण, शल्य, दुर्योधन या सर्वांवर बाणवृष्टि करून व जखमी करून पुन्हा जयद्रथाला गाठले. अखेर सर्व संरक्षकाना दाद न देतां त्याने जयद्रथाला ठार केले. हा वेळ पर्यंत संध्याकाळ झाली होती व सूर्य आहे कीं अस्ताला गेला हे कळत नव्हते. मात्र कृष्णाने अर्जुनाला बजावून सांगितले होते की 'तूं सूर्याकडे न पाहातां जयद्रथ तावडीत सापडला कीं त्याला मार. ' त्याप्रमाणे अर्जुनाने जयद्रथवध केल्यावर नंतर पुन्हा सूर्य स्पष्ट दिसूं लागला. त्यामुळे अर्जुनाने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली याबद्दल शंकेला जागाच उरली नाही. त्यानंतरही प्रत्यक्ष सूर्यास्त होईपर्यंत अर्जुन विरुद्ध कृप/अश्वत्थामा व सात्यकी विरुद्ध कर्ण अशी युद्धे काही काळ चालूच राहिलीं. सूर्य काही काळ स्पष्ट न दिसणे व नंतर पुन्हा दिसू लागणे या नैसर्गिक घटना आहेत व त्याचे कर्तृत्व कृष्णाला देण्याचे काहीच कारण नाही. कृष्णाने योगमायेने सूर्य काही काळ अदृश्य

केला अशी समजूत आहे त्याला काहीही आधार नाही. महाभारतात तसे म्हटले आहे हे खरे पण तो मजकूर, कृष्णाला देवाचा अवतार मानू लागल्यानंतर, त्याचे महत्व वाढविण्यासाठी, मागाहून घुसडलेला स्प्ष्ट दिसून येतो. ते विशिष्ट श्लोक गाळले तर कोठेही तुटकपणा जाणवत नाही. सूर्य दिसत नव्हता असे अर्जुनाने वा कौरवपक्षाच्या कोणीही म्हटलेले नाही. खुद्द जयद्रथही अखेरपर्यंत शर्थीने लढतच होता पण त्याचा अर्जुनापुढे टिकाव लागला नाही. 'हा सूर्य व हा जयद्रथ' असे कृष्णाने म्हटले व मग अर्जुनाने समोर असलेल्या बेसावध जयद्रथाला मारले हे मुळीच खरे नाही. ती हरदासी कथाच! सूर्यास्ताला अजून काही काळ बाकी आहे याचा हिशेब कृष्णाने मनाशी बरोबर ठेवला होता व अर्जुनाचे चित्त त्याने विचलित होऊं दिले नाही हे खरे. 'सूर्य अस्ताला जाण्याची वेळ आली आहे तेव्हा आता वेळ न घालवता जयद्रथाला मार' असे त्याने अखेरच्या क्षणी अर्जुनाला म्हटले व अर्जुनाने लगेच जयद्रथवध केला.

सूर्यास्त झाला व अर्जुनाची प्रतिज्ञा फोल झाली अशा समजुतीने कौरवांकडून जयद्रथाच्या रक्षणाच्या प्रयत्नात शिथिलता आली असे बिलकुल झाले नाही वा तसा दावा वा कांगावाही कौरवांकडील कोणी केला नाही. अखेरपर्यंत अर्जुनाला जोराचा प्रतिकार होतच होता व तो मोडूनच त्याला यश मिळाले. दिवसभर शर्थीचे प्रयत्न करूनही सगळे संरक्षक अर्जुनापुढे टिकले नाहीत हेंच खरे. अर्जुनाचा स्वबळावरचा विश्वास सार्थ ठरला व कृष्णावर स्वत:ची प्रतिज्ञा मोडून युद्धात उतरण्याची वेळ आली नाही. अर्जुनाने दिवसभर केलेल्या शर्थीच्या प्रयत्नाचे यश कृष्णाच्या पदरात घालण्याचे काहीच कारण नाही. त्याने दिवसभर उत्तम सारथ्य करून अर्जुनाला जयद्रथापर्यंत नेले हे त्याचे कार्य थोडे नव्हे! कृष्णाची खरी थोरवी, त्याने डोळसपणे जो, वेळ आली तर, युद्धात स्वत: उतरण्याचा निर्णय घेतला होता व सारथी दारुकाला दिवसभर आपल्या मागे रहावयास सांगितले होते, त्यात आहे. रथ तयारच होता व अखेरच्या पर्वात त्याचा उपयोग रथहीन झालेल्या सात्यकीला झाला. जयद्रथवधामुळे दुर्योधन फार नाउमेद झाला. या एका दिवसात, अर्जुन, सात्यकी व भीम यानी सात अक्षौहिणी सैन्य मारले. (अ. १५०, श्लोक १४-१६) यातील अतिशयोक्ति सोडली तरी कौरवांचे सैन्यबळ हटले हे खरे. दुर्योधनाची खात्री पटली कीं आपल्या पक्षातील

कोणीही वीर अर्जुनाच्या तोडीचा नाही. दिवसभरात भीमाने व सात्यकीनेही, वारंवार कर्णाला हारविले त्यामुळे दुर्योधनाचा त्याच्यावरील विश्वासही डळमळू लागला. यापुढील युद्धात द्रोण व कर्ण यानीही पांडवसैन्य मोठ्या प्रमाणावर मारले पण सुरवातील ११ विरुद्ध ७ असे असलेले विषम प्रमाण या दिवशी जे उलट झाले व ते पुढे कायमच कौरवाना प्रतिकूल राहिले.

युधिष्ठिराने जिवाची पर्वा न करतां सात्यकी व भीम यांना अर्जुनाच्या मदतीला पाठवले तेही निर्णायक क्षण होते. द्रोणानेही कबुली दिली कीं दिवसभर अर्जुन आणि बराच काळ सात्यकी व भीम नसूनही त्याला धृष्टद्युम्न व इतर पांचालांचा निर्णायक पराभव करता आला नाही व युधिष्ठिराला पकडता आले नाही. 'आता आपली धृष्टद्युम्नापासून सुटका नाही' असे द्रोणाने म्हटले. (अ. १५१ श्लोक २४-२६). जयद्रथाला वाचवणे व युधिष्ठिराला पकडणे हे या दिवसाचे दोनही युद्धहेतु विफल झाले. अशा प्रकारे कौरवांनी केलेला अभिमन्यूचा वध त्याना फार महागात पडला. एक दिवस अर्जुनाला अडवून धरले व जयद्रथाला वाचवले तर विजय आपलाच आहे अशी त्याना वाटलेली आशा फोल ठरली व येथून पुढे हे युद्ध पूर्णपणे त्यांचेविरुद्ध गेले. एक काल्पनिक प्रश्न असा की दुर्दैवाने सूर्य अस्ताला जाईपर्यंत जयद्रथवध झाला नसता तर काय झाले असते? माझ्या मते, कृष्णाने अर्जुनाला ताबडतोब अग्निकाष्ठे भक्षण करू दिली नसतीं. 'तुझे युद्ध तू पूर्ण कर, सर्व कौरवांचा संहार तूं व भीम पुरा करा व मग पाहूं' असा निर्वाणीचा सल्ला दिला असता व अर्जुनाने ऐकलेच नसते तर मात्र त्याची जागा स्वत: नक्कीच घेतली असती पण कौरवांना विजयी होऊ दिले नसते! त्याच्या प्रतिमेशी हे सुसंगत आहे.

भीष्म कथा

महाभारतात आरंभापासून अखेरपर्यंत वावरलेले एक प्रमुख पात्र म्हणजे भीष्म. आपल्या मनात भीष्माबद्दल फार आदरभाव असतो. तो अयोग्य वा अकारण आहे असे मुळीच म्हणतां येणार नाही. मात्र सर्व कथेमध्ये ज्या ज्या प्रसंगांत त्याची उपस्थिति आहे त्या अनेक प्रसंगांतील त्याचे वर्तन काही वेळा अनाकलनीय वाटते, त्याची संगति लागत नाही. अर्थात कल्पनारम्य वर्णने वा अद्भुतरस बाजूला ठेवून या विविध प्रसंगांकडे मानवी पातळीवरून पाहिले म्हणजे काही प्रश्नचिन्हे उभी रहातात. या दृष्टिकोनातून भीष्मकथेचा विस्ताराने आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

भीष्माची जन्मकथा महाभारतात खूप विस्ताराने सांगितलेली आहे. ती शब्दश: घेतली तर काही प्रश्न नाही पण अद्भुतरस बाजूला ठेवला व तर्क वापरावयाचे म्हटले म्हणजे काही प्रश्न पडतातच. भीष्माचा पिता शांतनु, प्रतीप या त्याच्या पित्यानंतर राजा झाला. त्याचा जन्म त्याचा पिता प्रतीप खूप वृद्ध झाल्यावर झाला होता. प्रतीपाला देवापि व बाल्हीक असे दुसरे दोन पुत्र होते असेही म्हटलेले आहे. देवापि राज्याचा लोभ सोडून तपश्चर्येला गेला होता. बाल्हीक व शांतनु दोघेही राजे झाले असेही एके ठिकाणी म्हटले आहे. मात्र बाल्हीक हस्तिनापुराचा राजा झाला नाही. त्याचे राज्य कोठे होते हे स्पष्ट नाहीं. बाल्हीक या नावाचा महाभारतात अनेक ठिकाणी, अनेक प्रसंगी उल्लेख आहे. कुरूंच्या दरबारात त्याचे अस्तित्व वेळोवेळी जाणवते ते थेट भारतीय युद्धापर्यंत. खुद्द भीष्मच युद्धापर्यंत खूप वृद्ध झाला होता मग त्याचा काका युद्धात होता? बहुधा त्याच्या वंशातील सर्वच पुरुषांचा 'बाल्हीक' असाच उल्लेख होत असावा. (बाल्हीक म्हणजे अफगाणिस्तानातील 'बल्ख' शहर असे एक मत वाचलेले आहे. ) शांतनूने राजा झाल्यावर छत्तीस वर्षे स्त्रीसुखाचा अनुभव घेतला पण त्याला तेव्हां अपत्य झाल्याचा उल्लेख नाही. त्याची पत्नी मृत झाली असे मात्र म्हटलेले नाही. त्यानंतर गंगा ही नदी मानव शांतनूची पत्नी झाली. ती 'नदी' हे शब्दश: घेतले नाही तर ती गंगाकिनारच्या

एखाद्या कुळातील मानव स्त्री मानावी लागते. गंगेने स्वत:चे व शांतनूचे सात पुत्र जन्मत:च मारून टाकले. कां? तिचे कुळ मातृसत्ताक असल्याने अपत्य पुरुष असेल तर नष्ट करणे हा



तिच्या कुळाचा रिवाज होता कीं काय? श्री. विश्वास दांडेकर यांनी 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' मध्ये असाच तर्क केला आहे व मला तो सयुक्तिक वाटतो. तिने शांतनूला वरताना अटच घातली होती कीं 'मी करीन त्या कोणत्याही कृत्याला विरोध करावयाचा नाही, तसे केल्यास मी तुला सोडून जाईन' त्यामागे हेच कारण असावे. गंगेला, राजा महाभिषाला (शांतनु हा त्याचा अवतार) व अष्टवसूंना स्वर्गांत मिळालेल्या शापांची कथा हे एक रूपकच आहे. ही कथा या अपत्यनाशांचे (लंगडे) समर्थन करण्यासाठी उघडच रचलेली दिसते. पूर्वीचे अपत्य नसूनही सात पुत्रांचा मृत्यु शांतनूने सहन केला हे नवलच. आठव्या पुत्राच्या जन्माच्या वेळी मात्र, गंगा आपल्याला सोडून जाईल याची पर्वा न करतां, शांतनूने तिला 'एक पुत्र तरी राहूंदे' असे विनवले म्हणून गंगेने त्याला न मारतां आपल्याबरोबर नेले पण ती शांतनूला सोडून गेलीच. कुमार वयाचा झाल्यावर तिने हा पुत्र देवव्रत पुन्हा शांतनूच्या स्वाधीन केला. त्याने वेदाभ्यास केला आहे व तो ज्ञानी आणि शूर आहे असे गंगा म्हणाली. मात्र परशुरामापाशी त्याने धनुर्विद्या शिकल्याचा येथे उल्लेख नाही. पण तो परशुरामशिष्य म्हणून मानला जातो. मग तो केव्हां परशुरामापाशी शिकला याचा उलगडा होत नाहीं. शांतनूकडे आल्यावर शिकला असावा. गंगेच्या मातृसत्ताक कुटुंबियांत तो वाढला याचा त्याच्या मनोवृत्तीवर काही परिणाम झाला काय? त्याने आमरण ब्रह्मचर्य पत्करले त्या मागे त्याच्या बालवयातील काही संस्कार कारण होते काय? प्रत्यक्ष मातेने केलेले पुत्रघात त्याला कळले असणारच शिवाय आईच्या जनसमुदायांत असे

इतरही प्रसंग घडले असतील ते पाहून आपल्याला गृहस्थाश्रम नकोच अशी त्याची मनोभूमिका झाली होती कीं काय अशी शंका येते.

देवव्रत (भीष्माचे खरे नाव)तरुण झाला, पित्याने त्याला यौवराज्याभिषेकही केला अन मग, चार वर्षे गेल्यावर, उतारवयाच्या पित्याची सत्यवतीशीं विवाह करण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी, त्याने सर्वस्वाचाच त्याग केला. आपण विवाह व संसाराच्या बंधनात अडकून पडावयाचे नाही असे त्याचे आधीच ठरले असावे अशी मला शंका येते कारण त्याच्या विवाहाचा विचारही शांतनूने अद्याप केला नव्हता. त्याच्या या विचारांची शांतनूला बहुधा कल्पना आली असावी आणि त्यामुळे याचेकडून आपला वंश चालू राहण्याची त्याला उमेद राहिली नसावी. सत्यवतीशीं उतार वय असूनही विवाह करावा असें आपल्याला कां वाटते याचे त्याने पुत्राशी केलेले स्पष्टीकरण वाचले म्हणजे ही शंका बळावते. सर्वच क्षत्रिय राजांना शिकारीचा नाद असताना 'तुला शिकारीचा फार नाद आहे आणि तूं नेहमीं शस्त्र घेऊन फिरत असतोस त्यामुळे तुझ्या जीवनाची शाश्वति नाही' असे तो देवव्रताला म्हणतो हे नवलाचे नव्हे काय? आपल्याकडून वंश टिकण्याची पित्याला उमेद नाही तेव्हां त्याला पुन्हा विवाह करून वंशवृद्धि करावयाची आहे तर ते होऊ द्यावे, आपण त्याआड येऊ नये उलट सत्यवतीला व तिच्या पित्याला हवे असलेले आश्वासन द्यावे असे देवव्रताला वाटले काय? महाभारतात वर्णन केलेल्या घटनांचे असेही एक स्पष्टीकरण असूं शकतें! मला तें जास्त नैसर्गिक वाटते.


सत्यवती ही उपरिचर या क्षत्रिय राजाची धीवर स्त्रीपासून झालेली कन्या होती. (महाभारतातील वर्णन, उपरिचराच्या वीर्यापासून एका मत्स्यीला झालेली कन्या, असें आहे तें अर्थातच रूपकात्मक आहे. ) मात्र राजकुळात न वाढता ती धीवर कुळात वाढली होती. ऋषि पराशराने तिची अभिलाषा धरून तिच्या पदरांत एक पुत्र टाकून मग तिला सोडून तपश्चर्येचा मार्ग धरला होता. पुत्र व्यास याला सत्यवतीने धीवरकुळांतच वाढवले. व्यास 'मोठा झाल्यावर' मातेची अनुज्ञा घेऊन आपल्या मार्गाने गेला असा उल्लेख आहे. शांतनू सत्यवतीच्या प्रेमात पडला तोवर तीही लहान राहिलेली नव्हती असे त्यामुळे म्हणावे लागते. तिचा विवाह कोणातरी थोर क्षत्रियाशींच व्हावा असा तिच्या धीवर पालक



पित्याचा हेतु होता. म्हणून त्याने एका थोर ऋषीला नकारही दिला होता. राजा उपरिचर व सत्यवतीचा धीवर पालक यांची भेट होत असे असें महाभारत म्हणतें व शांतनूशीं सत्यवतीचा विवाह व्हावा अशी उपरिचराचीही इच्छा होती. प्रश्न फक्त तिच्या पुत्राला राज्य कसें मिळणार हा होता! तो देवव्रताने पूर्णपणे सोडवला व भीष्म ही पदवी वा नाम मिळवले. धीवराला हवे असलेले, राज्यावर हक्क न सांगण्याचे आणि स्वत: ब्रह्मचर्यही पाळण्याचे आश्वासनही भीष्माने दिले व अखेरपर्यंत पाळले. जन्मभर कुरुकुळातच राहण्याचे व कुळाचे हित जपण्याचे वचन काही सत्यवतीच्या पित्याने मागितलेले नव्हते व भीष्माने दिलेले नव्हते. मात्र तो हस्तिनापुर सोडून कोठेच गेला नाही. स्वत: संसारात न पडूनही, सर्व सांसारिक सुखे व अनेक दु:खेही, त्याला भोगावी लागलीच!

शांतनूला व सत्यवतीला चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. त्यानंतर थोड्या काळानेच शांतनूचा मृत्यु झाला. ठरल्याप्रमाणे चित्रांगद राजा झाला. हा शूर होता. भीष्माला त्याने सत्तेपासून दूर ठेवले असावे. त्याचा विवाह झाल्याचा उल्लेख नाही. त्यामुळे पत्नी वा अपत्याचे नाव नाहीच. त्याचे व चित्रांगद याच नावाच्या गंधर्वाचे कुरुक्षेत्रात युद्ध झाले. तीन वर्षे एवढा दीर्घ काळ चाललेल्या या युद्धात भीष्माने कोणताही भाग घेतला नाही. असें कां झालें असावें? एक तर चित्रांगदाने भीष्माला खड्यासारखे दूर ठेवले असावे किंवा भीष्म कुरुकुळांत राहत असूनही पूर्ण अलिप्त झाला असावा. महाभारत याबाबत काहीच सांगत नाहीं. युद्धात चित्रांगद मारला गेला एवढेच म्हणतें. त्याला मदत न केल्याबद्दल सत्यवतीनेही भीष्माला दोष दिलेला नाही! हे प्रकरण जरासे धूसरच आहे! चित्रांगदानंतर विचित्रवीर्य राजा झाला. (असे 'विचित्र' नाव त्याला कां दिले असावे?). त्या

वेळेला तो वयाने लहान असावा. तो मात्र भीष्माच्या कलाने वागत होता असे दिसते. काही काळानंतर त्याला भार्या मिळवून देण्यासाठी भीष्म काशिराजाच्या तीन मुलींच्या स्वयंवराला गेला. मात्र एकटाच! विचित्रवीर्याला बरोबर नेलेच नाही! ब्रह्मचर्याचा गाजावाजा झालेल्या भीष्माला स्वयंवरमंडपात एकटाच पाहून साहजिकच त्याची बरीच टिंगल झाली. तिन्ही मुलींना पळवून आणावयाचे असाच भीष्माचा बेत होता म्हणूनच बहुधा विचित्रवीर्याचे लोढणे त्याने बरोबर बाळगले नसावे. विचित्रवीर्यामध्ये काहीतरी जन्मदोष असावा व त्यामुळे त्याला सुखासुखी योग्य भार्या मिळण्यात अडचण पडेल असे दिसल्यामुळेच असा आडमार्ग भीष्माला पत्करावा लागला असावा. ठरवलेल्या बेताप्रमाणे भीष्माने केले. सर्व चिडलेल्या राजांशी यशस्वी सामना केला. एकट्या शाल्वाने अंबेला सोडवण्यासाठी निकराचे युद्ध केले पण त्याचाही निभाव लागला नाही. मात्र भीष्माने त्याला न मारतां जिवंत सोडले. या प्रसंगात भीष्माने शौर्य प्रगट केले. शाल्व हेही एक कुळ



असावे व त्यातील पुरुषांना शाल्व म्हणत असावे कारण पुढे खूप दीर्घ काळानंतर, कृष्ण व शाल्व यांचे वैर व युद्ध झाले. तेव्हा तो शाल्व हा या कथेतील शाल्वाचा वंशज असला पाहिजे. अंबेच्या इच्छेप्रमाणे भीष्माने तिला शाल्वाकडे पाठवले पण त्याने तिला स्वीकारले नाही. ती भीष्माकडे परत आली व ‘तुम्ही माझा हात धरलात म्हणून शाल्व मला स्वीकारीत नाही तेव्हा आता तुम्हीच माझा स्वीकार करा’ असे विनवले पण भीष्मानेही प्रतिज्ञेमुळे तिला स्वीकारले नाहीच. तिची परवड झाली. अंबेने परशुरामाकडे तक्रार नेली आणि तिच्या वतीने खुद्द परशुरामाने आव्हान दिल्यामुळे त्याच्याशी झालेल्या युद्धात परशुरामालाही भीष्माने दाद दिली नाही. परशुरामाने अंबेला सांगितले कीं ’तुझ्यासाठी मी आणखी काही करूं शकत नाहीं, तुझे तूं पहा!’ या युद्धानंतर भारतीय युद्धापर्यंत एकाही प्रसंगात भीष्माचे शौर्य विशेषत्वाने प्रगट झालेले नाही! कौरव राज्याच्या वतीने त्याने अश्वमेध वगैरे केला नाही वा कोणा राजाचे पारिपत्य करून राज्य विस्तारही केलेला नाही.

विचित्रवीर्याने दोन्ही भार्यांसह संसारसुख काही वर्षे उपभोगले. मात्र त्याला

अपत्य झाले नाही. त्याच्यात काय दोष होता ते महाभारतात सांगितलेले नाही. विचित्रवीर्य या नावावरून तर्क करावा. ऐन तारुण्यातच तो मरून गेला. शांतनूने ज्या हेतूने सत्यवतीशी विवाह केला तो वंशवृद्धीचा हेतु निष्फळ ठरला. वंश टिकवण्यासाठी सत्यवतीने भीष्माला त्याच्या प्रतिज्ञेतून मुक्त करून 'तूं विवाह कर' असे सुचवले ते त्याने अर्थातच नाकारले. 'वडील दीर या नात्याने अंबालिका, अंबिका यांना तूं अपत्य मिळवून दे' असे विनवले तेही नाकारले. मात्र वंश टिकवण्यासाठी पूर्वी, परशुरामाने क्षत्रिय घराणीं नामशेष केलीं होतीं तेव्हां, अनेक क्षत्रिय स्त्रियांनी श्रेष्ठ ब्राह्मणांपासून नियोगाने अपत्यप्राप्ति करून घेऊन वंशविस्तार केला, याचा दाखला देऊन, अंबालिका व अंबिका यांनीही तसेंच करावे असें सुचवलें. तेव्हां सत्यवतीने आपल्याला ऋषि पराशरापासून झालेल्या व्यास या पुत्राचे नाव नियोगासाठी सुचवले ते भीष्मानेही मान्य केले. यावेळीं कुरुकुळांतीलच दुसऱ्या कोणा पुरुषाचा विचार दोघांनीही कां केला नाही हे एक कोडेच आहे. ज्या बाल्हीकाचे नाव वरचेवर येते, त्याच्या वंशातला कोणी योग्य पुरुष कसा सुचला नाहीं? (बाल्हीक सोमदत्त व त्याचा पुत्र भूरिश्रवा याचे नाव पुढे कथेत अनेकदां येते. भूरिश्रवा साधारण कौरव-पांडवांचा समवयस्कच दिसतो तेव्हां सोमदत्त वा त्याचा पिता हा नियोगासाठी कदाचित योग्य वयाचा ठरला असता!)

सासूची सूचना दोन्ही सुनांनी अनिच्छेनेच मान्य केली असणार कारण व्यासाचे ओंगळ ऋषिरूप. खुद्द व्यासालाही त्याची जाणीव होतीच. व्यासाला शुक नावाचा एक पुत्र होता तेव्हां सत्यवतीने विनवले तरीही या भानगडीत आपण पडूं नये असें व्यासाला कां वाटलें नाहीं? अंबालिका व अंबिका दोघीनाही जन्मदोष असलेले पुत्र झाले. त्याचें दिलेले कारण (अंबालिकेने डोळे मिटून घेणे व अंबिकेने भीतीने पांढरीफटक पडणे) निव्वळ हास्यास्पद आहे. इच्छेविरुद्ध (उदा. बलात्काराने) मातृत्व लादले गेले तरीदेखील स्त्रीला अनेकदां सुदृढ अपत्य होतें! येथे तर मातृत्व हवेच होते! जणू व्यासावर पुत्रांच्या व्यंगांचा दोष नको म्हणून तो त्या दोघींवर ढकललेला वाटतो! मात्र धृतराष्ट्र आंधळा निपजल्यावर तरी व्यासाचा नाद सोडून देऊन दुसरा कोणी शोधावा असें सत्यवतीला वाटले नाही वा भीष्मालाही सुचले नाही. यांतही भीष्माचा अति अलिप्तपणाच जाणवतो. तिसरा प्रयोग

अंबालिका-अंबिका यांनी युक्तीने टाळला. आपल्या जागीं दासीलाच पाठवले! व्यासांना कळले होतेच कीं यावेळी आपल्यासमोर दासी आली आहे पण व्यासानी सत्यवती वा भीष्माकडे तक्रार केली नाही पण माघारही घेतली नाही! दासीचे पोटीं विदुर जन्माला आला.

पदरीं पडलें तें पवित्र मानून, इच्छा असो वा नसो, हे दोन्ही पुत्र मोठे होईपर्यंत भीष्माला राज्य संभाळावे लागले! धृतराष्ट्र आंधळा त्यामुळे राजा होण्यास लायक नव्हताच त्यामुळे पांडु पुरेसा मोठा झाल्यावर त्याला राज्यावर बसवून भीष्म मोकळा झाला. पांडूमध्ये कोणता जन्मदोष होता हे स्पष्ट नाही. तर्क करावयाचा तर बहुधा त्याच्या हृदयाला छिद्र वगैरे असावे त्यामुळे जन्माचे वेळी तो पांढराफटक असावा. बाल व तरुण वयात तो दोष काहीसा झाकला गेला असावा म्हणून त्याचा युद्धकलेचा अभ्यास झाला व तो वीरपुरुष बनला. पुढे वय वाढल्यावर तो दोष पुन्हा पुढे आला असावा व कोणताही ताण, राज्यकारभाराचा वा संसारसुखाचा, झेपणे त्याला शक्य राहिले नाही. त्यामुळे त्याला राज्यनिवृत्ति स्वीकारून वनवास व पुत्रासाठी कुरुकुळात पुन्हा एकदां नियोग स्वीकारावा लागला. पांडु वनात भार्यांसह गेला त्याला भीष्माने रोखले नाही. राजधानीतच राहून नियोगाने अपत्यप्राप्ति करून घे असेही सत्यवतीने वा भीष्माने त्याला म्हटले नाहीं. आधीच्या पिढीचा अनुभव लक्षात घेऊन 'तूं हिमालयाकडे जाऊन कुरुसमुदायांतील तिकडील एखाद्या योग्य पुरुषामार्फत नियोगमार्ग पत्कर' असें भीष्मानेच कदाचित त्याला सुचवले असा माझा तर्क आहे. (पांडवांचा जन्म देवांपासून हे एक रूपकच म्हटले पाहिजे. तें शब्दश: घेणे योग्य नाहीं )

पांडु राज्य सोडून वनांत गेल्यामुळे नाइलाजाने धृतराष्ट्राला राज्यावर बसवून कारभार भीष्म व विदुर यांना पहावा लागला. विवाह पांडूबरोबरच होऊनही, अद्याप धृतराष्ट्रालाही अपत्यें झालीं नव्हतींच. कुंतीला वनात युधिष्ठिर पुत्र झाल्याचें गांधारीला कळले तेव्हां तीही गरोदर होती असें महाभारत म्हणतें पण हे बरोबर वाटत नाहीं. तिचा ज्येष्ठ पुत्र दुर्योधन युधिष्ठिरापेक्षा लहान, भीमाच्याच वयाचा होता! कुंतीपुत्र आधीं जन्मल्यामुळे आपल्या पुत्राला पुढे राज्य मिळण्याची खात्री गांधारीला व धृतराष्ट्राला

राहिली नाहीं. कौरव-पांडव वैराची ही सुरवातच होती! कालांतराने पांडू व माद्री यांचा वनात मृत्यु झाला व कुंती पांच पुत्रांसह हस्तिनापुरास परत आली. कौरव पांडव दोघेंही लहान असल्यामुळे राज्याची व्यवस्था कायम राहिली. मात्र दुर्योधनाला युधिष्ठिर हा आपला प्रतिस्पर्धी आहे हें लहानपणापासूनच स्पष्ट दिसूं लागलें.

कौरव-पांडवांच्या शिक्षणाची व्यवस्था भीष्माने नीट लावली. आधी कृप व मग द्रोण यांचेपाशी ते युद्धकला उत्तम शिकले. सर्व राजपुत्र मोठे झाल्यावर अस्त्रदर्शनाचा प्रसंग घडला. त्यावेळी अचानक उपस्थित होऊन कर्णाने अर्जुनाची बरोबरी करून मग त्यांच्या द्वंद्वापर्यंत पाळी आली. ते थांबवण्याचे श्रेय कृप व भीमाला दिले पाहिजे. यावेळीही, भीष्माने कुरुप्रमुख या नात्याने वेळीच हस्तक्षेप केला नाही. दुर्योधनाने आततायीपणे कर्णाला अंगराज्य देऊन टाकले व राज्याभिषेकही केला. त्याला भीष्माने थांबवले नाही. कुलप्रमुख या नात्याने त्याच्या संमतीशिवाय हे कसे होऊ शकले? दुर्योधनाचा अधिकार, येथून पुढे, जणूं भीष्माने मान्यच केला! मात्र पुढे नवीनच पेंच उभा राहिला. राज्यावर धृतराष्ट्र पण यौवराज्य युधिष्ठिराला दिले गेले. हा अर्थातच भीष्माचा निर्णय होता. यातून तिढाच निर्माण झाला. कौरव-पांडवांतील वाढता वैरभाव व दुर्योधनाला मिळालेली कर्णाची साथ हे दिसत असूनही भीष्माने वेळीच राज्य वाटून देण्याचा उपाय योजला नाही. दुर्योधन सुखासुखी युधिष्ठिराला राज्य मिळू देणार नाही हे उघड होते व धृतराष्ट्र दुर्योधनाच्या आहारी जातो आहे हेही दिसत होते तरीही भीष्माने काही केले नाही. या वेळीं भीष्माचा सल्ला वा निर्णय धृतराष्ट्र वा दुर्योधन झिडकारूं शकले नसते. पण भीष्माने तसे केले नाही. अलिप्तपणा एवढेच कारण?

पांडवाना वारणावतास पाठवण्याच्या दुर्योधनाच्या बेतामागील कारस्थान भीष्माला उमगले नाहीं. विदुराला उमगले व आपल्यापरीने त्याने पांडवांना वांचवण्यासाठी साह्य केलें (वाड्यातून पळून जाण्यासाठी भुयार खणण्यासाठी आपला विश्वासू माणूस युधिष्ठिराकडे पाठवला), मात्र नवल म्हणजे, त्याने आपला संशय भीष्माच्या कानावर मुळीच घातला नाहीं वा वारणावतास पांडवांना पाठवूं नये असें त्याने भीष्माला मुळीच

विनवले नाहीं! असें कां झालें? भीष्म कांहीही करणार नाहीं असें विदुराला वाटलें काय? महाभारत याबद्दल गप्प आहे! शेवटी वारणावतास जे व्हायचे ते झाले. वाड्याला लागलेल्या आगीतून पांडव व कुंती कसेबसे वांचले व परागंदा झाले. तीं वांचल्याची कुणकूण विदुराला लागलीच असणार पण त्याने तेही भीष्माला कळूं दिले नाही. कौरवांनी पांडव व कुंती यांचे और्ध्वदैहिकही केले असे महाभारत म्हणते. सत्य परिस्थितीबाबत भीष्म पूर्ण अंधारात राहिला.

द्रौपदीच्या स्वयंवराच्या मंडपांत वारणावतांतून वांचून परागंदा झालेले पांच पांडव ब्राह्मणवेषांत प्रगट झाले होते. अनेक वर्षांचा सहवास असूनही, कौरवांपैकीं कोणीही, भीष्मानेदेखील, त्यांना अजिबात ओळखले नाहीं. अर्जुनाने दुष्कर पण जिंकला तरीही 'हा अर्जुन तर नव्हे' अशी शंका कोणालाही आली नाहीं. नंतर 'पण अखेर एका ब्राह्मणाने जिंकला' म्हणून रागावलेल्या क्षत्रिय राजांबरोबर अर्जुन व भीम यांचे जोरदार युद्ध झाले त्यांत भीमाचे अफाट बळही प्रगट झाले तरीही युद्ध संपल्यावर इतरांप्रमाणे कौरव तसेंच भीष्मही पांडवांना अखेरपर्यंत न ओळखतां हस्तिनापुरास निघून गेले. पांडवद्रौपदी विवाहालाही कौरवांकडून कोणी आलें नाहीं. काही काळ गेल्यावर पांडव-द्रौपदी–कुंती हस्तिनापुराला परत आल्यावर मग अखेर भीष्माने राज्याचा वांटा पांडवांना द्यावा असा सल्ला दिला. यावेळीं त्याने म्हटलें कीं 'वारणावत प्रकरणीं लोक मलाच दोष देतात'! खरे तर युधिष्ठिराला पूर्वीच यौवराज्याभिषेक केलेला होता तर मग आतां तो जिवंत परत आल्यावर धृतराष्ट्राचे जागीं त्यालाच हस्तिनापुरचे राज्य मिळावयास हवे होते. भीष्माने तसे केले नाहीच. राज्याचा वाटाही खरे तर दिला नाही. 'खांडवप्रस्थास जाऊन तुम्ही राज्य करा' असे पांडवांना म्हटले. तेथे खांडववन जाळून, नवीन प्रदेश वस्तीखाली आणून, नवीन इंद्रप्रस्थ राजधानी बनवून, नवेच राज्य पांडवांना मिळवावे लागले. या सर्व घटनांमध्ये भीष्माची न्यायबुद्धि दिसत नाही. आपला निर्णय धृतराष्ट्रावर वा दुर्योधनावर लादण्याची त्याची इच्छा वा तयारी नव्हती असे म्हणावे लागते. येथून पुढे त्याने दुर्योधनाच्या कुटिल बेताना कधीच प्रखर प्रतिकार केलेला नाही. दुर्योधनाचा सर्वाधिकार त्याने जणू मान्यच केलेला दिसतो.

पांडवानी इंद्रप्रस्थ राजधानी वसवली. राजसूय यज्ञाचा बेत केला. त्यासाठी जरासंधाला मारले. दिग्विजय केला. यज्ञाच्या वेळी सर्व कौरव उपस्थित होते. यज्ञानंतर अग्रपूजेचा मान कृष्णाला देण्याचा सल्ला भीष्माचा. तो पांडवांना मानवला. शिशुपालाने कडाडून विरोध केला. भीष्मालाही दुरुत्तरे केलीं. भीष्माने त्याला अतिशय तुच्छतेने झिडकारले. अखेर कृष्णाने त्याला मारले. भीष्माला हा अतिरेक टाळतां आला असता काय? या अतिप्रसंगाच्या छायेखाली यज्ञ पुरा झाला.

पांडवांच्या दराऱ्याचा व वैभवाचा हेवा वाटून शकुनीच्या सल्ल्यावरून दुर्योधनाने द्यूताचा बेत ठरवला व धृतराष्ट्राच्या गळीं उतरवला. भीष्माला विचारले नाही पण कळले असणारच. द्यूत होऊं नये यासाठी त्याने कांहींही केलेले नाहीं. त्याने स्पष्टपणे धृतराष्ट्राला निक्षून सांगितले असते तर बहुधा द्यूत टळले असते पण भीष्म स्वस्थ बसला. पांडव हस्तिनापुरात आल्यावर सर्वांना भेटले व द्यूत दुसऱ्या दिवशीं झालें. तोंवर वेळ मिळाला होता मात्र भीष्माने युधिष्ठिरालाही 'द्यूत खेळूं नको' असा निकराचा सल्ला दिला नाही. 'खेळताना संयम पाळ' येवढेही निक्षून सांगितले नाहीं! कुटुंबप्रमुख असलेल्या भीष्माला हा नाकर्तेपणा कां ग्रासून राहिला हे उलगडत नाही. द्यूत झालेच. युधिष्ठिर कायम हरतच राहिला. पांडव सर्व संपत्ति हरेपर्यंत द्यूत चालले. मग त्याने सहदेवास पणास लावले. हीच वेळ होती, खरे तर द्यूत संपवण्याची! येथून पुढील युधिष्ठिराचा सर्व अतिरेक दरबारातील सर्वांनी चालूं दिला. भीष्माने, पहिल्या पांडवाला पणाला लावण्याच्या वेळेसच, निर्धाराने हा गैरप्रकार कां थांबवला नाहीं? 'राज्य वैभव तुम्हा नालायकांना राखतां आले नाहीं, आतां निघा आणि भीक मागा किंवा पुन्हा पराक्रम गाजवून नवीन राज्य व वैभव कमवा. तुमच्या दुर्दशेला युधिष्ठिरच कारण आहे, तेव्हां कौरवांना दोष देऊं नका' असें म्हणून त्याने पांडवांना हांकलून कां दिलें नाहीं? द्यूत तेव्हांच थांबवले असते तर पुढील घोर अपमान, द्रौपदीचा छळ व अनावर वैर टळलें असतें. महाभारतात याचे उत्तर मिळत नाहीं.

युधिष्ठिर चारी भावांनंतर स्वत:ला पणाला लावून हरला. सर्व पांडव दास

झाले. शकुनीने द्रौपदीला पणाला लावण्याची सर्वथैव अनुचित सूचना केली. तिलाही भीष्माने काडीचाही विरोध केला नाहीं! हा पणही हरल्यावर द्रुपदकुळाची राजकन्या असलेल्या द्रौपदीची सर्व प्रकारे होणारी अप्रतिष्ठा भीष्मानेही निमूट पाहिली. यांतून उद्भवणारे पांचाल-कौरव घोर वैर त्याला दिसत नव्हतें काय? कुरुकुळाचा प्रमुख या नात्याने त्याने तें टाळावयास हवें होतें. द्रौपदीने विचारलेल्या, 'मी दासी झाले कीं नाहीं?' या प्रश्नाचे उत्तरही भीष्माने दिलेच नाहीं. 'मला काय उत्तर द्यावे समजत नाहीं ' असा जबाब त्याने दिला. अखेर धृतराष्ट्रानेच तिला वर देऊन पांडवांना दास्यांतून मुक्त केले व जिंकलेले सर्व धनही परत दिले व 'सर्व प्रकार विसरून परत जा' असा युधिष्ठिराला निरोप दिला. पांडव परत गेले. या सर्व प्रसंगानंतर, परत जाण्यापूर्वी, भीष्म, विदुर, धृतराष्ट्र, द्रोण, कृप वा इतर कुरुवृद्धांनी युधिष्ठिराची अतिरेकी द्यूताबद्दल खरडपट्टी काढली नाही. पांडवांच्या झालेल्या अपमानांमुळे लगेचच युद्ध उभे राहील या धास्तीने, माझ्या मते, ते भय दूर सारण्यासाठी, अनुद्यूत झाले. कोणताही पक्ष जिंकला तरी युद्ध तेरा वर्षे टळणार होते. मात्र युधिष्ठिर जिंकला असता तर कौरवांतर्फे कोणकोण वनात जाणार होते हे स्पष्ट सांगितलेले नाही. अनुद्यूताचा बेत मुळात कोणाचा हे महाभारतात स्पष्ट नाही. या बेतालाही भीष्माने विरोध केला नाहीं. पांडव पुन्हा हरून १२ वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवासासाठी वनात गेले. या सर्व अनर्थपरंपरेचा भीष्म निव्वळ साक्षीदार राहिला. तो इतका निष्क्रिय कां झाला याचे उत्तर महाभारतात नाहीं.

पांडव वनवासाला गेले. त्यांची खबरबात हस्तिनापुराला कळत होतीच. पांडवांना हिणवण्यासाठीं दुर्योधन व कर्ण यांनी गायींचीं खिल्लारे तपासण्याच्या निमित्ताने वनांत त्यांच्या सन्निध जाऊन त्यांना आपल्या वैभवाचे प्रदर्शन घडवावे व त्यांची दैन्यावस्था पहावी म्हणून द्वैतवनात दौरा काढला. हा बेत धृतराष्ट्राला पसंत नव्हता आणि भीष्मही त्याला मान्यता देणार नाही असे त्याने दुर्योधनाला म्हटले. दुर्योधनाने बापाची समजूत काढली अन भीष्माला विचारलेच नाहीं! एव्हांना दुर्योधनाने व कर्णाने भीष्माला काडीइतकीही किंमत द्यायची नाही असेच ठरवले होते! भीष्म तरीही हस्तिनापुराला चिकटून राहिला ! कां कोण जाणे.

कौरव वनात गेले तेथे त्यांचा गंधर्वांशी झगडा होऊन सडकून मार मिळाला. कर्ण दुर्योधनाला सोडून जीव वाचवण्यासाठी पळून गेला. दुर्योधन गंधर्वांचा बंदी झाला. अखेर पांडवांनी दुर्योधनाला मुक्त केले. भयंकर अपमान सोसून सगळे हस्तिनापुराला परत आले. यावेळी मात्र भीष्माने 'कर्ण पांडवांच्या चौथ्या हिश्शानेही नाही' असें दुर्योधनाला ऐकवलें. दुर्योधन व कर्ण यांनी नेहमी प्रमाणे भीष्माकडे पूर्ण दुर्लक्ष केले. भीष्म तरीही अपमान सोसत हस्तिनापुरातच राहिला!

पांडव अज्ञातवासात असताना त्याना शोधण्याच्या दुर्योधनाच्या प्रयत्नांमध्ये भीष्माने उत्साहाने भाग घेतला. जणूं पांडवांना शोधून काढून पुन्हा वनवासाला धाडण्यात त्याला स्वत:ला काहीच वावगे वाटत नव्हते आणि त्याला तेच हवे होते! एवढा तो पांडवांच्या विरोधात कां गेला असावा? विराटाचा सेनापति असलेल्या कीचकाच्या वधानंतर, त्रिगर्त राजाच्या सूचनेप्रमाणे विराटावर हल्ला करून त्याचीं गायींचीं खिल्लारे लुटण्याच्या दुर्योधनाच्या बेततही तो सहभागी झाला. खरे तर कौरवांचे व विराटाचे काही पुराणे वैर नव्हते मग त्याने दुर्योधनाला विरोध कां केला नाहीं?

महाभारतात स्पष्टपणे म्हटलेले नाही पण सूचित केले आहे कीं कीचकाच्या वधाची बातमी ऐकून दुर्योधनाला वाटले कीं हा वध भीमाशिवाय दुसऱ्या कोणी केला असणे असंभव आहे. त्रिगर्तराजाची सूचना त्याने स्वीकारली यामागे विराटाच्या आसऱ्याला पांडव असतील तर विराटाच्या मदतीला ते युद्धात उतरतीलच व ओळखता येतील असा त्याचा विचार होता असे दिसते. भीष्म वा विदुराला अशी शंका आली असती तर विराटावर हल्ला करण्याचा बेत त्याना कदाचित मोडून काढतां आला असता. भीष्माने तसा प्रयत्न केला असता काय हा प्रश्नच आहे! कौरवांचा हल्ला पहिल्या दिवशी सप्तमीला झाला असता तर अर्जुन नव्हे तर भीम कौरवांशी युद्धाला आला असता व तोही लगेच ओळखला गेला असताच. प्रत्यक्षात त्रिगर्तांचा हल्ला सप्तमीला दुपारी झाला. त्रिगर्तांच्या विरुद्ध भीम लढला व त्याने मोठा पराक्रम गाजवला पण सुदैवाने, त्रिगर्ताला त्याला ओळखता आले नाही. युधिष्ठिराने त्याला 'इतरांप्रमाणेच लढ, झाड उपटून घेण्यासारखे तुझे खास प्रकार करूं नको, नाहीतर ओळखला जाशील' असे बजावले होते.

प्रत्यक्षात कौरवांचा हल्ला दुसऱ्या दिवशी अष्टमीला सकाळीच झाला. विराटाचे वतीने त्याचा पुत्र उत्तर व अर्जुन युद्धाला उभे राहिल्यावर कौरवांनी अर्जुनाला लगेच ओळखलें व 'तेरावे वर्ष पुरे होण्यापूर्वीच अर्जुन ओळखला गेला आहे' असे दुर्योधनाने लगेच म्हटले. द्रोणाचार्यांनी, 'पांडवांनी असे कसे केले' अशी शंका व्यक्त केल्यावर भीष्माने सौरवर्ष व चांद्रवर्ष यांचे गणित उलगडून 'आज सकाळीच, सौरमानाने पांडवांनी तेरा वर्षे पुरीं केलीं आहेत' असें म्हटलें. (कौरवांचा हल्ला एक दिवस आधी झाला असता तर तेही झाले नसते!) चांद्रमानाने आवश्यक तेवढे अधिक महिने मोजून तेरा वर्षे उघडच पुरीं झालेलीं नव्हती. मग पांडवांनी अनुद्यूताचा पण पुरा केला असे ठरते कीं नाहीं याबद्दल भीष्माने स्वत:चे नि:संदिग्ध मत, अनुकूल वा प्रतिकूल, तेव्हां (वा नंतर पुढे केव्हांही, कृष्णशिष्टाईचे वेळीं देखील) दिलेच नाहीं! अर्जुनापासून कर्णाला व कौरवांना यावेळीं वांचवून हस्तिनापुराला परत नेण्याचें काम मात्र त्याने केलें.

अज्ञातवास संपल्यावर पांडवांतर्फे द्रुपदाचा पुरोहित कौरवांकडे आला व त्याने राज्याची मागणी केली. ती दुर्योधनाने नाकारली. भीष्माने पुरोहिताला सांगितले कीं आम्ही विचार करून काय तो जबाब कळवू. पांडवांची मागणी न्यायाची आहे आणि म्हणून मान्य केलीच पाहिजे असा आग्रह भीष्माने धरला नाहीं. मागणी नाकारली गेली. कटु सवाल जबाबांनंतर अखेरचा प्रयत्न म्हणून पांडवांतर्फे कृष्ण कौरवदरबारांत शिष्टाईला आला. पांडवांचा अज्ञातवास पुरा केल्याचा दावा, वादग्रस्त आहे हें ओळखून, कृष्णाने त्यावर मुळीच भर न देतां शम हा दोन्ही पक्षांना कसा हितावह आहे यावरच जोर दिला. दुर्योधनाने पांडवांचा दावा सपशेल फेटाळून लावला व 'युद्धाला भिऊन मी राज्य देणार नाहीं' असे म्हटलें. यावर भीष्मद्रोणांनी 'तूं असा आडमुठेपणा केलास तर आम्ही तुझी बाजू घेणार नाहीं, युद्धापासून अलिप्त राहूं' असे त्याला बजावले नाहीं. पांडवांचे मुख्य समर्थक द्रुपद व पांचालराजपुत्र असल्यामुळे द्रोणाला त्यांच्याशीं युद्धाची खुमखुमी असणे समजूं शकतें पण भीष्माने अशी धमकी दिली असती तर, जन्मभर भीष्माच्या हो ला हो करणाऱ्या द्रोणालाही, स्वस्थ बसावें लागले असते. भीष्माने असे कांही केले नाहीं. पांडवांचा अज्ञातवास पुरा केल्याचा दावा त्यालाही मान्य नव्हता काय? त्याने तसेंही म्हटलेले नाहीं!

दुर्योधन अजिबात बधत नाही असे दिसल्यावर कृष्णाने अखेर धृतराष्ट्र, भीष्म व इतरांना बजावलें कीं कुलक्षय टाळण्यासाठी तुम्ही दुर्योधनाला आवरा. तसे केलेत तर पांडवांना मी आवरीन. ' कोणीही काही केले नाही. एव्हांना दुर्योधनाला ठामपणे विरोध करण्याचे बळ वा इच्छाशक्ति भीष्म वा इतर कोणातही उरली नव्हती. शिष्टाई असफल होऊन कृष्ण परत गेला व मार्गशीर्ष प्रतिपदेपासून युद्ध सुरू करूं असा कर्णातर्फे त्याने कौरवांना निरोप दिला. युद्ध आतां अटळ होतें.

भीष्माने या अटीतटीच्या वेळीदेखील, कौरवपक्ष सोडून पांडवांची बाजू घेण्याचा विचारही केलेला दिसत नाही. त्याने अजूनही तसा धाक दुर्योधनाला घातला असता तर द्रोण, कृप, अश्वत्थामा यांनी काय केले असते, दुर्योधनाने काय केले असते, हे तर्क निष्फळ आहेत. कौरवांचे दुर्योधनाने देऊं केलेले सेनापतिपद भीष्माने खळखळ न करतां स्वीकारलें. फक्त एकच अट घातली कीं 'एकतर कर्ण किंवा मी, एकच कोणीतरी लढेल'. यात मात्र एक गोष्ट दिसून येते कीं युद्धावर नियंत्रण ठेवण्याचा त्याचा हेतु असावा. आततायी व पांडवाचा दीर्घद्वेष करणाऱ्या कर्णाला 'अर्धरथी' ठरवण्यामागे आणि अशी अट घालण्यामागे कर्णाने युद्धापासून दूर रहावें हाच भीष्माचा हेतु होता तो अचूक सफळ झाला. 'भीष्म जिवंत असेपर्यंत मी युद्धात भाग घेणार नाही कारण मी कितीही पराक्रम केला तरी विजयाचे श्रेय सेनापति या नात्याने भीष्मालाच मिळेल. भीष्माच्या मृत्यूनंतरच मी युद्धाला उभा राहीन. ' असे त्याने दुर्योधनाला म्हटले. ज्याच्यावर दुर्योधनाचा भरवसा होता त्या कर्णानेच एक प्रकारे त्याला दगा दिला! कर्णासाठी भीष्माला बाजूला सारण्याचे धैर्य अर्थातच दुर्योधनाला झाले नाही. 'मी रोज १०, ००० सैन्य मारीन पण एकाही पांडवाला मारणार नाही' हेही भीष्माने दुर्योधनाला प्रथमच सांगून टाकलें. यावरून माझा तर्क असा कीं सर्व राजे व प्रचंड सैन्य जमलें आहे तेव्हां थोडेंफार युद्ध अटळच आहे, तर तें जमेल तितके नियंत्रणाखालीं ठेवलें तर निदान कुलक्षय टळेल असा भीष्माचा प्रयत्न दिसतो. त्याच्या सेनापतित्वाखाली पहिले दहा दिवस युद्ध झाले तोंवर धर्मयुद्धाचे त्यानेच घालून दिलेले नियम सर्रास मोडले जात नव्हते. जरी सैन्याचा व कित्येक वीरांचा मृत्यु झाला होता तरी कौरव व पांडवांपैकी कोणीही मेले नव्हते. त्यामुळे भीष्माचा हेतु साध्य झाला होता असे म्हटले पाहिजे.

युद्धामध्ये भीष्माला कोणीही रोखूं शकत नव्हतें. तो फार अनावर झाला म्हणजे नाइलाजाने अर्जुनालाच त्याचेशीं लढावे लागत होते. अंबेने ज्या शिखंडी रूपाने पुनर्जन्म घेतला होता त्याचेशी युद्ध करण्याचे भीष्म नाकारत राहिला कारण शिखंडी प्रथम स्त्री म्हणून जन्माला आला होता. मात्र शिखंडीचे हातून भीष्म मेला असे महाभारत मुळीच म्हणत नाही. त्याचे आड राहून अर्जुनाने भीष्माशी युद्ध केले असेही महाभारत म्हणत नाही. हे दोन्हीही निव्वळ गैरसमज आहेत. युद्धाच्या दहाव्या दिवशीं अर्जुनाचेच प्रखर बाण लागून अखेर भीष्म शरपंजरीं पडल्यावर 'आतांतरी युद्ध पुरे करा' असें त्याने दोन्ही पक्षांना सांगितले पण आतां फार उशीर झाला होता. त्यामुळे युद्ध चालू राहिले व कुलक्षय व्हायचा टळला नाहीं. उत्तरायण लागेपर्यंत भीष्म शरपंजरी जीव धरून होता. त्यामुळे युद्धाचा भीषण शेवट त्याला मृत्यूपूर्वी ऐकावा लागला.

सर्व भीष्मचरित्राचा आढावा घेतल्यावर त्याच्या वागण्याचा कित्येक वेळां उलगडा होत नाहीं असेंच म्हणावे लागते. ज्या कुरुकुळाच्या वाढीसाठी तो कौरव-पांडवांच्या जन्मापर्यंत आपल्यापरीने झटला त्या कुळातील दुर्योधनाचे अनाचार तो थांबवू शकला नाही. तसा निकराचा प्रयत्नही त्याने केलेला दिसत नाही. परिणामी कुरुकुळाचा क्षयच त्याला अखेर पहावा लागला. भीष्मप्रतिज्ञा एकप्रकारे विफलच झाली असें म्हणावे लागते. मात्र प्रतिज्ञापालनाचा एक उज्वल आदर्श त्याने जगासमोर उभा केला हे खरे.

द्रोण आणि पांडव

द्रोणाचार्य आणि पांडव यांचेमधील परस्पर संबंध गुंतागुंतीचे व बदलत गेलेले दिसून येतात. त्यांचा थोडा आढावा घेणार आहे.

कौरव पांडवांचे बालपण संपल्यावर त्यांच्या शिक्षणाचे काम कृपाचार्यांकडे होते. द्रोणाचार्य हे कृपाचार्यांच्या बहिणीचे पति. द्रॉणाचार्य व पांचालांचा राजा द्रुपद हे एकाच गुरूपाशी शिकले व बाळपणी त्यांची अर्थातच मैत्री होती. द्रोण दरिद्री राहिला, द्रुपद राज्यावर आला. द्रोणाने दारिद्र्यावर उपाय म्हणून द्रुपदाची गाठ घेतली व मैत्रीची आठवण दिली पण द्रुपदाने ती झिडकारली व आता तुझीमाझी बरोबरी कशी होणार असे म्हणून अपमान केला. रागावून द्रोण निघाला व उत्तम शिष्य मिळवून त्याना शिकवून त्याच्याकडून द्रुपदाला धडा शिकवण्याच्या उद्देशाने भटकत असतां हस्तिनापुरात आला. भीष्माने त्याची लायकी जाणून त्याला सन्मानाने ठेवून घेतले व कौरव-पांडवाना धनुर्विद्या शिकवण्याचे काम त्यांच्याकडे सोपवले. त्यामुळे पांडव व द्रोण यांचे मूळ नाते गुरु-शिष्याचे.

द्रोण हा खरा धनुर्वेदाचा आचार्य. तो काही मल्लविद्येचा तज्ञ नव्हे. कौरव-पांडवाना व त्यांचेबरोबर आपला पुत्र अश्वत्थामा यालाही त्याने धनुर्विद्या शिकवली. सर्व शिष्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे ती आत्मसात केली. अर्जुन आणि अश्वत्थामा यांनी बरोबरीने उत्तम यश मिळविले. भीम, युधिष्ठिर, नकुल सहदेव एकादी पायरी खाली असले तरी नगण्य खासच नव्हते. दुर्योधन दुःशासन कदाचित आणखी एक पायरी खालीं असावे पण तेही नगण्य नव्हतेच. द्रोण मल्लविद्या तज्ञ नव्हता. भीम, दुर्योधन, दुःशासन यानी आपल्या आवडीप्रमाणे ते ज्ञान इतरांकडून मिळवले.

कर्णाचा उल्लेख कोठेकोठे द्रोणशिष्य असा आढळतो. मला ते मान्य नाही. कर्ण कौरव-पांडवांपेक्षा ८-१० वर्षांनी मोठा होता तव्हा द्रोण हस्तिनापुराला येण्यापूर्वीच तो बाहेर पडून प्रथम इतर कोणा गुरूपाशी व नंतर परशुरामापाशी शिकला असला पाहिजे. कर्णाने द्रोणाला गुरु म्हणून कधीच कोणताही मान दिलेला दिसत नाही याचेही कारण

गुरुशिष्याचे नातेच नव्हते. कौरव-पांडवांचे शिक्षण संपल्यावर कौशल्यप्रदर्शनाचा कार्यक्रम झाला तेव्हा सर्व कार्यक्रम उरकल्यावर कर्ण उपटसुंभासारखा पुढे आला, त्याने अर्जुनाचे सर्व धनुर्विद्याप्रयोग स्वत;ही केले आणि मग त्याला, अचानक, द्वंद्वाचे आव्हानही दिले. त्यावेळी 'तूं कोण?' असा प्रश्न कृपाचार्यांना त्याला विचारावा लागला यावरूनही तो आधीपासून हस्तिनापुरात द्रोणापाशी शिकत असणे शक्य नाही हेच दिसते.

शिक्षण संपल्यावर गुरुदक्षिणा म्हणून कौरव-पांडवानी द्रुपदाशी लढून त्याला पकडून आणावे असे द्रोणाने म्हटले. कां कोण जाणे पण कौरवानी प्रथम स्वतंत्रपणे द्रुपदाशी युद्ध केले पण द्रुपदाने त्याना दाद दिली नाही. मग पांडवानी द्रुपदाचा पराभव करून त्याला द्रोणासमोर उभे केले. द्रोणाने द्रुपदाचे अर्धे राज्य घेतले असे म्हटले आहे पण ते नावापुरतेच असावे, तेथे राज्य करण्यासाठी द्रोण वा अश्वत्थामा काही गेले नाहीत! अपमानाचा बदला घेतला एवढेच. या काळात पांडव साहजिकच द्रोणाच्या मर्जीतले झाले होते.

द्रुपदाच्या पराभवानंतर द्रोणाचे हस्तिनापुरातील कार्य संपले होते. पण भीष्माने काही त्याना निरोप दिला नाही व द्रोणही हस्तिनापुर सोडून कोठे गेला नाही. त्याने शिष्याना शिकवण्याचे काम चालू ठेवले होते काय हे महाभारतात स्पष्ट केलेले नाही.

यानंतर युधिष्ठिराला युवराजपद मिळाले. दुर्योधनाची निराशा व जळफळाट होणे स्वाभाविकच होते. धृतराष्ट्राने पांडवाना दूर करण्यासाठी वारणावतास जाऊन राहण्यास सांगितले. दुर्योधनाचा बेत अर्थात वेगळाच होता. पांडव आणि द्रोण यांचे संबंध येथून पुढे हळूहळू दुरावत गेलेले दिसतात. वारणावतात पांडवाना लाक्षागृहात जाळून मारण्याचा दुर्योधनाचा बेत विदुराने त्याना वेळीच सावध केल्यामुळे व मदत केल्यामुळे तडीस गेला नाही. पांडव जिवानिशी वाचले पण पुढे दीर्घकाळ जिवाच्या भीतीने परागंदा व्हावे लागले. हस्तिनापुरात, पांडव व कुंती जळून मेले असाच समज झाला. त्यांची उत्तरक्रियाही झाली. धृतराष्ट्र नावाचा राजा, दुर्योधन सर्वसत्ताधीश व भीष्म निवृत्त, अशी अवस्था झाली. मात्र दुर्योधनानेही द्रोणाला दूर केले नाही. द्रोणही अश्वत्थाम्यासह हस्तिनापुरातच कौरवांच्या आश्रयाने राहिला. पांडवाना सारेच विसरून गेले.

द्रुपदाचा पांडवानी पराभव केला पण त्याने द्रोणावरचा राग सोडून दिलेला नव्हता. त्याने यज्ञ करून द्रौपदी व धृष्टद्युम्न या आपल्या मुलाना राजकुळात सामील करून घेतले. तीं द्रुपदाचीं वन्य जमातीच्या स्त्रीपासूनचीं अपत्ये असा माझा तर्क आहे. (यज्ञातून मुले जन्माला येतात हे मला पटत नाही!) धृष्टद्युम्नाने आपल्या मातृकुळाकडून युद्धविद्या प्राप्त केली असावी. द्रोणाने त्याला शिकवले असे क्वचित कोठे सूचित केले आहे पण ते मला खरे वाटत नाही. कौरव-पांडवांनंतर द्रोणाने इतर कुणाला शिकवलेले नाही. धृष्टद्युम्नानेही द्रोणाला कधी गुरु म्हणून मान दिलेला नाही.

पांडव लाक्षागृहातून वांचले होते अशी शंका यादवाना व द्रुपद-दृष्टद्युम्नाला होती असा महाभारतात उल्लेख आहे. पण ते कोठे गेले हे कोणालाच माहीत नव्हतें. द्रुपदाने द्रौपदी व धृष्टद्युम्न यांचा राजकुळात समावेश करून घेतला हे पांडवाना माहीत नव्हते. पांडव अनेक ठिकाणी भटकून अखेर एकचक्रा नगरीत लपून राहिले होते. भीमाने तेथे बकासुराचा वध केला. ते ऐकून कदाचित काहीना भीमाची आठवण आलीही असेल! काही काळाने द्रुपदाने कन्येचे स्वयंवर जाहीर केले. पण लावला होता तो असा अवघड कीं जणूं अर्जुन कोठे जिवंत असेल तर त्यालाच तो जिंकतां येईल! तो नाहीच प्रगट झाला पण इतर कोणा वीराने पण जिंकला तर तोही द्रोणाविरुद्ध मदतीला येईलच असा त्याचा हेतु दिसतो. स्वयंवराची बातमी पांडवांना कळलीच आणि त्याना तेथे जावे असे वाटूं लागले. केव्हातरी अज्ञातवासातून बाहेर पडायचे तर द्रौपदी प्राप्त झाल्यास द्रुपदासारखा प्रबळ सासरा मदतनीस मिळणार होता. कुंतीनेही त्याना संमति दिली. पांडव ब्राह्मणवेषात स्वयंवराला गेले. अनेक लहानमोठे राजे व वीरपुरुष आले होते. स्वयंवराचा पण ऐकल्यावर कोणी धाडस करीना! कर्ण पुढे झाला तेव्हा लगेच द्रौपदीने स्पष्टपणे ‘मी सूतपुत्राला वरणार नाही असे म्हटले.’ कृष्ण-बलरामानी ब्राह्मणवेषातील पांडवाना ओळखले. अपेक्षेप्रमाणे अखेर अर्जुनानेच पण जिंकला. पांडवांच्या इच्छेप्रमाणे पांचही भावांची द्रौपदी पत्नी झाली.

या स्वयंवराला भीष्म वा द्रोण उपस्थित होते का? महाभारतात स्पष्टपणे काही म्हटलेले नाही. बहुधा नव्हते. पांडव जगले हे ऐकून भीष्माला आनंद झाला असणारच

पण आपण पूर्वी दुर्लक्ष केले होते हेही जाणवले. पांडवांचा द्रुपदकन्येशी विवाह झाल्यामुळे द्रोण आणि पांडव यांच्यातील संबंध मात्र निश्चितच बदलले! द्रोणाला जाणवले असणार कीं येथून पुढे कधी द्रुपदाशी युद्धप्रसंग आल्यास पांडव आपले नव्हे तर द्रुपदाचे समर्थक असतील. द्रोण व पांडव यांच्यातील या बदललेल्या संबंधाची छाया यापुढे प्रत्येक प्रसंगीं जाणवते.

पांडव जिवंत आहेत आणि ते आता द्रुपदाचे जावई झाले आहेत हे कळल्यावर भीष्मालाही जाग आली. त्याने पांडवाना हस्तिनाअपुराला बोलावून घेतले आणि राज्याचा वाटा दिला. मात्र हस्तिनापुरात न राहता खांडववन जाळून नवीन राजधानी बनवण्यास सांगितले. हस्तिनापुरात धृतराष्ट्र व दुर्योधन यांचेच राज्य राहिले. भीष्म, द्रोण, विदुर हेही हस्तिनापुरातच राहिले. पांडवानी कृष्णाच्या मदतीने खांडववन जाळून इंद्रप्रस्थ ही नवीन राजधानी वसवली. तेथे त्यांचा उत्कर्ष झाला. कालांतराने युधिष्ठिराने राजसूय यज्ञ योजिला. जरासंध वध केला आणि इतर राजांची संमति यज्ञाला मिळवली. यज्ञ पार पडल्यावर झालेल्या समारंभाला कौरव उपस्थित होते. भीष्मही होता. द्रोणाचा उल्लेख नाही पण तोही असणारच. शिशुपालाने कृष्णाच्या अग्रपूजेला विरोध केला, भीष्माचाही अद्वातद्वा बोलून अपमान केला. अखेर कृष्णाने त्याला मारले. द्रोणाने पांडवाना विरोध केला नाही पण त्यांच्या बाजूने काही केल्याचाही उल्लेख नाही. त्याने पांडवांच्या वाढत्या बळाची नोंद घेतली असणारच.

दुर्योधनाला पांडवांचा उत्कर्ष सहन झाला नाही. शकुनीच्या सल्ल्याने त्याने द्यूताचा बेत आखला व बापाची संमति मिळवली. पुढील अनर्थ एकट्या विदुरालाच जाणवला. युधिष्ठिर व पांडव आल्यावर अखेरच्या क्षणी आपल्याला शकुनिबरोबर खेळायचे आहे हे त्याला कळले. युधिष्ठिर आणी शकुनी यांच्यात द्यूत झाले तर काय होईल हे उघड होते पण भीष्मानेही ते थांबवण्याची आज्ञा दिली नाही. भीष्म स्वस्थ बसल्यावर द्रोणाने काही करण्याचा प्रश्नच नव्हता.

अपेक्षेप्रमाणे युधिष्ठिर अनेक पण लागोपाठ हरला. भावांना आणि स्वतःला पणाला लावून हरल्यावर द्रौपदीला पणाला लावणे, मग तिचा भयानक अपमान व छळ हे

सर्व होत असताना भीष्मानेही 'तूं दासी झालीस कीं नाही हे मला सांगतां येत नाही' असा विचित्र पवित्रा घेतला! द्रोणाने आपल्या एकेकाळच्या मित्राच्या मुलीवर ओढवलेल्या या प्रसंगीं काय केले? काही नाही! त्याला आनंद झाला असेल असे म्हणवत नाही.

अखेर धृतराष्ट्रानेच पुढील अनर्थ जाणून, पांडव व द्रौपदी याना सन्मानपूर्वक मुक्त करून, 'झाले गेले विसरून जा' असे म्हणून परत जाण्यास सांगितले. झालेल्या घोर अपमानांचा बदला घेण्याचा आज ना उद्या पांडव प्रयत्न करतीलच या धास्तीने दुर्योधन व कौरवाना घेरले. भीष्म आपली बाजू घेईल अशी त्याना खात्री नव्हती. त्यानी द्रोणाला साकडे घातले. त्याना चार कठोर शब्दही न सुनवता द्रोणाने बेलाशक त्याना मदतीचे आश्वासन दिले असे महाभारत म्हणते! अविश्वसनीय पण खरे आहे!

पांडव पुन्हा परतून आले आणि आणखी एक डाव खेळले व हरले. त्याना १२ वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवासासाठी वनात जावे लागले. परिणामी कॉरव-पांडवांमधले युद्ध १३ वर्षे टळले. हा सर्व काळ द्रोण हस्तिनापुरातच राहिला. १३ वर्षांनंतर पांडवांबरोबर युद्ध होणार आणि पांडवांचे मुख्य समर्थक द्रुपद व त्याचे बंधु, पुत्र हे असणार हे द्रोणाला दिसत होते. युद्ध टाळण्याचा कोणताही प्रयत्न द्रोणाने केला नाही. जणू द्रुपदाबरोबर एक अखेरचे युद्ध त्याला हवेच होते!

अज्ञातवासाचे अखेरीस त्रिगर्ताच्या बेताप्रमाणे विराटाचे गोधन लुटण्याच्या दुर्योधनाच्या मोहिमेत द्रोण सामील झाला. अर्जुन समोर आल्यावर, द्रोणानेच १३ वर्षे पुरी झाली कीं नाही हे विचारले भीष्माचा खुलासा त्यावेळी वा नंतरही, त्याने स्वीकारला वा नाकारलाही नाही! दुर्योधनाने मात्र तो तेथेच नाकारला. अर्जुनाने सर्व कौरववीरांचा समाचार घेतला व त्याना पळवून लावले. त्या युद्धप्रसंगी द्रोणाने फारसे काही केले नाही. पट्टशिष्य अर्जुनाचा पराक्रम तो पाहत बसला.

पांडव प्रगट झाले, अभिमन्यूचा विराटकन्येशी विवाह झाला, पांडवानी इंद्रप्रस्थाच्या राज्यावर आपला दावा दुर्योधनाकडे केला. त्याने तो नाकारला. वाटाघाटी चालल्या. अखेरच्या प्रयत्नासाठी कृष्ण आला. तेव्हाही द्रोणाने दुर्योधनाला 'मी युद्धापासून

अलिप्त राहीन' असा धाक घातला नाही. युधिष्ठिराचा दावा द्रोणाने स्पष्टपणे स्वीकारला पण नाही वा नाकारलाही नाही! द्रुपदाबरोबरचे युद्ध त्याला टाळायचे नव्हतेच. केव्हातरी त्याला धृष्टद्युम्नाबरोबर अंतिम युद्ध करणे भाग होते. युद्ध सुरू झाले तेव्हा भीष्माने सेनापतिपद स्वीकारले. कर्ण बाहेर राहिला. १० दिवस युद्धावर भीष्माने नियंत्रण ठेवले. द्रोणाने निकराचे युद्ध केले नाही. १० व्या दिवशी सर्व प्रमुख रथीना 'भीष्माचे संरक्षण करा' असे त्याने म्हटले. पांडवाना मारण्याचा द्रोणाचा हेतु नव्हताच. कदाचित थोड्या युद्धानंतर समेट झाला तर त्यालाही तो बहुधा हवाच असेल. १० दिवसाचे अखेर भीष्म कोसळला पण उत्तरायण लागेपर्यंत त्याने शरपंजरी पडणे पत्करले.

कर्ण आता युद्धात सामील झाला पण द्रोणाला दुर्योधनाने डावलले नाही. द्रोणालाच सेनापति केले. कर्णानेही तसाच सल्ला दिला होता. पांडवांचे मुख्य समर्थक अजूनही पांचालच होते. त्याना तोंड देण्याचे काम द्रोणालाच करायचे होते.

सेनापति म्हणून नियुक्त झाल्यावर द्रोणाने दुर्योधनाला त्याची काय इच्छा आहे असे विचारले. दुर्योधनालाही बहुधा आता युद्ध संपले तर हवे असावे, कारण त्याने द्रोणाला म्हटले कीं त्यानी युधिष्ठिराला पकडावे. द्रोनाने आश्चर्य व आनंद व्यक्त केला कीं दुर्योधनाला युधिष्ठिराचा मृत्यु नको होता! दुर्योधनाने खुलासा केला कीं युधिष्ठिराला मारले तर भीमार्जुन कोपून सर्वनाश करतील. त्यापेक्षा युधिष्ठिराला पकडले तर त्याला पुन्हा द्यूत खेळायला लावून पांडवाना कायमचे वनात पाठवतां येईल. द्रोणाने युधिष्ठिराला पकडण्याचे कबूल केले मात्र 'अर्जुन उपस्थित असेल तर ते शक्य होणार नाही, अर्जुनाला इतरत्र अडवून ठेवलेत तर मी तुझा हेतु साध्य करीन' असे त्याने दुर्योधनाला म्हटले.

या बेतामध्ये जर द्रोण यशस्वी झाला असता तर काय झाले असते असा विचार करतां येईल! युधिष्ठिराला पकडले तर पांडवांचे काय होणार हे स्पष्ट होते. पांडवाना मारणे हे काही सोपे नव्हतेच तेव्हां त्यापेक्षा ते कायमचे राज्यवंचित होणे कदाचित द्रोणाला उचित वाटले असेल!

परिणामी ११ व्या दिवसापासून युद्धहेतु बदलला! युधिष्ठिराला पकडणे आणि त्यासाठी अर्जुनाला इतरत्र अडकवणे हा मुख्य बेत ठरला. हे पांडवांनाही कळलेच होते. पहिले दोन दिवस त्रिगर्त राजा सुशर्मा आणि त्याच्या बंधूनी अर्जुनाला अडकवण्याचा प्रयत्न केला तरी ते पूर्ण साध्य झाले नाही. अर्जुनाने अडचणीच्या वेळी युधिष्ठिराला वाचवलेच. दुर्योधनाला राग आला पण द्रोणाने पुन्हा स्पष्ट सांगितले कीं अर्जुन उपस्थित असताना मी युधिष्ठिराला पकडू शकत नाही! त्याला दूर ठेवा! १३ व्या दिवशी पुन्हा त्रिगर्तानी अर्जुनाला अडवण्याचा निर्वाणीचा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. १३व्या दिवसाचे युद्ध अनपेक्षितपणे निर्णायक ठरले.

महाभारत म्हणते कीं तेराव्या दिवशी त्रिगर्त वीरानी अर्जुनाला दिवसभर अडवून ठेवले. नवल म्हणजे या सर्व दिवसभराच्या अर्जुन-त्रिगर्त युद्धाचे वर्णन अवघ्या चार श्लोकात उरकले आहे! आधीच्या दिवसाच्या युद्धाचे वर्णन अनेक पाने भरुन आहे! मला दाट शंका आहे कीं या दिवशी अर्जुन थकव्यामुळे वा जखमांमुळे दिवसभर युद्धभूमीवर फिरकला नसावा!

या दिवशी द्रोणाने दुर्योधनाला आश्वासन दिले होते कीं आज मी एका तरी पांडवपक्षाच्या प्रमुख वीराचा अंत घडवीन. मात्र त्याने कौरवसेनेचा चक्रव्यूह रचला होता. त्याचे वर्णन भेदण्यास अत्यंत कठीण असे केले आहे हे वर्णन खरे तर बचावात्मक व्यूहाला लागू पडते. द्रोणाने स्वतःला या व्यूहापासून वेगळे ठेवले होते. त्याचा बेत युधिष्ठिराला पकडण्याचाच होता. हे अर्थातच पांडवाना ठाऊक होते. या दिवशी पांडवानी अनपेक्षितपणे सुरवातीलाच द्रोणावर हल्ला केला. द्रोणाने आपला बचाव व्यवस्थित केला. चक्रव्यूह कोण भेदणार याचे उत्तर पांडवाना मिळत नव्हते.

अर्जुनाच्या अनुपस्थितीत ते काम अभिमन्यूवर पडले. तो व्यूह तोडून आत शिरला व सर्व कौरववीराना भारी पडत होता. अखेर द्रोणानेच सल्ला दिला कीं त्याच्या हातात धनुष्य आहे तोवर तो हरणार नाही. काही करून ते तोडा. त्याप्रमाणे करून अखेर कौरवानी अभिमन्यूचा वध केला. द्रोणाला याचा आनंद झाला का? महाभारत काहीच म्हणत नाही!

अर्जुन नसूनही दिवसअखेरपर्यंत द्रोण युधिष्ठिराला पकडू शकला नाहीच! अभिमन्यु मारला गेला आणि या दिवसाचे युद्ध संपले. अर्जुनाला अभिमन्यु मारला गेल्याचे कळले तेव्हां त्याने दुसरे दिवशी जयद्रथाचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. कौरवाना हे कळल्यावर त्यानी कोणत्याही परिस्थितीत जयद्रथाला वाचवायचे म्हणजे अर्जुन स्वतःच प्रतिज्ञेप्रमाणे नष्ट होईल असे ठरवले. १४ वे दिवशी द्रोणाने सर्व भर जयद्रथाला वाचवण्यावर दिला होता. त्याला सर्व कौरवसैन्याचे मागे ठेवले होते व सहा महावीराना दिवसभर अर्जुनाला आव्हान देऊन अडवून ठेवण्याचे काम दिले होते. त्याचा स्वतःचा बेत मात्र अजूनही युधिष्ठिराला पकडण्याचाच होता. द्रोणाचा दुर्योधनाच्या आश्वासनावर विश्वास असावा व जयद्रथाचा बळी देऊन युद्ध संपवता येईल अशी आशा वाटली असावी कारण अर्जुन अखेर यशस्वी होईलच हे त्याला ठाऊक होते! मात्र दिवस अखेर होण्यापूर्वी जयद्रथ तर मारला गेलाच पण भीम आणि सात्यकी अर्जुनाच्या मदतीला गेले असतांही एकट्या धृष्टद्युम्नाने युधिष्ठिराचा बचाव केला. आता द्रोणासमोर त्याच्याबरोबर अंतिम युद्ध येऊन ठेपले होते!

याआधीच्या प्रत्येक दिवशी सूर्यास्ताबरोबर वा त्यानंतर थोड्या वेळाने युद्ध थांबत असे. या दिवशी मात्र जयद्रथवधानंतर युद्ध चालूच राहिले ते सर्व रात्रभर चालले. मध्यरात्री घटोत्कच मारला गेला. द्रोण युधिष्ठिराला पकडू शकला नव्हता आणि पांचालांचा जोर वाढतच होता. द्रोणाचा युद्धहेतु आता बदलला. आता पांचालांचा विनाश त्याला करायचा होता. त्याने सर्व कौशल्य व मोठी अस्त्रे वापरण्यास सुरवात केली. पहाटे थोडाकाळ थांबलेले युद्ध सूर्योदयानंतर पुन्हा चालू होऊन दिवस अखेरपर्यंत चालले. द्रोणाने चालवलेला संहार पाहून कृष्णाला काळजी वाटू लागली. तो पांडवाना म्हणाला कीं याला आवरला नाही तर दिवस अखेर तुमचे सर्व समर्थक मारले जातील! मग कृष्ण आणि भीम यानी एक कुटिल बेत ठरवला. भीमाने एक अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला व द्रोणाजवळ जाऊन वरचेवर 'अश्वत्थामा मेला' असे त्याला सांगूं लागला. द्रोण विश्वास ठेवणार नाही आणि अखेरीस युधिष्ठिरालाच विचारील हे ठाऊक असल्यामुले भीम-कृष्ण यानी त्याला पढवले होते. नाइलाजाने, जेव्हा द्रोणाने विचारले 'अश्वत्थामा मेला काय?' तेव्हा युधिष्ठिराने 'हो मेला,

पण हत्ती' असे उत्तर दिले. शेवटचे शब्द मान वळवून उच्चारले. खोटे बोलणे टाळले. हेतु साध्य झाला. द्रोण विमनस्क झाला. भीमाने पुन्हा त्याच्याजवळ जाऊन 'तूं आमचा गुरु नव्हे तर वैरी आहेस, पुत्र मेला, आता कशासाठी लढतो आहेस?' अशी निर्भर्त्सना केली. द्रोणाने द्रुपदाला व इतर अनेक पांचाल वीराना मारलेच होते. आता तो धनुष्य टाकून देऊन रथात बसला. धृष्टद्युम्नाने वेळ न दवडतां, अर्जुन, सात्यकी यांच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करून सरळ द्रोणाचा शिरच्छेद केला.

सात्यकी आणि अर्जुन विरुद्ध भीम धृष्टद्युम्न असा वादविवाद चालू राहिला पण अखेरीला द्रोणवध झालाच होता. युद्ध बंद झाले. अर्जुनाला द्रोणाशी अंतिम सामना करावा लागला नाही.

द्रोणाला माहीत होते कीं अश्वत्थामा चिरंजीव आहे मग त्याने विश्वास कां ठेवला? कदाचित त्यालाच आता युद्ध नकोसे झाले असेल. आपल्याला गुरु मानणाऱ्या पांडवानाही आता आपला मृत्यु, कसेही करून हवा आहे हे दिसून आले होते. तेव्हा आता पुरे झाले असे त्याने बहुधा ठरवले.

धनुर्वेदाला वाहिलेले एक आयुष्य अखेर संपले.

महाभारताबद्दल काही गैरसमजुती -

काही शब्दप्रयोग आपल्या कानावर बालपणापासून पडत आलेले आहेत आणि त्यामुळे ते खरेच आहेत असे आपण गृहीत धरतो. पण ते गैरसमजुतीवर आधारलेले असतात.

'हा सूर्य व हा जयद्रथ' –

जयद्रथ वधाचे दिवशी कृष्णाने काहीतरी उपायाने काही काल सूर्य दिसणार नाहीं असें केले. मग जयद्रथ 'आपण आतां वाचलो' असें समजून गैरसावध झाला. कौरव वीरही गैरसावध झाले. जयद्रथ अर्जुनासमोर आल्यावर कृष्णाने सूर्यासमोरचे आच्छादन अचानक काढून घेतले व अर्जुनाला म्हटले 'हा सूर्य व हा जयद्रथ' मग लगेच अर्जुनाने जयद्रथाला बाण सोडून मारले. अशी कथा बालपणापासून हरदास पुराणिक आपल्याला सांगत आले. आणि ती आपण खरी मानत आलो!

महाभारतात असें काही नाहीं. प्रत्यक्षात काय घडले याचे विस्तृत विवेचन मी पूर्वी केलेच आहे. अर्जुनाने अखेरचा बाण मारून जयद्रथाचा वध केला तोपर्यंत तो स्वत:च्या रथावर बसून जमेल तसा अर्जुनाचा प्रतिकार करत होता कृष्णाने अर्जुनाला सावध केले कीं 'सूर्य अस्ताला जाण्याची वेळ जवळ आली आहे तेव्हा वेळ फुकट घालवू नकोस. ' मग अर्जुनाने तो अखेरचा बाण सोडला व जयद्रथाचा वध केला. त्यानंतरही काही काळ युद्ध चालू राहिले व मग सूर्यास्त झाला. 'हा सूर्य व हा जयद्रथ' असें शब्द महाभारतात कृष्णाच्या तोंडी मुळीच आलेले नाहीत. आपले गैरसमज मात्र पक्के असतात त्यामुळे यां शब्दांना साहित्यात व व्यवहारातही अनेकदां स्थान मिळते.

‘दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्’

कर्णाच्या तोंडचे हे वाक्य फार प्रसिद्ध आहे. उत्तम कुलात जन्म न लाभलेल्या पण असाधारण कर्तबगारी अंगी असलेल्या अनेक व्यक्तीना या वाक्याने स्फूर्ती दिली असेल. ही उक्ती महाभारतात असणार अशी आपली ठाम समजूत असते. मात्र महाभारतात शोधू गेले असता हे वाक्य सापडत नाहीं!

हे महाभारतातील वचन नाहीच मग सापडणार कसे? ‘वेणीसंहार’ नावाच्या संस्कृत नाटकात कर्ण आणि अश्वत्थामा यांच्या कलहाचा एक जोरदार प्रवेश आहे. त्यात अश्वत्थाम्याने कर्णाला सूतपुत्र म्हणून हिणवल्यावर कर्णाने त्याला हे प्रत्युत्तर दिले आहे. पूर्ण श्लोक असा आहे –

सूतोSवा सूतपुत्रोSवा यो वा को वा भवाम्यहम् |

दैवायत्तम् कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ||

## भारतीय युद्धाचे वेळीं अभिमन्यु काय वयाचा होता?

हा प्रश्न विचारला असतां महाभारताशी कमीजास्त परिचय असलेल्या बहुतेकांचे उत्तर १७-१८ वर्षांचा नवतरुण होता असें येईल. पण हें बरोबर आहे का? थोडासा विचार केला तर लक्षात येईल कीं हें शक्य नाहीं. पहा बरें! अभिमन्यूच्या जन्मानंतरच द्रौपदीच्या पांच पुत्रांचा जन्म झाला असें महाभारतच म्हणते. अर्थातच द्रौपदीचा सर्वात लहान पुत्र (सहदेवाचा) अभिमन्यूपेक्षा ७-८ वर्षांनी तरी नक्कीच लहान होता. राजसूय यज्ञाचे वेळी द्रौपदी अगदीच लेकुरवाळी होती असें महाभारत म्हणत नाही, म्हणजे हा पुत्र २-३ वर्षांचा तरी झाला होता असे मानणे भाग आहे म्हणजे अभिमन्यु निदान १० वर्षांचा झालेला होता! राजसूय यज्ञानंतर काही महिन्यांचा काळ दुर्योधनाचे व शकुनीचे कुटिल बेत ठरून व धृतराष्ट्राची त्याला मान्यता मिळण्यात गेला. मग द्यूत झाले आणि त्यानंतर १२ वर्षे वनवास व १ वर्ष अज्ञातवासात गेले. अर्जुन प्रगट झाला तेव्हा ग्रीष्म ऋतु चालू होता असे भीष्माने स्पष्ट म्हटलेले आहे. त्यानंतर कार्तिक अमावास्येपर्यंतचा काळ - सहा महिने - कृष्णशिष्टाईपर्यंत व युद्धाला सुरवात होईपर्यंत गेला. तेव्हा युद्धाचे वेळी अभिमन्यु कमीतकमी २४ वर्षांचा नक्कीच झाला होता. द्रौपदीचे सर्व पुत्र युद्धात लढले होते व शेवटच्या दिवशी अश्वत्थाम्याकडून मारले गेले. त्या सर्वांना भीष्माने रथी ठरवले होते. द्रौपदीचा सर्वात लहान पुत्र युद्धात सक्रीय भाग घेत होता तेव्हां तो १७-१८ वर्षांचा तरी असला पाहिजे हेही अभिमन्यूच्या वयाशी व दोघांच्या वयातील फरकाशी जुळते. अज्ञातवासात विराटाची कन्या अर्जुनापाशी नृत्य शिकत होती व ती लहान होती असा उल्लेख असल्यामुळे (तिने आपला भाऊ उत्तर याला कौरवांची उची वस्त्रे मला बाहुल्या करण्यासाठी घेऊन ये असे म्हटले होते व अर्जुनाने कौरववीरांचा पराभव केल्यावर उत्तराकडून तसे करून घेतले) आणि तिचा अभिमन्युशी अज्ञातवास संपल्यावर लगेचच विवाह झाला तेव्हा तोही नवतरुण - १८ वर्षांचा - होता असा गैरसमज आपण करून घेतो! पण तो गैरसमजच! प्रत्यक्षात द्रौपदीचा सर्वात लहान पुत्र १७-१८ वर्षांचा व अभिमन्यु २४-२५ वर्षांचा होता हे खरे!

## धृतराष्ट्राला युद्धदर्शन

कौरव-पांडव युद्ध सुरू होण्यापूर्वी धृतराष्ट्राला, आपल्याला युद्धवार्ता कशा कळतील असे वाटत होते. संजयाला दिव्य दृष्टि देऊन कृष्णाने त्याला धृतराष्ट्राशेजारीच बसून सर्व युद्ध पाहता येईल असे केले व मग संजयाने 'आंखों देखा हाल' धृतराष्ट्राला रोजच्या रोज सांगितला अशी समजूत असते. कृष्णाने कौरवदरबारात विश्वरूपदर्शन घडवले तेव्हां धृतराष्ट्राला व गांधारीला ते दिसावे म्हणून दिव्य दृष्टि दिली होती (खरेखोटे देव जाणे) त्यामुळे अशी समजूत होते.

प्रत्यक्षात दिव्यदृष्टि व्यासानी दिली होती आणि धृतराष्ट्राला नव्हे तर संजयाला दिली होती असे महाभारतात म्हटले आहे. मात्र १८ दिवसांच्या युद्धवर्णनांत काही वेळा संजय स्वत: युद्धभूमीवर होता असा स्पष्ट उल्लेख आहे. युद्धवर्णनही १८ दिवसांचे अलगअलग नसून चार सरळ भागात आहे. पहिला भाग भीष्मपतनापर्यंतच्या दहा दिवसांचा, मग दुसरा भाग द्रोणवधापर्यंतच्या पांच दिवसांचा, तिसरा भाग कर्णवधापर्यंतच्या दोन दिवसांचा व अखेरचा भाग शेवटच्या दिवशी शल्यवध व दुर्योधन-भीम गदायुद्ध झाले तोपर्यंतचा असे चार भागात युद्धवर्णन संजयाने धृत्रराष्ट्राला ऐकवलेले आहे.

संजयाचे वर्णन तो स्वत: सर्व घटना पाहत असल्याप्रमाणे आहे. दिव्यदृष्टि वगैरे अद्‌भुत कल्पना सोडून दिल्या तर असे मानावे लागते कीं हल्ली युद्धात जसे वार्ताहराना वा टी. व्ही. ला वा रेड-क्रॉसला संरक्षण असते तसे संजयाला असावे व त्यामुळे त्याला युद्धभूमीवर सर्वत्र फिरतां येत होते व घटना पाहतां येत होत्या. त्यामुळे त्याचे वर्णन प्रत्यक्षदर्शी झाले आहे. चार महत्वाच्या टप्प्यांवर युद्धभूमि सोडून धृतराष्ट्रापाशी परतून त्याने झालेल्या घटना वर्णिल्या आहेत. तेव्हा दिव्यदृष्टि ही एक गैरसमजूतच!

नरो वा कुंजरो वा।

हे आपण बाळपणापासून ऐकत आलो. असे खोटे वाक्य बोलल्यामुळे चार बोटे अधांतरी चालणारा युधिष्ठिराचा रथ पंक्चर होऊन जमिनीवर टेकला अशीही हरदासी कथा आपण ऐकत आलो. पण महाभारतात असे वाक्यच नाही!
हा उलगडा मलाही हल्लीच वाचलेल्या श्री. जातेगांवकर यांच्या एका पुस्तकावरून झाला. भीष्मपतनानंतर द्रोण सेनापति झाला व चौथ्या दिवशी जयद्रथवध झाल्यावर पांचव्या दिवशी द्रोण फार त्वेषाने युद्ध करू लागला व त्या दिवशी पांडव व पांचाल यांचा विध्वंस त्याने आरंभला. तो कोणालाच, अर्जुनाला देखील आवरेना. कृष्णाने अखेर पांडवांना सावध केले कीं असेच युद्ध चालले तर दिवस अखेर तुम्ही पूर्ण नष्ट व्हाल. तेव्हां काहीही करून याला युद्धत्याग करण्यास उद्युक्त केले पाहिजे. कृष्ण व भीमाने एक कुटिल बेत ठरवला. भीमाने प्रथम एक अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला आणि द्रोणापाशी जाऊन 'अश्वत्थामा हत:' असे पुन्हापुन्हा त्याला म्हणाला! आपला पुत्र मारला गेला यावर द्रोणाचा विश्वासच बसेना पण पुन्हापुन्हा ऐकल्यावर खात्री करून घेण्यासाठी तो युधिष्ठिरापाशी आला. असे होईल याची कल्पना असल्यामुळे कृष्ण व भीम यानी युधिष्ठिराला विनवले होते कीं 'तूं होय म्हण!' भीमाने त्याला सांगितले कीं मी अश्वत्थामा हत्ती खरोखरीच मारला आहे. असत्य बोलण्यास युधिष्ठिर सहजीं तयार होणेच शक्य नाही याची कृष्ण व भीमाला भीति होती. पण हत्ती कां होईना, अश्वत्थामा मारला गेला आहे या आधारावर युधिष्ठिराने मनाशी तडजोड केली आणि द्रोणाने जेव्हां विचारले कीं 'किं अश्वत्थामा हत:? ', तेव्हा जबाब दिला 'हत:, कुंजर:' ! जबाब देताना कुंजर: हा शब्द हळू व तोंड चुकवून उच्चारला जेणेकरून तो द्रोणाला ऐकू जाऊ नये!

द्रोणाला युधिष्ठिराचा 'हत:' एवढाच शब्द ऐकू गेला व त्याचे मनोधैर्य खचले. काही काळाने त्याने धनुष्य खाली ठेवले आणि मग त्याचा वध झाला. कृष्ण-भीमाचा हेतू साध्य झाला पण खोटे बोलल्याचा डाग युधिष्ठिराला लागला नाहीं! कारण 'हत:, कुंजर:' हे सत्यच होते! त्याने 'नरो वा कुंजरो वा' म्हटले असते तर ते मात्र असत्य भाषण ठरले असते कारण युधिष्ठिराला नर अश्वत्थामा मारला गेलेला नाहीं हे पक्के ठाऊक होते! कृष्ण आणि भीम खरे हुशार म्हटले पाहिजेत. आपल्याला पाहिजे ते त्यांनी युधिष्ठिराकडून बरोबर वदवून घेतले! आपण मात्र अजूनही 'नरो वा कुंजरो वा' म्हणत असतो! पण तो गैरसमजच!

सौभद्र नाटक

'सौभद्र' हे मराठीतील एक गाजलेले व सदा लोकप्रिय नाटक आहे. अजूनही कधीतरी त्याचे प्रयोग होतात. नाटकाची अन त्यातील पदांची मोहिनी अजून कायम आहे. मात्र या नाटकामुळे एक मोठा गैरसमज निर्माण झाला आहे ज्याला महाभारतात काही आधार नाही!

नाटकातील कथानकाप्रमाणे अर्जुन-सुभद्रा यांचे बालवयापासून परस्पर प्रेम होते, अर्जुन तीर्थयात्रेला गेलेला असताना बलराम सुभद्रा दुर्योधनाला द्यायचे ठरवतो, सुभद्रा हवालदिल होते, अर्जुनाचा ठावठिकाणा नसल्यामुळे कृष्णालाही काय करावे सुचत नाही. पण मग अर्जुन तीर्थयात्रेनिमित्तने भटकत द्वारकेच्या जवळ आल्याचे कृष्णाला कळते व मग अनेक गमतीचे बेत रचून अखेर कृष्ण सुभद्र-अर्जुनाचा विवाह घडवून आणतो! नाटकाची रचना सुरेखच आहे यात शंकाच नाही! मात्र महाभारतात असे काही नाही! महाभारताप्रमाणे अर्जुन सुभद्रा यांचे बालवयापासून काही 'रहस्य' नव्हते. कधी गाठभेट झाल्याचेही उल्लेख नाहीत. पांडव कृष्ण-बलराम यांची प्रथम प्रत्यक्ष भेट द्रौपदीच्य़ा स्वयंवर-मंडपात झालेली वर्णिली आहे. पांच पांडवांचे द्रौपदीशी विवाह झाले, मग त्यानी खांडवप्रस्थ वसवून तेथे राज्य करण्यास सुरवात केली. अर्जुनाने युधिष्ठिर-द्रौपदी याचा एकांतभंग केला म्हणून पांडवांनी स्वत:च केलेल्या नियमाप्रमाणे त्याला तीर्थयात्रेला जावे लागले. (माझ्या मते, 'स्वयंवराचा पण मी जिंकला, मात्र द्रौपदी पाचांची पत्नी झाली आतां युधिष्ठिर, भीम यांच्या नंतर ज्येष्ठता क्रमाने ती माझ्या वाट्याला येणार कधी?' असा वैताग येऊन त्याने रस्ता सुधारला व आपली सोय पाहिली!) त्याने ब्रह्मचर्य पाळावे अशीही अट खरे तर होती पण त्याने ते मुळीच पाळले नाही! उलुपी, चित्रांगदा अशी एकेक 'प्रकरणे' करीत तो काही काळाने द्वारकेला आला. यादव समुदायात सुखाने काही काळ काढत असताना कृष्णासमवेत असताना एकदा सुभद्रा त्याचे नजरेस पडली. त्याने कृष्णाला विचारले 'कोण रे ही?' कृष्णाने म्हटले 'अरे ही माझी सावत्र बहिण सुभद्रा' अर्जुनाचे मन सुभद्रेवर गेलेले ओळखून कृष्णाने विचारले की 'ही तुला आवडली आहे काय?' अर्जुनाने कबूल केल्यावर कृष्णाने सल्ला दिला की 'हिचा आतां विवाह करावयाचा आहे पण स्वयंवर योजले तर तेव्हा ही कोणाला वरील याचा काय भरवसा? तू हिला संधी पाहून

पळवून ने. क्षत्रियाना मुलगी पळवून नेऊन केलेला ‘राक्षस विवाह’ शास्त्रसंमत आहे. ’ मग योग्य संधी पाहून अर्जुनाने सुभद्रेला रथात घालून पळवून नेले! सर्व यादव वीर रागाने खवळून जाऊन युद्धाला तयार होऊ लागले पण कृष्ण ‘थंड’ बसलेला पाहून बलरामाने म्हटले कीं ‘अरे त्या कृष्णाचे काय मत ते तरी विचारा. ’ तेव्हा कृष्णाने सल्ला दिला ‘युद्धाला उभे राहण्यापूर्वी जरा विचार करा. गाठ अर्जुनाशी आहे, कोणा सोम्यागोम्याशी नव्हे. निभाव लागला नाहीं म्हणजे अब्रू जाईल. अर्जुनापेक्षा चांगला पती सुभद्रेला मिळेल काय? तेव्हा झाले आहे ते चांगलेच आहे. दोघाना बोलावून आणून सन्मानाने त्यांचा विवाह करून द्यावा आणि यादव-पांडवांचे सख्य साधावे. ’ हे सर्वांना पटले व तसेच झाले. या सर्व कथेत दुर्योधनाचे नाव कुठेच आलेले नाहीं.

तेव्हा सौभद्र नाटक छानच आहे. पण महाभारताबद्दल तो एक मोठाच गैरसमज!

कर्ण-शल्य

शल्य हा महारथी, मोठ्या मान्यवर घराण्याचा राजा व त्याचा एक वेगळाच लौकिक म्हणजे तो सारथ्यकर्मामध्ये अतिशय कुशल होता व त्याचा त्याला फार अभिमान होता. सारथ्य हे सूतांचे काम पण अनेक क्षत्रिय राजे त्यात तरबेज होते. नलराजा, ऋतुपर्ण, ही नावे पूर्वीच्या काळची पण खुद्द श्रीकृष्ण व अर्जुन हेही प्रख्यात होते. दुर्योधन जेव्हा शल्याला युद्धापूर्वी भेटला व त्याला आपल्या पक्षाला वळवून घेतले तेव्हा शल्याने त्याला विचारले कीं तुझी काय अपेक्षा आहे. नवल म्हणजे दुर्योधनाने त्याला म्हटले कीं 'तूं माझा सेनापति हो!’ आपल्या पक्षात भीष्म, द्रोण, कर्ण असताना त्याना बाजूला सारून शल्याला तो सेनापति कसा करणार होता? कदाचित भीष्मद्रोण युद्धनिवृत्त तर राहणार नाहीत ना अशी त्याला शंका असावी. तसे झालेच तर सेनापतिपदाचा भार शल्यावर ठेवून कर्णाला अर्जुनाशी टक्कर देण्यासाठी मोकळे ठेवावे असा त्याचा विचार असेल! पांडवानी, धृष्टद्युम्नाला सेनापति केले आणि भीम-सात्यकी-अर्जुनाला मोकळे ठेवले होते. प्रत्यक्षात भीष्म व द्रोण

यानी १५ दिवस सेनापतिपद सांभाळले. १६ व्या दिवशी शल्याने सेनापतिपदाचा आग्रह न धरता, उदार मनाने 'कर्णाला सेनापति कर, तोच आपली ढासळती बाजू सावरू शकेल' असा सल्ला दुर्योधनाला दिला. कर्णाने एक अवघड पेच दुर्योधनापुढे टाकला. 'अर्जुनाचे सारथ्य खुद्द कृष्ण करतो आहे, तेवढ्या लायकीचा सारथी मला नसल्यामुले माझी बाजू लंगडी पडते तेव्हा कृष्णाच्या बरोबरीचा सारथी आपल्या पक्षात एकच आहे तो म्हणजे शल्य. त्याला तू गळ घाल!' खरे तर शल्य हा स्वतः महारथी होता त्याला सारथ्य करावयास सांगण्याने एक महारथी प्रत्यक्ष युद्धातून बाजूला पडणार होता. कौरव पक्षाचे अनेक जण मारले गेल्यामुळे हे योग्य नव्हते. तरीही कर्णावर विसंबून, दुर्योधनाने शल्याला विनंति केली! शल्याच्या वाट्याला सेनापतिपदाऐवजी सारथ्य आले! तरीही 'कर्णा, तूं मला कृष्णाच्या बरोबरीचा सारथ्यकुशल मानतोस हा माझा मोठाच सन्मान आहे' असे म्हणून त्याने संमति दिली! मात्र मी क्षत्रिय राजा व कर्ण हा अखेर सूतपुत्रच तेव्हां सारथ्य करताना मी काहीही बोललो तरी कर्णाने ते मुकाट्याने ऐकले पाहिजे एवढीच अट घातली व नाइलाजाने दुर्योधन-कर्णाने ती मानली! १६व्या युद्धदिवशी सारथ्याला सुरवात करताना शल्य-कर्णामध्ये बरीच अश्लाघ्य वादावादी झाली. ती प्रक्षिप्त आहे असेही मानले जाते. उलट शल्याने कर्णाची उदार मनाने भरपूर स्तुति करून 'दुर्योधनाचे मनोरथ तूंच पूर्ण करू शकतोस तर तें तूं कर'असे म्हटले. दोन दिवस उत्तम सारथ्य करून कर्णाला अपेक्षित असलेले कौशल्य दाखवले. दुसऱ्या दिवशी सायंकाळी अर्जुन-कर्ण आमनेसामने येऊन जोरदार युद्ध सुरू असताना. कर्णाच्या रथाचे चाक भूमीत रुतले. गैरसमज असा आहे कीं कर्णाने शल्याला म्हटले कीं 'तूं खालीं उतरून खटपट करून ते सोडव. ' मात्र 'मी मूर्धाभिषिक्त राजा आहे तेव्हां मी हे करणार नाहीं, तूंच खालीं उतर. ' असे शल्याने त्याला झिडकारले. त्यामुळे कर्णाला धनुष्य टाकून खालीं उतरावे लागले. मात्र प्रत्यक्षात, कर्णाने शल्याला असे म्हटल्याचा व शल्याने नाकारल्याचा उल्लेख महाभारतात मुळीच नाही. हा एक गैरसमजच आहे. मात्र कर्ण शल्याला विनवण्याच्या वा नकार ऐकण्याच्या भानगडीत पडलाच नाही. चाक बाहेर काढण्याची खटपट कर्णाला स्वतःच खाली उतरून करावी लागली. कृष्णाने अर्जुनाला स्पष्टपणे म्हटले कीं 'प्रबळ शत्रु अडचणीत आलेला असताना त्याला सवलत देण्याचा अडाणीपणा करूं नको! शहाणे लोक असे करीत नाहीत. ' अर्जुनाने ते ऐकले व जमेल तसा प्रतिकार अखेरपर्यंत करतच असलेल्या कर्णाचा वध केला.

## सुईच्या अग्रावर

पांडवानी अज्ञातवास संपल्यावर आपल्या राज्याची मागणी केली ती दुर्योधनाने धुडकावून लावली. मग दूतांची देवघेव, आरोप प्रत्यारोप होऊन तोडगा निघेना तेव्हा खुद्द कृष्ण पांडवांतर्फे कौरव दरबारात आला व त्याने पांडवांतर्फे राज्याची मागणी केली. अनेकांनी समजावूनही दुर्योधनाने कृष्णाने केलेले सर्व आरोप नाकारून पांडवानी अज्ञातवास पुरा केलेला नसल्यामुळे राज्य मागण्यापूर्वी त्यानी अटीप्रमाणे पुन्हा बारा वर्षे वनवास भोगावा असे म्हटले. युधिष्ठिराने युद्ध टाळण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून कृष्णाबरोबर कमीतकमी पांच गावे तरी द्यावी असा निरोप पाठवला होता. ती मागणीही दुर्योधनाने नाकारली व त्यावेळी त्याने 'मी जिवंत आहे तोवर सुईच्या अग्रावर राहील एवढीही भूमि देणार नाही' असे म्हटले. हे त्याने प्रथमच स्पष्टपणे म्हटले अशी समजूत असते. मात्र तसे नाही! धृतराष्ट्रातर्फे संजयाला चर्चेच्या पहिल्याच फेरीत पांडवांकडे त्यांच्या मागणीला उत्तर देण्यासाठी पाठवले गेले होते. त्याने धृतराष्ट्राचा शहाजोग निरोप युधिष्ठिराला दिला कीं 'सामोपचाराने दुर्योधनाने राज्य दिले तर घ्या पण नाही दिले तरी युद्ध करूं नका कारण युद्धामुळे कुलक्षय होईल व त्याला तुम्ही जबाबदार व्हाल!'तो पांडवांकडील एकूण युद्धतयारी पाहून आल्यावर धृतराष्ट्राने त्याचेजवळ सर्व माहिती बारकाईने विचारून घेतली. पांडवानी व त्यांच्या सर्व साथीदारानी संजयातर्फे जोरदार प्रत्युत्तर धाडले होते कीं मुकाट्याने अर्धे राज्य द्या नाहीतर घोर परिणामाना सज्ज व्हा. धृतराष्ट्राची घाबरगुंडी उडून त्याने दुर्योधनाला पुन्हापुन्हा समजावले कीं आपल्याकडील भीष्मद्रोणादि कोणीही प्रमुख वीर युद्धोत्सुक नाही. तेव्हां शम करणेच बरे. तेव्हां दुर्योधनाने पित्याला दोन गोष्टी स्पष्ट केल्या. एक म्हणजे 'माझा खरा भरवसा मी स्वतः, दुःशासन व कर्ण या तिघांवरच आहे. ' व दुसरे, 'काही झाले तरी सुईच्या अग्रावर राहील एवढी भूमिही मी जिवंत असेपर्यंत मी पांडवाना देणार नाही. ' तेव्हा दुर्योधनाची भूमिका प्रथमपासूनच स्पष्ट व ठाम होती आणि कृष्णशिष्टाईचे वेळी त्याने तिचा पुनरुच्चार केला इतकेच. पांडवानी पांच गावांवर समाधान मानण्याचा उपयोग कधीच होणार नव्हता व शिष्टाई विफलच व्हायची होती.

द्रोणाचार्याचे वय.

द्रोणाचार्याचा उल्लेख नेहेमी भीष्माचे जोडीने, भीष्म-द्रोण असा होत असल्यामुळे ते वयाने वरोबरीचे असावे असा चटकन समज होतो. मात्र तसे नव्हते. भीष्म हे कौरवपांडवांचे नात्याने आजोबा, पण प्रत्यक्षात पणजोबा शोभतील एवढे मोठे होते. कारण सत्यवतीने शंतनूशी विवाह केला तेव्हा देवव्रत, म्हणजे भीष्म, स्वतःच तरुण वयाचा होता. त्यामुळे कौरवपांडवांचा आजोबा, विचित्रवीर्य हा भीष्माचा, नात्याने भाऊ खरा, पण वयाने मुलगा शोभला असता. द्रोणाचार्य हे कौरवपांडवांचे गुरु. त्यांचा पुत्र अश्वत्थामा हा कौरवपांडवांच्याच वयाचा होता व त्यांच्याबरोबरच पित्यापाशी धनुर्वेद शिकला. तेव्हां द्रोणाचार्य हे कौरवपांडवांचे वडील शोभतील अशाच वयाचे होते. धृतराष्ट्र, विदुर, द्रोण, कृप (अश्वत्थाम्याचा मामा) व द्रुपद – हा तर द्रोणाचा सहाध्यायी - हे साधारण एकाच वयाचे म्हणतां येतील. त्यामुळे भीष्म या सर्वांच्या दोन पिढ्या आधीचा व म्हणून त्यांचेपेक्षा ४५-५० वर्षांनी मोठा असला पाहिजे. भारतीय युद्धाचे वेळी दुर्योधन, दुःशासन, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, कृष्ण, अश्वत्थामा हे साधारण ५५ ते ६० वयाचे, कर्ण त्यांचेपेक्षा ७-८ वर्षांनी मोठा, द्रोण, द्रुपद कृप हे ७० ते ८० वयाचे तर भीष्म १२५ वर्षांचा असावा असा तर्क करतां येतो. द्रोणपर्वात एके ठिकाणी स्पष्ट उल्लेखही आहे कीं द्रोण ८४ वर्षे वयाचा असूनही तरुणाप्रमाणे जोमाने लढत आहे. भीष्म-द्रोण असा जोडीने उल्लेख नेहेमी होत असल्यामुळे ते समकालीन असल्याचा उगीचच गैरसमज होतो. पण ते खरे नाही!

कृष्ण फारतर ६५ वर्षांचा होता व युद्धानंतर ३६ वर्षे जगला म्हणजे त्याचे आयुष्य जास्तीत जास्त ११० वर्षे असे म्हणता येईल.

महाभारतातील स्फुट प्रकरणे

या लेखात आता काही स्फुट प्रकरणांचा परामर्ष घ्यावयाचा आहे. यांत काही नवीन वा आजच्या काळाला सुसंगत अशा गोष्टी नजरेला आल्या त्याबद्दल लिहावयाचे आहे.

अक्षौहिणी :

भारतीय युद्धात अठरा अक्षौहिणी सैन्य दोन्ही पक्ष मिळून लढले. बहुतेक सर्व राजांनी एकेक अक्षौहिणी सैन्य आणले होते. कृष्णाने आपले तीन कोटि गोपालांचे सैन्य दुर्योधनाला दिले होते. मात्र कौरवांच्या अकरा अक्षोहिणी सैन्याच्या मोजदादीत हे कृष्णाचे सैन्य अजिबात मोजलेले दिसत नाही.

एक अक्षौहिणी म्हणजे काय याचा पूर्ण खुलासा दिलेला आहे. १ रथ, १ हत्ती, ३ घोडे व ५ पायदळ सैनिक मिळून १ पत्ति होते. ३ पत्ति म्हणजे एक सेनामुख व त्यानंतर ३-३ च्या पटीत गुल्म, गण, वाहिनी, पृतना, चमू, अनीकिनि व अक्षौहिणि असे कोष्टक दिलेले आहे. एकूण एका अक्षौहिणीत २१८७० रथ, तितकेच हत्ती, ६५६१० घोडे व १, ०९, ३५० पायदळ समाविष्ट होत. नवल म्हणजे, आजही ३ सैनिक म्हणजे एक ग्रूप, ३/४ ग्रूपचा एक सेक्शन, मग त्याच पटीत प्लॅटून, कंपनी, बटालियन, ब्रिगेड, डिविजन, कोअर अशीच व्यवस्था असते! मधल्या काळात, युरोपियन, मुघल, मराठे वा इतरांच्या सैन्याचीही अशीच व्यवस्था असे काय?

अक्षौहिणीतील रथ व हत्ती यांची तुलना टॅंक, आर्टिलरी (तोफखाना) यांच्याशी होईल. घोडदळाची जागा आता चिलखती वाहनानी घेतली आहे. काही पायदळाच्या डिव्हिजन्स, आर्टिलरी डिविजन्स, आर्मर्ड डिव्हिजन्स एकत्र करून बनणाऱ्या आर्मीची अक्षौहिणीशी तुलना करता येईल. अशा कित्येक आर्मी ग्रूप दुसऱ्या महायुद्धात दोन्ही पक्षांतर्फे लढले. एकेका राजाचे एक अक्षौहिणी सैन्य चतुरंग व स्वयंपूर्ण होते.

अठरा अक्षौहिणी सैन्य म्हणजे एकूण २५ लाख माणसे एवढ्याशा कुरुक्षेत्रावर कशीं लढलीं असतील? दुसऱ्या महायुद्धात काही शहरांसाठी झालेल्या युद्धात, उदाहरणार्थ स्टालिनग्राड, मॉस्को वगैरे, दोन्ही पक्षांकडून सात आठ लाख सैन्य लढले पण तीं युद्धक्षेत्रे

खूप विस्तृत होतीं. भारतीय इतिहासातील मोठ्या लढायांत, उदा. तालिकोट, पानिपत वगैरेत ४-५ लाखांवर मजल गेली नव्हती. तेव्हां महाभारतांतील आकडेवारी खूप अतिशयोक्त म्हटली पाहिजे.

उपरिचर वसूची कथा :

उपरिचर नावाचा एक धर्मशील राजा होऊन गेला. आपल्या उग्र तपश्चर्येने हा एक दिवस इंद्रपदाला योग्य होईल या भीतीने देवांनी त्याला तपश्चर्येपासून परावृत्त केले. इंद्राने त्याला, 'तूं पृथ्वीवर नित्य तत्पर राहून धर्मपालन व धर्माचा प्रतिपाळ कर, चेदि देश जिंकून तूं त्याचा राजा हो' असे सांगितले. आपलें स्फटिकाचे गगनविहारी विमान त्याला दिले व वैजयंती माळ दिली. आपली नित्य आठवण रहावी म्हणून सज्जनाम्चा प्रतिपाळ करणारी एक कळकाची काठी त्याला दिली. इंद्राचा मान राखण्यासाठी संवत्सराच्या शेवटच्या दिवशी उपरिचर राजाने ती काठी जमिनीत रोवली व तिची पूजा केली. दुसरे दिवशी या काठीवर शेल्यासारखे एक वस्त्र बांधीत व तिची पूजा करीत. ही काठीची पूजा म्हणजे इंद्राचीच पूजा होय.

या कथेतील रूपके मला उलगडली नाहीत पण यांत गुढीपाडव्याच्या प्रथेचे मूळ स्पष्ट दिसते. मात्र आजकाल गुढीपाडव्याच्या प्रथेच्या या मूळ कथेचे स्मरण फारसे कोणाला नाही! गुढीला आपण शालिवाहनाच्या विजयाचे प्रतीक मानतो. इंद्रपूजा मानत नाही.

व्यासांची माता सत्यवती ही या उपरिचर वसूची धीवर स्त्रीपासून झालेली कन्या होय. महाभारतात सत्यवती ही धीवरांना मत्स्यीच्या पोटांत मिळाली व त्यांनी तिला राजा उपरिचराकडे नेऊन दिले असे म्हटले आहे. मत्स्यीच्या पोटात एक बालकही मिळाला होता. मात्र राजाने मुलाला ठेवून घेतले व कन्येला धीवरालाच देऊन 'तूंच हिचा सांभाळ कर' असे सांगितले! पुत्र पुढे मत्स्य देशाचा राजा झाला. ती मत्स्यी एक शापित अप्सरा होती असे महाभारत म्हणते व ती उपरिचराच्या वीर्यापासून गर्भवती झाली असेंही म्हणतें! याचा सरळ अर्थ धीवर स्त्रीला राजापासून हीं दोन अपत्ये झाली असाच घेतला पाहिजे. राजाने कन्येला कां स्वीकारले नाही याबद्दल महाभारत गप्प आहे. राजा जनकाने व द्रुपदाने शेतात

व यज्ञात मिळालेल्या (कोणापासून झालेल्या?) कन्या सीता व द्रौपदी यांचा स्वीकार केला व त्याना राजकन्या म्हणूनच वाढवले हे विषेश! ते भाग्य सत्यवतीला मिळाले नाही.

शिष्यांची परीक्षा.

आदिपर्वामध्ये धौम्य ऋषि व त्यांचे तीन शिष्य यांची एक छोटीशी कथा आहे. विद्या देण्यापूर्वी धॊम्यांनी आपल्या आरुणी, उपमन्यु व वेद या तीन शिष्यांची कठोर परीक्षा घेतली. शेतात शिरणारे पाणी अडवण्यासाठी बांध घालण्याचे काम आरुणीला सांगितले. त्याला ते जमेना तेव्हा बांधातील भगदाड अडवून तो स्वत:च झोपून राहिला. (आपल्या शरीराचाच बांध केला. ) तो बराच वेळ दिसेना तेव्हा त्याला शोधत गुरु स्वत: शेतात आले व त्यानी आरुणीला जोरात हांक मारली तेव्हा तो बांधातून उठून आला. त्याने धोका पत्करून केलेलें आज्ञापालन पाहून गुरु प्रसन्न झाले व मग त्याला विद्या दिली. दुसरा शिष्य उपमन्यु. त्याला गुरे राखायला पाठवीत पण काही खावयास मिळत नसे. तो गायींचे दूध प्यायचा. वासरांच्या वाटचे दूध तूं पिऊं नको असे त्याला गुरु म्हणाले. मग तो फक्त फेस प्यायचा. त्यालाही गुरूनी बंदी केली. मग उपासमार झाल्यामुळे त्याने एकदां रुईचीं पाने खाल्ली> त्यामुळे तो आंधळा झाला व विहिरीत पडला. गुरूना कळल्यावर 'अश्विनीकुमारांची स्तुति कर' असे त्याला सांगितले. त्याना प्रसन्न करून त्यांच्याही परीक्षेला उतरल्यावर त्याला पुन्हा दृष्टि मिळाली. मग प्रसन्न होऊन गुरूनेही सर्व विद्या दिली. तिसरा शिष्य वेद नांवाचा होता तो बुद्धीला कमी होता. त्याला गुरुशुश्रूषेचे काम मिळाले. इतर कामाबरोबर गुरु त्याला नित्य बैलाप्रमाणे जोखडालाही जुंफत. बराच काळ असे कष्ट केल्यावर त्याचेवरही गुरुकृपा झाली!

या कथेतील शेवटचा भाग लक्षणीय आहे. वेद हा शिष्य ज्ञानसंपन्न होऊन गृहस्थाश्रमी झाल्यावर त्यालही तीन शिष्य मिळाले. वेदाने मात्र त्यांना काहीही काम सांगितले नाही! गुरुगृहीं वास म्हणजे केवढे विलक्षण कष्ट याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव होता. गुरुशिष्यपरंपरेने विद्या मिळवण्यासाठी गुरुगृहीं राहताना आजच्या युगात भीमसेन जोशी यांनी काढलेल्या अपार कष्टांची आठवण अपरिहार्यपणे येते.

## अणिमांडव्यांची कथा

मांडव्य नांवाचे एक विद्वान व पुण्यशील ऋषि तपश्चर्येसाठी ध्यानस्थ बसलेले असताना एक चोर त्यांचे आश्रमांत आला. व दडून बसला. पाठलाग करणाऱ्या शिपायांनी मांडव्यांकडे चौकशी केली तेव्हा मौनव्रत असल्यामुळे ते काही बोलले नाहीत. चोर आश्रमांतच सांपडल्यावर रागाने शिपायांनी त्याचेबरोबर मांडव्यांनाही पकडून राजापुढे उभे केले. अविचारी राजाने चोराबरोबर मांडव्यांनाही सुळावर चढवले. सुळावर चढवलेले मांडव्य बराच काळ पर्यंत यातना भोगत जिवंत राहिले. रखवालदारांनी राजाला हे कळवल्यावर त्याने अमात्यांशी चर्चा करून ऋषीना खाली उतरवले व क्षमायाचना केली. सुळावरून उतरवताना त्याचे टोक (अणि), तुटून ते मांडव्यांच्या शरीरात तसेच राहिले. त्यामुळे त्यांचे नाव अणिमांडव्य पडले. ऋषीनी राजाला क्षमा केली पण जेव्हा यमाच्या दरबारात गेले तेव्हा त्यानी यमालाच जाब विचारला कीं माझ्या कोणत्या घोर अपराधामुळे मला सुळावर यातना भोगाव्या लागल्या? यमाने उत्तर दिले कीं तूं लहान असताना एका पाखराला काडीने टोचले होतेस त्याचे फळ तुला भोगावे लागले. !

या विलक्षण कथेचा पुढील भाग महत्वाचा आहे. मांडव्य ऋषीनी हे ऐकून यमधर्माला दोष दिला व शापही दिला. मूल बारा वर्षांचे होईपर्यंत जें करील त्याला धर्म/अधर्म ठरवता येत नाही. कारण तोंवर त्याच्या बुद्धीला ती ताकद आलेली नसते. तेव्हा *मूल १४ वर्षांचे होईपर्यंत त्याच्या कृत्याची पापात गणना करू नये व त्याला शिक्षाही होऊ नये* असा दंडक त्यानी यमधर्माला घालून दिला! गुन्हा व शिक्षा यांचेमध्येही प्रमाण राखले पाहिजे असाही विचार त्याचेपुढे मांडला व 'माझ्या क्षुद्र पापाला एवढी कठोर शिक्षा तूं कशी दिलीस?' असा त्याला जाब विचारला!'या गुन्ह्याबद्दल तुला मनुष्यजन्म घ्यावा लागेल' अशी शिक्षाही फर्मावली! यमधर्माचा मनुष्यावतार म्हणजे पांडु-धृतराष्ट्रांचा भाऊ विदुर होय.

या कथेमध्ये मांडव्यांनी इतक्या पुरातन काळात मांडलेला, *गुन्हा व शिक्षा यांमध्ये प्रमाण हवे* हा विचार व *१४ वर्षांपर्यंत अजाण मानून गुन्ह्याला शिक्षा नसावी* हाही विचार आजच्या काळातही सर्व पुढारलेल्या मानवसमाजांमध्ये न्यायाचे तत्त्व मान्यता पावलेला आहे हें विषेश!

परशुराम कथा

महाभारतांतील परशुरामकथा ही देखील आपल्या समजुतीपेक्षा थोडी निराळी आहे.

परशुरामाचा पिता जमदग्नि. हा भृगुचा नातू व ऋचीकाचा पुत्र. तो वेदवेत्ता व सर्व शास्त्रांचा व शस्त्रांचाही जाणकार होता. मात्र जमदग्नि म्हणजे शीघ्रकोपि अशी आपली समजूत असते तसा तो नव्हता! परशुरामाची माता रेणुका ही राजा प्रसेनजित याची कन्या म्हणजे क्षत्रियकन्या. रेणुका व जमदग्नि यांचे चार पुत्र, त्यांत परशुराम सर्वात लहान. स्नानासाठी नदीवर गेलेली असताना जलक्रीडा करीत असलेल्या राजा चित्ररथावर, ( कार्तवीर्यावर नव्हे!) क्षणभरासाठी कां होईना, रेणुकेचे मन गेले. त्या मानसिक व्यभिचाराने रेणुका निश्चेष्ट होऊन पाण्यात पडली. आश्रमात परत आली तेव्हां तिची अवस्था जमदग्नीने ओळखली व तिचा धि:कार केला. चारही पुत्र क्रमाने आश्रमांत आले तसतसे जमदग्नीने प्रत्येकाला आईला मारून टाकावयास सांगितले. मोठ्या तिघांनीही नकार दिला. त्यांना पित्याने रागाने शाप दिले. चौथ्या परशुरामाने मात्र आज्ञेप्रमाणे परशूने आईचे मस्तक तोडले. जमदग्नीचा क्रोध एकदम शमला व त्याने परशुरामाला 'वर माग' असे म्हटले. परशुरामाने मागितलेले वर लक्षणीय आहेत. 'आई जिवंत व्हावी, मी मारल्याची तिला स्मृति राहूं नये, मानसिक पापाचा स्पर्श तिला न व्हावा, भावांचे शाप परत घ्यावे, आणि स्वत: युद्धात अजिंक्य व दीर्घायुषी व्हावे' असे ते वर होते. व ते सर्व पित्याने त्याला दिले. जमदग्नीचे सर्व पुत्र आश्रमाबाहेर गेले असताना एकदां राजा कार्तवीर्य सहस्रार्जुन आश्रमांत आला. रेणुकेने त्याचे योग्य ते स्वागत केले तरीही त्याने आश्रमाचा विध्वंस केला. (जमदग्नीला मारले नाही!) परशुरामाने परत आल्यावर ते पाहून रागावून कार्तवीर्यावर चाल करून त्याचा वध केला. पुढे एकदा परशुराम आश्रमात नसताना पुन्हा कार्तवीर्याच्या पुत्रांनी आश्रमांत येऊन, जमदग्नीवर हल्ला करून त्याला मारून टाकले. परशुराम परत आल्यावर पितृहत्या पाहून त्याने फार विलाप केला व युद्ध करून त्याने सर्व कार्तवीर्य पुत्राना व त्यांच्या मदतनीस सर्व क्षत्रिय राजाना मारले. वारंवार झालेल्या युद्धांमुळे एकवीस वेळां पृथ्वी नि:क्षत्रिय झाली. नंतर यज्ञ करून परशुरामाने सर्व पृथ्वी कश्यपाला दान केली. कश्यपाने त्याला आपल्याला दान केलेल्या भूमीवर वसती करण्यास मनाई केली. त्यामुळे परशुराम महेद्रपर्वतावर वसती करूं लागला. परशुरामाने नवीन वसवलेल्या कोकण भूप्रदेशात हा महेंद्रपर्वत असल्याचे मानले जाते. नंतर कधीही परशुराम रात्री इतर कोठे

राहत नसे. याचा इतरत्रही उल्लेख आहे. रामाने शिवधनुष्य तोडले तेव्हां व भीष्माने अंबेचा स्वीकार करण्याचे नाकारले तेव्हां त्याने त्या दोघांना शिक्षा करण्याचा त्याने प्रयत्न केला पण दोन्ही प्रसंगी तो हरला. त्याचे बळ संपले होते व क्षत्रिय राजे पुन्हा प्रबळ झाले होते. या कथेप्रमाणे जमदग्नीच्या वधाचा दोष कार्तवीर्याला नव्हे तर त्याच्या पुत्रांना दिलेला आहे. तेव्हां 'सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला । कष्टी ते रेणुका म्हणुनी सहस्रार्जुन वधिला' हे दशावतार आरतीतील वर्णन बरोबर नाही!

रुरु आणि प्रमद्वरा

महाभारताच्या आदिपर्वात सुरवातीला भृगुऋषींच्या कुळातील अनेक व्यक्तींच्या कथा आहेत. त्यांतील एक पुरुष म्हणजे रुरु. भृगूचा पुत्र च्यवन, त्याचा पुत्र प्रमति व त्याला घृताची नावाच्या अप्सरेपासून झालेला पुत्र म्हणजे रुरु. रुरुचा पुत्र शुनक व नातू शौनकऋषि. हा ऋषि व त्याचे सहकारी यांनी एक द्वादशवर्षीय यज्ञसत्र केले. त्या सत्रासाठी जमलेल्या अनेक ऋषिमुनींना, संध्याकाळच्या वेळी, सूत लोमहर्षण याचा पुत्र, सौति नावाचा पुराणिक, मनोरंजनासाठी अनेक कथा सांगत असे. पूर्वी व्यासांनी परीक्षितपुत्र जनमेजयाला त्याच्या पूर्वजांच्या कथा सांगितल्या होत्या. तो मूळ 'जय'ग्रंथ. (परीक्षित हा पांडवांचा नातू अभिमन्यूचा पुत्र. आपला मृत्यु समीप आल्यावर त्याला युधिष्ठिराने हस्तिनापुराच्या राज्यावर स्थापित केले होते. ) त्या 'जय' ग्रंथांतिल कथा सौतीने खूप विस्ताराने सांगितल्या व 'जय'चे महाभारत झाले. असा रुरूचा महाभारताशी दूरचा संबंध आहे.

रुरुला शुनक हा पुत्र प्रमद्वरा या त्याच्या पत्नीपासून झाला. रुरु आणि प्रमद्वरा यांची कथा ही एक प्रेमकहाणीच आहे.

विश्वावसु नावाच्या गंधर्वराजापासून मेनका अप्सरेला प्रमद्वरा ही कन्या झाली. मात्र जन्मत:च मेनकेने तिला स्थूलकेश नावाच्या ऋषीच्या आश्रमाजवळ नदीकाठी ठेवून दिले व ती 'निर्घृण व निर्लज्ज स्त्री' (महाभारतकारांचे वर्णन) खुशाल चालती झाली. तीच ही मेनका, जिने शकुंतलेला असेच जन्मत:च कण्वमुनींच्या आश्रमापाशी सोडून दिले होते! यावेळींही तिच्या कन्येला स्थूलकेश ऋषींनी उचलले व तिचा सांभाळ केला व

लहानाची मोठी केली. ती रूपवान व गुणवान असल्यामुळे तिचे प्रमद्वरा असे नाव पडले. रुरु हा एक विद्वान ऋषि होता. एकदा प्रमद्वरा काही कारणाने रुरूच्या नजरेला पडली व त्याचे तिच्यावर प्रेमच जडले. त्याने मित्रांतर्फे ही गोष्ट वडिलांच्या कानावर घातली. त्यांनी स्थूलकेशाकडे प्रमद्वरेसाठी रीतसर मागणी घातली व ती मान्य होऊन रुरु व प्रमद्वरा यांचा विवाह ठरला. मात्र विवाह होण्यापूर्वी काही दिवस आधी, प्रमद्वरा मैत्रिणींसह क्रीडा करत असताना चुकून तिचा पाय एका झोपलेल्या भुजंगावर पडला. त्याने तिला दंश केला व ती कोसळली. अनेक ऋषि व रुरु जमा झाले पण ती गतप्राणच झाली. सर्वजण शोकमग्न झाले. रुरु एकटाच वनात जाऊन आक्रोश करत बसला. तिची आठवण काढून तो स्वत:शी म्हणत राहिला कीं माझ्या हातून जर तपश्चर्या, दान व गुरुसेवा घडली असेल तर माझी प्रिया जिवंत होवो. बराच काळ त्याने असा विलाप केल्यावर एक देवदूत आला व त्याला समजावूं लागला कीं 'हिचे आयुष्यच संपले आहे त्याला काय करणार? तुझे आयुष्य तूं तिला देतोस काय?' रुरूने म्हटले कीं 'माझ्या उरलेल्या आयुष्यातील अर्धे आयुष्य तिला मिळो व ती जिवंत होवो' (सर्व आयुष्य देऊन काय उपयोग कारण मग रुरुच मरून जाणार!) मग तो देवदूत व गंधर्वांचा राजा यमधर्माकडे गेले व त्यांनी रुरूसाठी रदबदली केली. यमानेही ते मान्य केले. रुरूच्या उरलेल्या दीर्घ आयुष्यातील अर्धे प्रमद्वरेला मिळाले व ती जिवंत झाली! मग रुरु आणि प्रमद्वरेचा विवाह झाला.

मात्र रुरूने सर्पांचा दीर्घद्वेष धरला व हातात दंड घेऊन, सापडेल त्या सर्पाला तो मारीत सुटला. एकदां एका निर्विष सर्पालाही तो मारूं पहात असताना त्या सर्पाने त्याला उपदेश केला कीं 'अशा तऱ्हेचे आचरण तुला ब्राह्मणाला शोभत नाही. तूं हे सोड. पूर्वी राजा जनमेजयाने पिता परीक्षित याचा मृत्यु तक्षक नागाच्या दंशामुळे झाला या रागापोटीं सर्पयज्ञ केला व अनेक सर्प यज्ञाग्नीत जळाले. सर्पकुल नष्ट होण्याची वेळ आली होती तेव्हां आस्तीक या ब्राह्मण ऋषीनेच त्याला थांबवले होते व सर्पकुल वांचवले होते. तसे वागणे हेच तुला शोभेल. ' त्याचे म्हणणे मानून रुरूने सर्प मारणे बंद केले.

अशी ही रुरु-प्रमद्वरा यांची प्रेमकहाणी.

# लेखकाची ओळख



१. नाव. प्रभाकर केशव फडणीस.

२. वय ८३

३. शिक्षण - चिकित्सक समूह हायस्कूल गिरगांव येथून SSC - साल १९५०

-. V. J. T. I. Matunga, Mumbai येथून B. E. (Civil) -साल १९५५

४. व्यावसायिक - खासगी व सरकारी कंपन्या व अणुशक्ति खात्यामध्ये नोकरी. रिचर्डसन-कृडास मधून १९८९ मध्ये निवृत्त.

५ साहित्य, संगीत, संगणक, बुद्धिबळ/ब्रिज व इतरही काही विषयात स्वारस्य.

६. निवृत्तीनंतर रामायण-महाभारताचे (मराठी भाषांतरे) वाचन, मनन व ब्लॉगलेखन.

७. विलेपार्ले येथील ज्येष्ठनागरिक संघटना - 'सोबती' - या संस्थेत सक्रिय भाग व अनेक विषयांवर व्याख्याने.

८. कौटुंबिक. - सुविद्य पत्नी व दोन उच्चशिक्षित मुलगे. दोघे अमेरिकेत स्थायिक.

९ वास्तव्य - गिरगांव, अंधेरी (पूर्व), व विलेपार्ले. आता अमेरिकेत सॅन रेमॉन व पाम हार्बर येथे मुलांकडे. भारतात येणेजाणे चालू. .

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय दरवर्षी सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. मराठीत सहा कोटी वाचक व्हायला हवेत. मराठी पुस्तकांच्या आवृत्त्या कोटींच्या निघाव्यात. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!